


गणपती बाप्पा मोरया

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, गुरुवार २४ सप्टेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०




## शेतक-याला वा-यावर सोडणार नाही-उपमुख्यमंत्री शिंदे

**अकोला/प्रतिनिधी :** कमी पर्जन्यमान आणि पावसातील खंड यामुळे शेतकरी संकटात सापडला आहे. मात्र, शेतक-यांनी धीर सोडता कामा



नये. शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. शेतक-याला वा-यावर सोडणार नाही; त्यांना जास्तीत जास्त मदत करण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. जिल्ह्यातील दुष्काळसदृश् परिस्थितीची पाहणी करण्यासाठी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी बाळापूर तालुक्यातील धधम व व्याळा या गावांना भेट दिली, त्यावेळी ते बोलत होते. कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, खासदार अनुप धोत्रे, आमदार संजय गायकवाड, आमदार किरण सरनाईक, महापौर शारदा खेडकर, माजी आमदार गोपीकिशन बाजोरिया, माजी आमदार नारायण गव्हाणकर, माजी आमदार संजय रायमुलकर, माजी आमदार विप्लव बाजोरिया आदी उपस्थित होते. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी धधम येथे जी. टी. जाधव यांच्या शेतात व व्याळा येथील सविता वासुदेव वाशिमकर यांच्या शेतात पीक नुकसानीची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकरी बांधवांशी संवाद साधून त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. नैसर्गिक संकटाने हताश झालेल्या शेतक-यांना त्यांनी दिलासा दिला. ते म्हणाले की, शेतक-यांनी धीर सोडू नये. शासन त्यांच्यासोबत उभे आहे. येणारी दिवाळी काळी होउ देणार नाही. शेतकरी बांधवांना भरघोस मदत करण्यात येईल. यासंबंधी कॅबिनेटमध्येही चर्चा झाली असून, लवकरच अधिसूचना काढण्यात येईल. ते पुढे म्हणाले की, पावसात प्रदीर्घ खंड पडल्याने शेतीचे मोठे नुकसान झाले. तूर, सोयाबीन व इतरही पीकांचे नुकसान झाले. अशा वेळी सर्वांनी एकत्रित येउन शेतक-यांना मदतीचा हात देण्याची आवश्यकता आहे. शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. त्यामुळे सरकारच्या तिजोरीवर शेतक-यांचा पहिला अधिकार आहे. आम्ही शेतक-यांसोबत आहोत. शेतक-यांना वा-यावर सोडणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

# दोन दिवसांत दुष्काळाबाबतचा शासन निर्णय-मुख्यमंत्री फडणवीस





- संकटातून मार्ग काढण्यासाठी नागरिकांनी एकमेकांना सहकार्य करावे
- कळंब तालुक्यातील मलकापूर येथील पीक नुकसानीची केली पाहणी

**धाराशिव/प्रतिनिधी :** संकटाच्या काळात राज्य सरकार पूर्णपणे शेतक-यांच्या पाठीशी उभे राहील.दुष्काळग्रस्त शेतक-यांना सरसकट मदत देण्याचा निर्णय घेतला असून,येत्या दोन दिवसांत दुष्काळाबाबतचा शासन निर्णय (जीआर) काढण्यात येईल,अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.कळंब तालुक्यातील मलकापूर येथे रामहरी लोमटे आणि संजय लोमटे यांच्या शेतातील नुकसान झालेल्या सोयाबीन पिकाची पाहणी केल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी उपस्थित शेतकरी बांधवांशी संवाद साधला.त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मदत देताना पंचनामे कायदेशीर प्रक्रियेनुसार करावे लागतील. मात्र,परिस्थिती सरसकट असल्याने मदतीचा निर्णयही सरसकटच असेल,असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. दुष्काळाच्या संकटातून मार्ग काढण्यासाठी नागरिकांनी एकमेकांना सहकार्य करावे. दुष्काळाच्या काळात पिण्याचे पाणी,जनावरांचा चारा,मुलांचे शिक्षण आणि अन्नधान्य यांची व्यवस्था राज्य सरकारच्या माध्यमातून करण्यात येईल. शेतक-यांना देण्यात येणारे थेट अनुदान त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचा निर्णयही सरकारने घेतला आहे,असेही त्यांनी सांगितले.शेतक-यांना दिलासा देण्यासाठी कर्जमाफीची प्रक्रिया सुरू असून, सर्व पात्र शेतक-यांच्या खात्यात पैसे जमा होईपर्यंत कर्जमाफी सुरू राहील,असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. शेतक-यांच्या वीजबिलापोटी ४८ हजार कोटी रुपयांची थकबाकी माफ करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. ➩(पान २ वर)

## दुष्काळाशी लढताना निधी कमी पडू देणार नाही

### पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य

**धाराशिव/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तुळजापूर तालुक्यातील करजखेडा येथे थेट शेताच्या बांधावर जाउन शेतक-यांच्या व्यथा जाणून घेतल्या.कोरडा पडलेला साठवण तलाव आणि नुकसानग्रस्त पिकांची अवस्था पाहिल्यानंतर परिस्थिती गंभीर असली तरी शेतक-यांनी खचून जाउ नये.दुष्काळाचा सामना करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या जातील. कुठेही निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही.राज्य सरकार शेतक-यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे,अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.



मुख्यमंत्री फडणवीस यांनी शेतकरी बळी भोसले यांच्या शेताच्या बांधावर जाउन नुकसानग्रस्त उस आणि सोयाबीन पिकांची बारकाईने पाहणी केली. पेरणी कधी केली,पिकाला किती पाउस मिळाला,पावसाचा खंड किती काळ राहिला आणि त्याचा पिकाच्या वाढीवर व संभाव्य उत्पादनावर काय परिणाम झाला, याची माहिती त्यांनी शेतक-यांकडून घेतली.सोयाबीनचे पीक पूर्णपणे हातचे गेले असून उसाची वाढही खुंटल्याचे त्यांनी नमूद केले.पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचे प्रत्यक्ष पाहणीतून दिसत असल्याचे सांगत शेतक-यांना शासनाकडून सरसकट मदत केली जाईल,असे त्यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्री थेट बांधावर आल्याने परिसरातील शेतकरीही त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी पुढे आले. पावसाच्या खंडामुळे झालेले नुकसान,उत्पादनातील संभाव्य घट,हंगामासाठी केलेली गुंतवणूक आणि त्याचा कुटुंबाच्या अर्थकारणावर होणारा परिणाम त्यांनी मुख्यमंत्र्यांसमोर मांडला. पावसाकडे डोळे लावून बसलेल्या शेतक-यांच्या भावना मुख्यमंत्र्यांनी ऐकून घेतल्या.मुलांचे शिक्षण बंद पडणार नाही आणि अडचणीच्या काळात शेतकरी कुटुंबांना आवश्यक आधार देण्याचा शासनाचा प्रयत्न राहील,अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली.दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आता उपलब्ध पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे काटेकोर नियोजन करावे लागणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. ➩(पान २ वर)





## पिकांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश

**पुणे/प्रतिनिधी :** राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीकडे शासन अतिशय गांभीर्याने पाहत आहे. मुख्यमंत्र्यांनी फडणवीस यांनी आजपासूनच पंचनामे करण्याचे आदेश दिले असून, येत्या तीन दिवसांत शेतक-यांच्या मदतीसंदर्भातील पहिली अधिसूचना निघणार आहे. त्यामुळे शेतक-यांनी काळजी करण्याचे कारण नाही. कोणत्याही परिस्थितीत शासन शेतक-यांना वा-यावर सोडणार नाही. झालेल्या नुकसानीसाठी निधीची कमतरता पडू देणार नाही. शेतक-यांना जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. तसेच पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चा-यासाठीही आवश्यक नियोजन करण्यात आले आहे, असे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.पुणे जिल्ह्यातील दौंड, बारामती आणि इंदापूर

## शेतक-यांना जास्तीत जास्त मदत मिळवून देणार- कृषी मंत्री भरणे

तालुक्यांच्या दौ-यावर असताना कृषिमंत्री भरणे यांनी देउळगाव, मोरगाव, मुर्टी, नावळी आणि कोळविहीरे या गावांना भेट देउन प्रत्यक्ष शेतक-यांच्या बांधावर जाउन पिकांची तसेच पाणी परिस्थितीची पाहणी केली. यावेळी आमदार राहुल कुल आणि पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष ➩(पान २ वर)

## भारताच्या लेकींनी जिंकले सुवर्णपदक श्रीलंकेचा धुव्वा, 69 धावांत गुंडाळले

**आयची-नागोया /वृत्तसंस्था-** भारतीय महिला क्रिकेट संघाने २०२६ च्या आशियाई



क्रीडा स्पर्धेत ऐतिहासिक सुवर्णपदकावर नाव कोरले. भारताच्या महिला क्रिकेट संघाने अंतिम सामन्यात श्रीलंकेच्या महिला क्रिकेट संघाचा तब्बल १४७ धावांनी पराभव करत सुवर्णपदक जिंकले.जपानमधील आयची-नागोया येथे सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील टीम इंडियाने श्रीलंकेचा एकतर्फी पराभव करीत सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला. आशियाई क्रीडा स्पर्धेतील भारताचे हे पहिले सुवर्णपदक ठरले. स्मृती मानधना आणि शफाली वर्माच्या धमाकेदार खेळीच्या जोरावर टीम इंडियाने प्रथम फलंदाजी ➩(पान २ वर)

## निवडणूक आयोगाचा कारभार अदृश्य हात चालवत आहे-काँग्रेसचा ज्ञानेश कुमार यांच्यावर हल्लाबोल

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** निवडणूक आयोगाकडून सरकारधार्जिणे निर्णय घेत असल्याचा आरोप विरोधकांनी सातत्याने केला आहे. विशेष सखोल मतदार पडताळणी (एसआयआर) आणि मतदान यंत्राबाबत अनेकदा तक्रारी करण्यात आल्या होत्या. आता द इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या एका वृत्तामुळे खळबळ उडाली आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी आपला विरोध डावलून किंवा मत विचारात न घेता निर्णय घेतले असल्याची तक्रार इतर दोन सदस्यांनी केली आहे. या वृत्तानंतर विरोधकांनी निवडणूक आयोगावर हल्लाबोल केला असून निवडणूक आयोग अदृश्य हात



चालवत असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. निवडणूक आयोगाचे सदस्य सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी यांनी ज्ञानेश कुमार यांची तक्रार कॅबिनेट सचिवांकडे केली आहे. गेल्या दहा महिन्यांत किमान १४ वेळा या दोन्ही निवडणूक आयुक्तांनी आयोगाच्या निर्णयप्रक्रियेबाबत वेळोवेळी आक्षेप नोंदवल्याचे वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. नवीन मतदारांची नोंदणी करत असताना अर्ज क्रमांक ६ चे बदलले स्वरुप, मतदार यादीतून नावे वगळणे वा नोंदवणे, एसआयआर प्रक्रियेतील काही बाबी तसेच मतदार याद्यांचे नवी दिल्लीत होत असलेले केंद्रीकरण अशा गंभीर मुद्द्यांवर संधू आणि जोशी यांनी प्रतिकूल मतप्रदर्शन केल्याचे नोंदींवरून आढळते.

काँग्रेस नेते मनीष तिवारी यांनी एक्सप्रेसच्या वृत्तावर भाष्य करताना म्हटले की, निवडणूक आयोगाचे काम अदृश्य हात चालवत आहेत. तिवारी यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले, द इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या वृत्तातील बाबी वरकरणी ख-या मानल्या तर निवडणूक ➩(पान २ वर)

## इलेक्शन कमिशनमधील अंतर्गत वाद हा धक्कादायक- खा.सुळे

**बारामती / प्रतिनिधी-** केंद्रीय निवडणूक आयोगातील मतभेद चव्हाट्यावर आले असून, मुख्य आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कारभाराबाबत त्यांच्या दोन



सहका-यांनी कॅबिनेट सचिवांकडे थेट तक्रार केल्याचे समोर आले आहे. यासोबतच एसआयआर प्रक्रियेवरून करण्यात आलेल्या दाव्यांवरून विरोधकांनी रान पेटवले आहे. निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा का? यावर सुप्रिया सुळे म्हणाल्या, एका सशक्त लोकशाहीसाठी आजची बातमी अर्थातच धक्कादायक आहे म्हणजे मला विश्वासच बसत नाहीये की अरे बापरे आपल्यासारख्या देशामध्ये जिथे जगामधली सगळ्यात मोठी लोकशाही म्हणून भारताकडे बघितलं जातं महात्मा गांधींनी आणि असंख्य कुटुंबांनी एवढा मोठा लढा उभा केला स्वातंत्र्य देण्यासाठी.

स्वातंर्त्य दिल्यानंतर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एक संविधान आणि समतेची भाषा आणि समान अधिकार प्रत्येकाला मिळावा म्हणजे कॅमेरामनला पण एक मत, रिपोर्टरला पण एक मत, मलाही एक मत, या देशाच्या प्रधानमंत्र्यांनाही एकच मत, अशी प्रक्रिया करून प्रत्येक नागरिकाला एकाच मताचा अधिकार हा संविधानाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दिला. त्यातून इलेक्शन कमिशनची स्थापना झाली. ➩(पान २ वर)













## आयआयटीत 8.5 'सीजीपीए' असलेला साहिल परीक्षेत मोबाईल कशाला वापरणार? मित्र, कुटुंबीयांचा प्रश्न



**आयआयटी मुंबईतील प्रथम वर्षाचा विद्यार्थी साहिल वाकोडे याच्या कथित आत्महत्येप्रकरणी आता त्याच्या शैक्षणिक गुणवत्तेवरून मोठे प्रश्न उपस्थित केले जात आहेत.**

**यवतमाळ /प्रतिनिधी :** दहावीला ९० टक्के, बारावी विज्ञान शाखेत ७६ टक्के, जेईई ॲडव्हान्स्डमध्ये ६१४ क्रमांकाची कामगिरी आणि आयआयटी मुंबईच्या पहिल्या वर्षात ८.५ सीजीपीए. छोट्या गावातून आयआयटी मुंबईपर्यंत पोहोचलेल्या साहिल रवींद्र वाकोडेच्या शैक्षणिक प्रवासाची ही ओळख. ज्या विद्यार्थ्याने देशातील अत्यंत कठीण अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेतून आयआयटी गाठली आणि तेथेही चांगली शैक्षणिक कामगिरी केली, त्याच्यावर मिड सेमिस्टर परीक्षेत मोबाईल वापरून कॉपी केल्याचा आरोप झाला. याच आरोपाचा मानसिक धक्का बसल्याने साहिलने स्वतःला संपविल्याची चर्चा आहे.

**शैक्षणिक गुणवत्तेकडे नव्याने बघण्याची गरज-** या घटनेनंतर आयआयटी मुंबईने आपल्या आधीच्या निवेदनाबद्दल जाहीर माफी मागत, तपास पूर्ण होण्यापूर्वी घटनेपूर्वीच्या घटनांचे स्वरूप निश्चितपणे मांडणे चुकीचे असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे साहिलच्या संपूर्ण शैक्षणिक गुणवत्तेकडे पुन्हा पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. साहिलची गुणवत्ता जेईई प्रवेश परीक्षेपुरती मर्यादित नव्हती. दहावीमध्ये त्याने ९० टक्के तर बारावी विज्ञान शाखेत ७६ टक्के गुण मिळविले. जेईई ॲडव्हान्स्डच्या माध्यमातून त्याने आयआयटी मुंबईत प्रवेश मिळविला. साहिलला अनुसूचित जाती प्रवर्गात ऑल इंडिया ६१४ रँक असल्याचे त्याच्या कुटुंबियांनी सांगितले.

आयआयटी मुंबईतील पहिल्या वर्षात साहिलचा ८.५ सीजीपीए होता, ही बाब त्याच्या शैक्षणिक कामगिरीचे महत्त्व अधोरेखित करते. आयआयटी मुंबईच्या ग्रेडिंग पद्धतीत १० गुणांची श्रेणी असून, विविध ग्रेडना गुण दिले जातात. संस्थेच्या अधिकृत नियमावलीनुसार ८.५ ते ९.५ दरम्यानचा ग्रेड पाइंट एबी श्रेणीत येतो. याच पार्श्वभूमीवर मिड सेमिस्टर परीक्षेतील कथित मोबाईल वापराचा मुद्दा अधिक महत्त्वाचा ठरतो. घटनेनंतर आयआयटी मुंबईने सुरु वातीच्या निवेदनात साहिल परीक्षेदरम्यान ➩(पान २ वर)

## ज्ञानेशकुमारला तात्काळ तुरूंगात टाकले पाहिजे

### महाराष्ट्रातील विधानसभेची निवडणूक रद्द करा

**मुंबई /प्रतिनिधी-** निवडणूक आयोगात एकवाक्यता नसल्याचे समोर आले आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या काही निर्णयांवर दोन्ही निवडणूक आयुक्तांनी काही आक्षेप घेतले होते. ही बाब समोर येताच काँग्रेसने आज पत्रकार परिषद घेउन दिल्ली आणि हरियाणातील विधानसभेच्या झालेल्या निवडणुका रद्द करा, अशी मागणी केली आहे. उद्धव ठाकरे यांनी सुद्धा आज पत्रकार परिषद घेउन मुख्य निवडणूक आयुक्तांवर प्रश्नचिन्ह निर्माण केले. देशांतर्गत, पक्षांतर्गत लोकशाही कशी राबवली जाते की नाही हे बघणारा निवडणूक आयुक्तनेमणुकीद्वारे नेमला जातो. त्याची निवडणूक का होत नाही?. मग हा कोणाच्या मर्जीने नेमला जातो? कोण नेमतो याला? मर्जीने याची नेमणूक होत असेल तर त्यांच्या घरचं पाणी भरणार. तो पाणी भरताना इतकं पाणी भरतोय की त्यात देशाची लोकशाही बुडतेय असे उद्धव ठाकरे म्हणाले.

**ज्ञानेशकुमारला तात्काळ तुरुंगात टाकले पाहिजे-** इथल्या निवडणूक आयुक्तांना विचारलं, ते बोलतात आमच्याकडे पॉवर नाही. मग पॉवर कोणाकडे आहे? असा सवाल उद्धव ठाकरेंनी विचारलं. म्होरक्या कोण आहे? ज्ञानेशकुमारला तात्काळ तुरुंगात टाकलं पाहिजे, मग त्याच्या म्होरक्याला तुरुंगात टाकून या सगळ्या प्रक्रियेचा पुनर्विचार झाला पाहिजे. महाराष्ट्र, तामिळनाडू



आणि पश्चिम बंगालच्या निवडणुका रद्द करून इथल्या निवडणुका बॅलेट पेपरवर झाल्या पाहिजेत. विरोधी पक्षात मतभेद असले तरी बॅलेट पेपरच्या मुद्द्यावर एकत्र आलं पाहिजे अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी केली. मी निवडणूक आयोगाला धन्यवाद देतो. सुखबीर संधू आणि विवेक जोशी यांना, तुम्ही धाडस दाखवलं. आता तुमच्या लक्षात येत असेल, म्हणून मी विचारलं, तुम्ही सगळे चॅनलवाले पत्रकार परिषदा दाखवता का? चॅनलने त्या भयातून बाहेर येणं गरजेचं आहे. आता जनता रस्त्यावर उतरली तर मात्र काही सांगता येत नाही. तुम्ही लोकशाहीचे आधारस्तंभ आहात. लोकशाहीचा होत असलेला हा खून, पक्ष फोडणारी दरोडेखोरांची टोळी याचा पर्दाफाश जनतेसमोर आला पाहिजे असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले.

**निवडणूक आयुक्तांनी भांडं फोडलेलं आहे-** मी चॅनलना विचारतोय तुमच्यात एकमत करा. लोकशाही वाचवा. आम्ही लढतच आहोत. आम्ही विरोधी पक्ष जनतेचे प्रतिनिधी आहोत. जनता आता नुसती मन की बात ऐकणार नाही असे उद्धव ठाकरे म्हणाले. आपल्या विधानसभा निवडणुका झाल्या, त्यावेळी बेकायदेशीर सरकार होते. निवडणूक आयुक्तांनी भांडं फोडलेलं आहे. कसा मनमानी कारभार चालत होता. पश्चिम ➩(पान २ वर)

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# घरफोडीची खोटी तक्रार देणाऱ्याचा भांडाफोड

## मित्रासोबत वाद; अद्दल घडविण्यासाठी चोरीचा बनाव

**अमरावती/प्रतिनिधीः-** घराचे कुलूप तोडून रोख रक्कम व सोन्याची पोत चोरीला गेल्याची तक्रार देणाऱ्या व्यक्तीनेच चोरीचा बनाव केल्याचे स्थानिक गुन्हे शाखेच्या तपासात उघड झाले. मित्रासोबत दारूच्या कारणावरून झालेल्या वादातून त्याला अद्दल घडविण्यासाठी घरफोडी झाल्याचे भासविल्याची कबुली तक्रारदाराने दिल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणात तक्रारदारासह त्याच्या मित्राला मंगरूळ चव्हाळा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

खेडपिंपरी येथील गणेश पुंडलिक चाहांदे (वय ५०) यांनी १६ सप्टेंबर रोजी मंगरुळ चव्हाळा पोलीस ठाण्यात घरफोडीची तक्रार दिली होती. १५ सप्टेंबर रोजी बाहेरगावी जाणे असल्याने त्यांनी घरातील स्टीलच्या डब्यात सहा हजार रुपये रोख व सुमारे ३० हजार रुपये किमतीची सोन्याची पोत ठेवून घराला कुलूप लावले होते. सायंकाळी घरी परतल्यानंतर घराच्या दरवाजाचा कुलूपकोंडा तुटलेला दिसला. तसेच डब्यात ठेवलेली रोख रक्कम व सोन्याची पोत गायब असल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले होते. या तक्रारीवरून मंगरुळ चव्हाळा पोलिसांनी गुन्हा दाखल केला. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानेही समांतर तपास सुरू केला. तपासादरम्यान २२ सप्टेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेला माहिती मिळाली की, खेडपिंपरी येथील सचिन ज्ञानेश्वर काकडे हा तक्रारदाराचा मित्र असून दोघांमध्ये दारूच्या कारणावरून वाद झाला होता. या वादातून सचिननेच गणेश चाहांदे यांच्या घराचा कुलूपकोंडा तोडल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सचिन काकडे याला ताब्यात घेऊन चौकशी केली. चौकशीत त्याने दारूच्या कारणावरून गणेश चाहांदे यांच्यासोबत वाद झाल्याचे सांगितले. या रागातून त्याने त्यांच्या घराचा कुलूपकोंडा तोडला; मात्र घरातील कोणतीही वस्तू किंवा रक्कम चोरी केली नसल्याचे त्याने सांगितले. वारंवार चौकशी करूनही तो आपल्या जबाबावर ठाम राहिल्याने पोलिसांचा संशय तक्रारदाराकडे वळला. यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गणेश चाहांदे यांची पुन्हा सखोल चौकशी केली. सुरुवातीला त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र त्यांच्या जबाबातील विसंगती पोलिसांच्या लक्षात आली. त्यानंतर केलेल्या चौकशीत घरात प्रत्यक्षात कोणतीही चोरी झाली नसल्याचे त्यांनी मान्य केल्याचे पोलिसांनी सांगितले. दारूच्या कारणावरून सचिन काकडे याच्यासोबत वाद झाला होता. त्याला अद्दल घडविण्याच्या उद्देशाने घरफोडी व चोरी झाल्याचा बनाव केल्याची कबुली त्यांनी दिली. तसेच तक्रारीत चोरीला गेलेली सोन्याची पोत अमरावती येथील आपल्या मुलीच्या घरी ठेवली असल्याचेही त्यांनी पोलिसांना सांगितले. दोन्ही व्यक्तींना पुढील कारवाईसाठी मंगरूळ चव्हाळा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक दुर्गेश राजपूत, पोलीस अंमलदार रविंद्र वऱ्हाडे, प्रशांत वैद्य, श्यामकुमार गावंडे व चालक प्रशिक वानखडे यांनी केली.

# वलगाव बस स्थानकाजवळ ट्रक-दुचाकीचा भीषण अपघात

## दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू



**अमरावती/प्रतिनिधीः-** वलगाव ठाण्याच्या हद्दीतील बस स्थानकाजवळ बुधवारी (दि.२३) रात्री एक अत्यंत भीषण अपघात घडला. भरधाव ट्रक आणि दुचाकीमध्ये झालेल्या जोरदार धडकेत दुचाकीस्वाराचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, अपघाताची तीव्रता एवढी भीषण होती की, दुचाकीस्वाराने जागीच प्राण सोडले. अद्याप मृत व्यक्तीची ओळख पटू शकलेली नाही. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन वाहतूक कोंडी सोडवली.पोलिसांनी मृतदेह पंचनामा करून उत्तरीय तपासणीसाठी अमरावतीच्या जिल्हा सामान्य रुग्णालयात (इर्विन हॉस्पिटल) पाठवला आहे. मृत व्यक्तीची ओळख पटवण्याचे काम तसेच अपघाताबाबत पुढील कायदेशीर तपास वलगाव पोलीस करत आहेत.

# १ व १० वरिल उर्वरित

## आयआयटीत ८.५ 'सीजीपीए'

मोबाईल वापरताना आढळल्याचे आणि चॅटजीपीटीचा वापर केल्याचे म्हटले होते. मात्र, त्यानंतर संस्थेने स्वत?च त्या निवेदनातील उल्लेखांबद्दल माफी मागितली. तपास सुरू असताना साहिलच्या मृत्यूपूर्वी नेमके काय घडले, याबाबत निष्कर्षाप्रत पोहोचणे योग्य नव्हते, असे संस्थेने स्पष्ट केले.

**तपासाकडे लक्ष-**दरम्यान, या प्रकरणाचा तपास मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेकडून सुरू आहे. साहिल परीक्षा केंद्रातून बाहेर पडल्यानंतर त्याच्या हालचालींचा घटनाक्रम सीसीटीव्हीच्या आधारे तपासला जात असल्याचे वृत्त आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी स्वतंत्र चौकशी, विद्यार्थी कल्याण आणि तक्रार निवारण व्यवस्थेत सुधारणा यांसह १८ मागण्या केल्या आहेत. साहिलच्या मृत्यूच्या कारणांबाबत अनेक दावे, आरोप आणि प्रतिदावे पुढे येत आहेत. कुटुंबीयांनी जातीय छळाचे आरोप केले आहेत; काही विद्यार्थ्यांनी मात्र त्यांच्याशी असहमती व्यक्त केली आहे. या सर्व बाबी सध्या तपासाधीन आहेत. त्यामुळे कोणताही निष्कर्ष काढण्याआधी तपासातून समोर येणारे पुरावे महत्त्वाचे ठरणार आहेत. पण या सगळ्या वादाच्या केंद्रस्थानी असलेली साहिलची गुणवत्ता दुर्लक्षित होता कामा नये, असे त्याचे निकटवर्तीय म्हणतात. जेईईची कठीण परीक्षा पार करून मिळविलेला आयआयटी प्रवेश आणि पहिल्याच वर्षात मिळविलेला ८.५ सीजीपीए ही साहिलच्या गुणवत्तेची ओळख आहे.

## दोन दिवसांत दुष्काळाबाबतचा शासन

दुष्काळाच्या या संकटात शेतक-यांना सर्वतोपरी मदत करणे आणि त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे,ही सरकारची भूमिका आहे.राज्य सरकार शेतक-यांना आवश्यक ती सर्व मदत करेल, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. यावेळी पालकमंत्री प्रताप सरनाईक,सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले,खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर,जिल्हा परिषद अध्यक्ष अर्चना पाटील,आमदार बसवराज पाटील, राणाजगजीतसिंह पाटील, कैलास घाडगे पाटील, प्रवीण स्वामी, माजी आमदार ज्ञानराज चौगुले जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर,पोलीस अधीक्षक रितू खोखर यांचेसह विविध विभागाचे अधिकारी व लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

## दुष्काळाशी लढताना निधी

सध्याच्या परिस्थितीत पिके वाचविणे कठीण झाले आहे.त्यामुळे उपलब्ध पाणी सर्वप्रथम पिण्यासाठी राखून ठेवावे लागेल.पिण्याच्या पाण्याची गरज भागविल्यानंतर पाणी उपलब्ध राहिल्यासच त्याचा अन्य कारणांसाठी वापर करता येईल, असे त्यांनी सांगितले.पुढील चार ते पाच महिने कठीण असून या काळातून सर्वांना एकमेकांना धीर देत आणि सहकार्य करत मार्ग काढावा लागेल,असेही त्यांनी नमूद केले. शेतक-यांना मदत करण्यासाठी शासन सर्व आघाड्यांवर पावले उचलत असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की,पीक कर्जमाफीचे काम सुरू आहे.पीक कापणीचे प्रयोगही सुरू असून पीक विम्याची मदत दिली जाईल.

पिण्याच्या पाण्यासोबतच जनावरांसाठी चा-याची व्यवस्था करण्यात येईल.रब्बी हंगामासाठी पाण्याची उपलब्धता असल्यास त्यादृष्टीनेही तयारी केली जाईल. दुष्काळाचा सामना करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व उपाययोजना राबविताना निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही. असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.शेतक-यांना दिलासा देण्यासाठी कर्जमाफी आणि वीजबिल माफीचा निर्णय घेण्यात आला असून आता थेट आर्थिक मदतही शेतक-यांच्या खात्यात जमा करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.शेतीचे उत्पन्न हातचे गेल्यामुळे शेतकरी कुटुंबांना अन्नधान्याची कमतरता भासणार नाही,यासाठीही आवश्यक उपाययोजना करण्यात येतील. पीक नुकसान,पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा,पीक विमा, आर्थिक मदत आणि अन्नधान्य अशा सर्व पातळ्यांवर शासन नियोजन करीत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.करजखेड्यातील पाहणीदरम्यान शेतक-यांशी मुख्यमंत्री फडणवीस यांनी थेट संवाद साधला.संकट मोठे आहे मात्र आपण सर्वजण एकमेकांना धीर देउन आणि एकजुटीने त्यातून मार्ग काढू.शेतक-यांच्या पाठीशी सरकार भक्कमपणे उभे राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.या पाहणी दौ-यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत पालकमंत्री प्रताप सरनाईक, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले,खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, जिल्हा परिषद अध्यक्ष अर्चना पाटील,आमदार बसवराज पाटील, राणाजगजितसिंह पाटील व अभिमन्यू पवार,माजी आमदार ज्ञानराज चौगुले,जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर, पोलीस अधीक्षक रितू खोखर, उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी आणि परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

## पिकांच्या नुकसानीचे पंचनामे

वीरधवल जगदाळे उपस्थित होते.पुणे जिल्ह्यातील हवेली, जुन्नर, आंबेगाव, मावळ आणि मुळशी या तालुक्यांमध्ये २ ते ३ आठवड्यांचा पावसाचा खंड पडला आहे. भोर व वेल्हा तालुक्यांमध्ये ३ ते ४ आठवड्यांचा पावसाचा खंड असून, ४ आठवड्यांपेक्षा अधिक काळ पावसाचा खंड असलेल्या तालुक्यांमध्ये बारामती, शिरूर, पुरंदर, इंदापूर, दौंड आणि खेड या तालुक्यांचा समावेश असल्याची कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी माहिती दिली.पावसातील दीर्घ खंडामुळे पुणे विभागातील खरीप पिकांवरही परिणाम झाला आहे. या परिस्थितीची केवळ आकडेवारीच्या आधारे पाहणी न करता प्रत्यक्ष क्षेत्रावर जाउन वस्तुस्थिती जाणून घेणे महत्त्वाचे असल्याचे कृषिमंत्री भरणे यांनी यावेळी सांगितले.कृषी व संबंधित विभागांकडून प्रत्यक्ष शेतावर जाउन नुकसानीची अचूक नोंद करण्यात येत आहे. पावसातील खंड, पिकांची सद्यस्थिती आणि त्याचा पिकांवर झालेला परिणाम लक्षात घेउन पंचनामे तसेच आवश्यक प्रस्तावांची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यात येईल.

## भारताच्या लेकींनी जिंकले

करताना निर्धारित २० षटकांत ३ विकेटस्च्या मोबदल्यात विक्रमी २१६ धावा करीत श्रीलंकेसमोर तगडे आव्हान ठेवले आणि या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेचा डाव १५.४ षटकांत अवघ्या ६९ धावांवर आटोपला. कोरोगी स्पोर्टस पार्कमध्ये भारत आणि श्रीलंकेमध्ये हा अंतिम सामना रंगला. या सामन्यात टीम इंडियाने श्रीलंकेचा तब्बल १४७ धावांनी पराभव करीत आशियाई क्रीडा स्पर्धेतील पहिले सुवर्णपदक जिंकले. त्यामुळे श्रीलंकेला रौप्य पदकावरच समाधान मानावे लागले. या आधी पाकिस्तानने बांगला देशचा पराभव करीत कांस्यपदक पटकावले होते. फायनलमध्ये भारताने श्रीलंकेचा एकतर्फी पराभव केला.

## निवडणूक आयोगाचा कारभार

आयोगाचा कारभार अदृश्य हातांद्वारे चालवला जात असल्याचे स्पष्ट होते. जर नियमांनुसार निर्णय घेतले जात नसतील आणि बहुमत डावलून प्रक्रिया पार पाडली जात असेल तर ती पूर्णत? बेकायदेशीर नसले तरी निश्चितच मनमानी पद्धतीचे आहेत. महाभियोग प्रक्रियेचा गांभीर्याने विचार करण्यासाठी चालविण्यासाठी हे उत्तम प्रकरण आहे. पण त्यापेक्षा महत्त्वाचे काय असेल तर ती निवडणूक आयोगाची विश्वासाहर्ता ज्याला आता तडे गेले आहेत.

## इलेक्शन कमिशनमधील अंतर्गत

पुढे बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, इलेक्शन कमिशनमध्ये आम्ही आणि उद्धवजींनी काय भोगलंय, हे मला काही काढायचं नाही. आज मला काही उणीदुणी काढत बसायची नाहीत. पण तो विषय त्याच्यामुळे आम्ही खूप भोगलं आणि त्याच इलेक्शन कमिशनने जे संविधानाच्या चौकटीत चालायला पाहिजे त्यातला अंतर्गत कलह हा ज्या पद्धतीने बाहेर आलाय हा धक्कादायक आहे आणि कुठल्याही सशक्त लोकशाहीला मोडून काढण्याच्या पापाची सुरु वात आहे. हे खूप चिंताजनक आहे. ही प्रक्रिय कुठल्याही सशक्तलोकशाहीसाठी अतिशय हानिकारक आहे.एक सर्वसामान्य मायबाप जनता ज्याला संविधानिक अधिकार ज्याला बेसिक राईट जो त्याचा अधिकार आहे त्याच्यात जर गल्लत होत असेल आणि ही माहिती जर बाहेर येत असेल ते अतिशय चिंताजनक आहे. म्हणजे मला असं वाटतं हा विषय आपण खूप गांभीर्याने घेतला पाहिजे. हा पॉलिटिकल नाही मला याच्यात राजकारण आणायचंच नाही.

## ज्ञानेशकुमारला तात्काळ तुरूंगात

बंगालमध्ये ९० लाख मतदार वगळले. महाराष्ट्रात ४५ लाख मतदार घुसवले. ४० लाखांवर आक्षेप घेतला होता. मी, राज आम्ही मविआने मोर्चा काढलेला असे उद्धव ठाकरे म्हणाले.

## ३३ हजार ९६४ मतदार निवडणार

घोषणा झाल्यापासून हे अधिकारी आपल्या कामांमध्ये लागले आहे. निवडणूक प्रक्रिया शांतीपूर्ण आणि निर्विघ्न संपन्न करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. निवडणुकी दरम्यान कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता मतदान करण्याचे आवाहन विभागीय आयुक्तांनी केले आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

तसेच केवळ सिबील स्कोरच्या आधारे पीक कर्ज नाकारू नये, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी यांनी बँकांना दिले. तथापि संबंधित शेतकऱ्याचे इतर कर्ज थकीत असल्यास, पीक कर्ज मंजूर करताना संबंधित बँकेची कर्जविषयक धोरणे तसेच आरबीआयच्या लागू मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले.

जिल्ह्यात आतापर्यंत ५६ हजार ९०५ शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळालेला आहे. त्यापैकी केवळ ४ हजार ७०३ शेतकऱ्यांना नवीन पीककर्ज वाटप करण्यात आले आहे. कर्जमाफीचा लाभ मिळालेल्या पात्र शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी कर्जवाटपाची गती तातडीने वाढवावी. पात्र शेतकऱ्यांपर्यंत संस्थात्मक कर्जपुरवठा प्रभावीपणे पोहोचविण्याचे व पुढील १० दिवसात ६० टक्के शेतकऱ्यांना कर्जवाटप करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.बैठकीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या पात्र शेतकऱ्यांना वेळेत नवीन पीक कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी बँका, सहकार विभाग व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने व मिशन मोडमध्ये कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी येरेकर यांनी दिल्या.

## तीन ज्वेलर्स दुकाने फोडणारी

राजा), हरिंदरसिंग संतोषसिंग दुधाणी (वय २४, रा. शेंदला, ता. मेहकर) आणि गणेश जनार्धन मानवतकर (वय ३२, रा. शेंदला, ता. मेहकर, जि. बुलढाणा) अशी ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे आहेत. ११ सप्टेंबर रोजी गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत ज्वेलर्सचे दुकान फोडून सोने-चांदी चोरीला गेल्याची घटना घडली होती. या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखा युनिट क्रमांक दोनकडून सुरू असताना फ्रेजरपुरा आणि राजापेठ हद्दीतही अशाच पद्धतीने ज्वेलर्सची दुकाने फोडल्याची माहिती पोलिसांना मिळाली. तीनही घटनांमध्ये एकाच टोळीचा सहभाग असल्याचा संशय बळावल्याने दोन स्वतंत्र पथके तयार करण्यात आली. आरोपींचा माग काढताना पोलिसांनी सुमारे २०० ते २५० किलोमीटरच्या परिसरातील ३०० ते ३५० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले. त्यातून आरोपींची हालचाल आणि त्यांच्या वापरातील वाहनाबाबत माहिती मिळाली. आरोपी बुलढाणा जिल्ह्यातील रेकॉर्डवरील सराईत घरफोडी करणारे असल्याचे तपासात समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, हिंगोली, अकोला तसेच गुजरातमधील सुरत येथे आरोपींचा शोध घेण्यात आला. त्यांच्या संभाव्य ठिकाणी गोपनीय बातमीदारांचे जाळेही सक्रिय करण्यात आले. २३ सप्टेंबर रोजी गुन्हे शाखेला गणेश मानवतकर हा दोन साथीदारांसह चोरीच्या मुद्देमाल व घरफोडीच्या साहित्य घेऊन मोटारसायकलने अकोल्याहून नागपूरच्या दिशेने येत असल्याची माहिती मिळाली. तांत्रिक माहितीच्या आधारे खात्री करून पोलिसांनी वरिष्ठांच्या आदेशाने राममेघे कॉलेजजवळील जंगल परिसरात दोन पथकांच्या मदतीने सापळा रचला. काही वेळाने काळ्या रंगाच्या कॉलेज बॅगा पाठीवर घेतलेले तीन जण मोटारसायकलवरून येताना दिसले. पोलिसांनी त्यांना थांबवून पंचांसमक्ष झडती घेतली असता बॅगेत कटर, टामी, कात्री, पेचकस, विग, टॉर्च आदी घरफोडीसाठी वापरण्यात येणारे साहित्य आढळले.

**दुचाकी चोरीचाही तपास-** पोलिसांनी केलेल्या चौकशीत आरोपींनी अमरावती शहरातील गाडगेनगर, फेजरपुरा आणि राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत ज्वेलर्सची दुकाने फोडल्याची माहिती दिल्याचे पोलिसांनी सांगितले. तसेच एका मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्याचीही माहिती समोर आली आहे. या प्रकरणातील पुढील तपास सुरू आहे. जप्त मुद्देमालात ४ किलो चांदी (१० लाख रुपये), १० ग्रॅम सोन्याची लगड (१.५० लाख), २५ ग्रॅम सोन्याचे बेसर (३.७५ लाख), हिरो स्प्लेंडर मोटारसायकल (६० हजार), १० हजारांची रोख रक्कम आणि घरफोडीचे साहित्य (२० हजार) यांचा समावेश आहे. ताब्यातील तिन्ही आरोपींवर बुलढाणा, वाशिम, अकोला आणि लातूर जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांमध्ये घरफोडी, चोरी तसेच इतर गुन्हे दाखल असल्याची माहिती गुन्हे शाखेने दिली आहे. ही कारवाई पोलिस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपायुक्त यशवंत सोळंके, श्याम घुगे, उपायुक्त मुख्यालय तथा गुन्हे प्रांजली सोनवणे आणि सहायक पोलिस आयुक्त निलेश ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अतुल वर व दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

## अन्न व औषध प्रशासन

असल्याची माहिती समोर येत आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या कारवाईच्या धास्तीने व्यवसायिकांमध्ये खळबळ असल्याचे बोलले जात असतानाच एवढ्या मोठ्या प्रमाणात मुदत संपलेल्या सॉसच्या बॉटल्स कचऱ्यात आढळून येणे अनेक प्रश्न उपस्थित करणारे ठरत आहे.मुदत संपलेल्या या बॉटल्स नेमक्या कोणी कचऱ्यात फेकल्या? त्या कोणत्या दुकानातून किंवा आस्थापनातून बाहेर पडल्या? तसेच या सॉसचा शहरातील कोणकोणत्या व्यावसायिकांकडे पुरवठा करण्यात आला होता, याची चौकशी होणे गरजेचे आहे.मुदत संपल्यानंतरही हा सॉस शहरातील काही ठिकाणी ग्राहकांना दिला जात असल्याची माहिती असून, हा प्रकार गंभीर मानला जात आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात मुदतबाह्य बॉटल्स कचऱ्यात सापडत असतील, तर त्यापैकी किती बॉटल्स ग्राहकांपर्यंत पोहोचल्या आणि अजूनही शहरातील दुकानांमध्ये मुदत संपलेला सॉस विक्रीसाठी उपलब्ध आहे का, याची तपासणी होणे गरजेचे आहे. अन्न व औषध प्रशासन कार्यालयापासून हाकेच्या अंतरावरच मुदत संपलेल्या बॉटल्स कचऱ्यात आढळून आल्याने प्रशासनाच्या तपासणी यंत्रणेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. संबंधित बॉटल्सचा माग काढून त्या कुठून आल्या, आणि शहरात अजूनही मुदतबाह्य सॉसचा पुरवठा किंवा विक्री सुरू आहे का, याचा छडा लावण्याची मागणी होत आहे.आता या बॉटल्सचा मालक, आणि शहरातील विक्रीचे नेटवर्क अन्न व औषध प्रशासन शोधणार का? याकडे अमरावतीकरांचे लक्ष लागले आहे.

## बगीया टी-पॉइंट लूटप्रकरणी

पोलिसांनी घटनास्थळासह विविध ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासून गुप्त बातमीदारांचे जाळे सक्रिय केले. २३ सप्टेंबर रोजी मिळालेल्या माहितीच्या आधारे बगीया टी-पॉइंट ते कोंडेश्वर रोड परिसरात सापळा रचून संशयितांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांच्या चौकशीत आरोपीने बडनेरा पोलिस ठाणे हद्दीतील दोन गुन्ह्यांची माहिती दिल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपींकडून पल्सर १५०, हिरो स्प्लेंडर प्लस, पल्सर एनएस १२५, मोटोरोला मोबाईल तसेच दोन चाकू असा एकूण ३ लाख ४१ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईत चार संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून, आणखी एक संशयित फरार आहे. त्याच्याकडील मुद्देमाल जप्त करण्याची कार्यवाही सुरू आहे. या टोळीमुळे शहरातील आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके व सहाय्यक पोलीस आयुक्त नयन अलुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली बडनेरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनमंत उरलागोंडावार, पोलीस उपनिरीक्षक नरेश गिरगुसे तसेच डीबी पथकातील कर्मचाऱ्यांनी केली.

## नांदगाव खंडेश्वर कृषी उत्पन्न बाजार

शेख सोहेल यांनी आपल्या शेतातील हंगामातील नवीन सोयाबीन बाजार समितीत विक्रीसाठी आणले होते. या प्रसंगी बाजार समितीचे संचालक पंकज ठाकरे यांच्या हस्ते काटा पूजन करण्यात आले. तसेच पहिली आवक आणल्याबद्दल शेतकरी शेख सोहेल यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला व आगामी हंगामासाठी शुभेच्छा दिल्या. श्रेयश ठाकरे यांच्या अडत मध्ये आलेले हंगामातील मुहूर्ताचे नवीन सोयाबीन व्यापारी संयोग ट्रेडर्स व नंदगोपाल दालमिल यांनी खरेदी केले.

याप्रसंगी बाजार समितीचे संचालक विवेक वैष्णव, जितेश जांगडा, मो. जावेद भाई, अडते सतीश गिड्डे, ओंकार ठाकरे, संजय खंडारे, व्यापारी सतीश शिरभाते, जावेद भाई तसेच समितीचे कर्मचारी अविनाश कथकर, आकाश शिंदे, ऋषिकेश चोपडे, आशिष शेळके , सागर उईके, व इतर शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अल्पवयीन मुलीला ब्लॅकमेल

वडिलांना देण्याची धमकी देत आरोपीने तिच्यावर दबाव आणल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.त्यानंतर अश्लील फोटो व व्हिडिओ मागवून ते सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे.दरम्यान, २१ मे २०२६ रोजी रात्री आरोपीने पीडितेला घराबाहेर बोलावून वाहनात तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचे तक्रारीत नमूद आहे. पीडिता अल्पवयीन असल्याची माहिती आरोपीला असतानाही हा प्रकार केल्याचा आरोप पोलिस तक्रारीत करण्यात आला आहे.या प्रकरणी २३ सप्टेंबर २०२६ रोजी वणी पोलिस ठाण्यात अपराध क्र. ९६९/२०२६ अन्वये BNS कलम ३५१(२), ३५१(३), ६४ तसेच पॉक्सो कायद्यातील कलम ४ व ६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी आरोपीला अटक केली असून,या प्रकरणाचा पुढील तपास API प्रियांका चौधरी करीत आहेत. पीडितेची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी तिला ग्रामीण रुग्णालय,वणी येथे पाठविण्यात आले आहे.

## विद्यापीठ अधिसभेत आता

२०२६ मध्ये संमत केलेल्या नव्या कायद्यानुसार वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताच्या संपूर्ण सहा कडव्यांचे गायन अपेक्षित आहे. घडलेला सदर प्रकार म्हणजे वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताचा एक प्रकारचा अवमानच आहे. सदर बाब लगेच सिनेट सदस्य गिरीश शेरेकर, सुनील तिप्पट यांनी सभापतींच्या लक्षात आणून दिली. त्यांनी घडलेल्या प्रकाराची गंभीर दखल घेऊन पुढच्या सभेपासून वंदे मातरम् गीताचे संपूर्ण सहा कडव्यांचे गायन होईल, असे निर्देश संबंधितांना दिले. नव्या कायद्यानुसार वंदे मातरम् या गीताला राष्ट्रगीताच्या समान कादेशीर दर्जा आणि संरक्षण देण्यात आले आहे. या विषयावर देशभरात मंथन झाले आहे. कायद्यात झालेल्या बदलाची विद्यापीठ प्रशासनाला माहिती असू नये याचे आश्चर्य अनेकांनी व्यक्त केले. संसदेत सदर विधेयक चर्चेला आले तेव्हा सखोल चर्चा झाली. त्यानंतर हे विधेयक संमत झाले आणि त्यावर राष्ट्रपतींची स्वाक्षरी होऊन त्याचा कायदा झाला आहे.

## अमरावती जिल्हा दुष्काळग्रस्त

यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. जिल्ह्यातील पावसाची स्थिती, पिकांचे झालेले नुकसान, शेतकऱ्यांसमोरील आर्थिक अडचणी तसेच खरीप हंगामातील प्रतिकूल परिस्थिती याकडे निवेदनातून प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.पावसाअभावी अनेक ठिकाणी पिकांची वाढ खुंटली असून उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे शासनाने प्रत्यक्ष परिस्थितीचा सर्वंकष आढावा घेऊन अमरावती जिल्ह्याचा दुष्काळग्रस्त जिल्ह्यांच्या यादीत समावेश करावा, तसेच पात्र शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत, पीकविमा व इतर शासकीय सवलती उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली. शेतकऱ्यांच्या अडचणींची गांभीर्याने दखल घेऊन शासन स्तरावर तातडीने कार्यवाही व्हावी, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली. निवेदन देताना शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

## अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत

तथा समितीचे अध्यक्ष आशिष येरेकर यांनी जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीच्या बैठकीत दिले. या बैठकीत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ व सुधारित नियम, २०१६ अंतर्गत दाखल गुन्हे, पोलीस तपासावरील प्रलंबित प्रकरणे, न्यायालयीन खटले आणि अत्याचारग्रस्तांना देण्यात येणाऱ्या आर्थिक सहाय्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. १ जानेवारी ते ३१ ऑगस्ट २०२६ दरम्यान अमरावती शहर व ग्रामीण विभागात एकूण ६९ गुन्हे दाखल झाले. यापैकी ५४ प्रकरणांमध्ये पोलीस तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र (चार्जशीट) सादर करण्यात आले आहे, तर १३ प्रकरणे अद्याप पोलीस तपासावर प्रलंबित आहेत. या प्रलंबित प्रकरणांमध्ये साक्षीदारांचे जबाब नोंदवणे, आरोपींना अटक करणे तसेच जात प्रमाणपत्राशी संबंधित कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. सन १९९५ पासून ते ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंतच्या शहर व ग्रामीण विभागातील एकूण २ हजार ३७७ प्रकरणांचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. न्यायालयीन प्रकरणांचा जलद निपटारा व्हावा यासाठी पोलीस विभाग आणि शासकीय अभियोक्ता (सरकारी वकील) यांनी समन्वयाने काम करावे, तसेच आता दरमहा प्रकरणनिहाय आढावा बैठक घेण्याचे निर्देश देण्यात आले. ४९ अत्याचारग्रस्तांना 'स्पर्श' प्रणालीद्वारे २०२६-२७ या आर्थिक वर्षात अत्याचारग्रस्तांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी शासनाकडून ८० लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. यापैकी ४९ प्रकरणांमध्ये 'SPARSH' (स्पर्श) प्रणालीद्वारे थेट आर्थिक सहाय्य वितरित करण्यात आले आहे. उर्वरित पात्र प्रकरणांमध्ये आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून निधी वितरणाची प्रक्रिया गतिमान करण्याचे आदेश देण्यात आले. शासन निर्णय २० नोव्हेंबर २०२५ अन्वये, खून किंवा मृत्यू प्रकरणातील पात्र वारसांना शासकीय अथवा निमशासकीय सेवेत नियुक्ती देण्याच्या प्रकरणांचाही यावेळी आढावा घेण्यात आला. पूर्वीच्या प्रकरणांमध्ये पात्र ठरलेल्या २१ वारसांपैकी १६ वारसांना शासकीय सेवेत सामावून घेण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली. उर्वरित ५ प्रकरणांमध्ये कागदपत्रांची पूर्तता करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पीडितांना वेळेत आर्थिक सहाय्य देणे, पोलीस तपास वेळेत पूर्ण करून दोषारोपपत्र सादर करणे, न्यायालयीन प्रकरणे बोर्डावर आणणे आणि पात्र वारसांना नियमानुसार पुनर्वसनाचा लाभ मिळवून देण्यास प्रशासनाचे प्राधान्य राहणार असल्याचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी सांगितल्याची माहिती समाज कल्याण सहायक आयुक्त राजेंद्र जाधवर यांनी दिली आहे.

## गुन्हेगार जयेश गायकवाड

करण्याचा प्रस्ताव पोलिसांनी तयार केला. गाडगेनगर विभागाचे सहायक पोलीस आयुक्त निलेश ब्राम्हणे यांच्या माध्यमातून हा प्रस्ताव पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके यांच्याकडे सादर करण्यात आला. त्यानंतर प्रस्तावाची कार्यवाही पूर्ण होऊन १९ सप्टेंबर २०२६ रोजी जयेश गायकवाड याला दोन वर्षांसाठी अमरावती शहर व जिल्ह्याच्या हद्दीतून हद्दपार करण्याचा आदेश पारित करण्यात आला. या आदेशाची २१ सप्टेंबर रोजी अंमलबजावणी करण्यात आली. जयेश गायकवाड याला आदेशाची बजावणी करून अमरावती शहर व जिल्ह्याच्या हद्दीबाहेर, जरीपटका, जिल्हा नागपूर येथे सोडण्यात आले.

## कांतानगरात तडीपार इसमाला

२२ सप्टेंबर रोजी गुन्हे शाखेच्या अधिकारी व अंमलदारांना तो गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कांतानगर परिसरात आढळून आल्याची गुप्त माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने कारवाई करून त्याला ताब्यात घेतले. तडीपार आदेशाचा भंग केल्याप्रकरणी त्याच्याविरुद्ध गाडगेनगर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम १४२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जिल्ह्यातील गड-किल्ले, संरक्षित

आयुक्त मंगेश गोंदावले, उपवनसंरक्षक के. आर. अर्जुना, भूमी अभिलेख अधीक्षक महेश शिंदे, दर्यापूर नगरपरिषद मुख्याधिकारी डॉ. विकास खंडारे, भारतीय पुरातत्व सर्वेक्षणचे पुरातत्व विदु डॉ. अभिजित आंबेकर, राज्य पुरातत्व व वस्तुसंग्रहालये, पुणेचे सहाय्यक संचालक डॉ. विलास वहाणे, महाराष्ट्र सागरी मंडळाचे प्रादेशिक बंदर अधिकारी, नितीन राजवैद्य, नरेंद्र केवले, शिवा काळे, पाथरे यांचा समावेश आहे.

**CHANGE IN NAME**

Old name (As per passport): **Nandraj Jagnandan Yadav**

New name (As per aadhar & pan card): **Nandraj Jaganandan Yadav**

**Address:** Old Buy Pass Road Near Haribhau Kaloti Colony, Pragati Colony, Rukhmini Nagar, Amravati 444606
Passport No: N3378314
Aadhar No: 489001747621

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, २४ सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## कारंजा अंतर्गत ब्राह्मणखेड शिवारात मजुराचा खून ; मध्यप्रदेशातून आरोपी जेरबंद

### लोखंडी सब्बलने डोक्यात प्रहार ; मृतदेह शेतात पुरला

■ प्रतिनिधी | कारंजा ■

कारंजा शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ब्राह्मणखेड शिवारात किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून एका शेतमजुराचा लोखंडी सब्बलने डोक्यात प्रहार करून खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. खून केल्यानंतर मृतदेह शेतातच खड्डा करून पुरल्याचे तपासात समोर आले असून, या प्रकरणातील फरार आरोपीला मध्यप्रदेशातून ताब्यात घेऊन पोलिसांनी अटक केली आहे.

याप्रकरणी संतोष काशिराम तिडके (वय ४०, व्यवसाय शेती, रा. माळीपुरा, कारंजा, जि. वाशिम) यांनी दि. २१ सप्टेंबर २०२६ रोजी कारंजा शहर पोलीस ठाण्यात जबानी रिपोर्ट दिला. तिडके यांनी अमोल सुभाष रूईथाले यांच्या ब्राह्मणखेड शिवारातील सुमारे ४० एकर शेती मक्त्याने घेतली असून, या शेतात काम करण्यासाठी मध्यप्रदेशातील मजूर राहत असल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले.



दि. २१ सप्टेंबर रोजी सकाळी सुमारे ८ वाजता तिडके हे शेताची पाहणी करण्यासाठी गेले असता दिनेश रामू उईके आणि त्याच्यासोबत काम करणारा दुसरा मजूर तेथे दिसून आला नाही. त्यानंतर तिडके यांनी दिनेश उईके याच्या मोबाईलवर संपर्क साधला असता त्याने दोघांमध्ये रात्री वाद झाल्याचे सांगितले. वादादरम्यान संबंधित इसमाने त्याला मारहाण केल्याने आपण त्याच्या डोक्यात लहान सब्बलने प्रहार केला असून, त्याचा मृत्यू झाल्याचे त्याने सांगितले. तसेच पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह शेतातील खड्ड्यात पुरल्याची माहिती दिल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

या माहितीच्या आधारे कारंजा शहर पोलिसांनी अप. क्र. ६१०/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) व २३८ अंतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

तपासादरम्यान मृताची ओळख पटविण्यात पोलिसांना यश आले असून, मृतकाचे नाव युवराज धुराडी वरखडे (वय ४० वर्षे, रा. छिंदवाडा, ता. मुलताई, जि. बैतूल, मध्यप्रदेश) असल्याचे निष्पन्न झाले.

दरम्यान, गुन्हा घडल्यानंतर आरोपी दिनेश रामू उईके (वय २९ वर्षे, रा. राजापूर रयत, तहसील मुलताई, जि. बैतूल, मध्यप्रदेश) हा घटनास्थळावरून फरार झाला होता. पोलिसांनी त्याचा कसोशीने शोध घेत मध्यप्रदेशात जाऊन त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर त्याला सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास सपोनि प्रदीप अल्लापुरकर, कारंजा शहर पोलीस ठाणे करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील, अपर पोलीस अधीक्षक लता फड, उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अमर चोरे, सपोनि प्रदीप अल्लापुरकर, पोउपनि विशाल बोरकर, पोहवा गणेश जाधव, पोहवा मयुरेश तिवारी, पोहवा उमेशकुमार बिबेकर, पोका मोहम्मद परसुवाले, पोका नितीन पाटील, पोका अनिस निनसुरवाले आणि पोका अमित भगत यांनी केली.

## पावसाअभावी पिके करपली ; आमदार झनकांकडून नुकसानग्रस्त शेतीची पाहणी

**सरसकट नुकसान भरपाईसाठी शासनाकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन**



■ प्रतिनिधी | किन्हीराजा ■

रिसोड-मालेगाव विधानसभा मतदारसंघातील मालेगाव तालुक्यातील किन्हीराजा परिसरात मागील सुमारे ५० दिवसांपासून पावसाचा थेंबही नसल्याने सोयाबीन, तूर, उडीद, मूग आदी पिके करपून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानग्रस्त भागाची आमदार अमित झनक यांनी बुधवारी (दि. २३) प्रत्यक्ष शेतात जाऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

पावसाने दडी मारल्याने सोयाबीन पिकाची दाणे भरण्याची अवस्था असतानाच पिके वाळून गेली आहेत. तूर, उडीद व मूग पिकांनाही पावसाअभावी मोठा फटका बसला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने सरसकट नुकसानभरपाई देण्याची मागणी जोर धरत आहे. आमदार अमित झनक यांनी किन्हीराजा येथील नरेश भुजबळ, शेख जीवन, भिका कोल्हे, महारुद्र पाटकर, एरंडा येथील नाजूकराव घुगे, गजानन भेंडेकर, शिवाजीराव घुगे, मेरालडोह येथील दिनकरराव घुगे, गोविंदराव घुगे तसेच सोनाळा येथील संदीप वानखडे व प्रवीण वानखडे यांच्या शेतात जाऊन पिकांची पाहणी केली.

या भागातील शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीची दखल घेऊन सरसकट नुकसानभरपाई मिळावी, यासाठी राज्य व केंद्र शासनाकडे आपण पाठपुरावा करणार असल्याचे आमदार झनक यांनी यावेळी सांगितले. शेतकऱ्यांच्या संकटाच्या काळात आपण त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी परिसरातील शेतकरी व शेतमजूर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रिसोडमध्ये पोलिसांचा रूटमार्च



■ प्रतिनिधी | रिसोड ■

शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहून गणेशोत्सव व विसर्जन शांततेत पार पडावे या हेतूने पोलीस स्टेशनच्यावतीने मुख्य मार्गावरून रूट मार्च काढण्यात आला. यामध्ये वरिष्ठ पोलीस अधिकारी, ठाणेदार, सहाय्यक पोलीस निरीक्षक, कर्मचारी व गृहरक्षकदलाचे जवान मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावर्षी शहरात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे जवळपास ३५ ठिकाणी श्री गणेशस्थापना झाली आहे. दरम्यान शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहून उत्सव, विसर्जन शांततेत पार पडावे या हेतूने विविध ठिकाणी तगडा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. विसर्जनच्या दिवशी मिरवणुकीदरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी रिसोड पोलीस स्टेशनच्यावतीने उपविभागीय पोलीस अधिकारी रामकृष्ण पवार, ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील मुख्य मार्गावरून रूट मार्च काढण्यात आला.

## दुष्काळी परिस्थितीसाठी शेतकरी भव्य जन आक्रोश मोर्चा काढणार

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

निसर्गाच्या लहरीपणा मुळे यावर्षी मुंगळा येथे दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून शेतकऱ्यांचे मुख्य असलेले सोयाबीन पिकांना मोठा फटका बसला आहे. लवकर मुंगळा येथील शेतकरी शेतकऱ्यांच्या मागणीसाठी मालेगाव येथे जन आक्रोश मोर्चा काढणार. मागील एक महिन्यापासून पावसाने दडी मारल्याने सोयाबीन तुरीसह इतर सर्व पिकाचे मोठे नुकसान झाले असून सुरवातीला झालेल्या पाऊसाने सोयाबीन जोमाने वाढली होती फुले शेंगा बहार धरत असताना पाणी दडी मारल्याने सोयाबीन पिके करपली असुन आता पाऊस कितीही झाला तरी सोयाबीन



पिकाचे नुकसान झाले ते झाले.?? कारण पाऊसाने एक महिन्याच्या दडी मुळे उभेच सोयाबीन पिके करपली त्याबरोबर मागील तीन दिवसांपुर्वी धुई गेल्याने सोयाबीन पिके पुर्ण पिवळे होऊन पाण गळ होत आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यात येणार असे मुंगळा येथील माजी सरपंच उध्दव राऊत, संतोष बबन राऊत, सतीश जगदीश राऊत.माजी सरपंच डिगाबर पवार, गजानन केळे, प्रकाश राऊत पुरूषोत्तम बोबडे यांच्या नेतृत्वाखाली जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी मुंगळा येथील सर्व शेतकरी बांधवांनी जन आक्रोश मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नवीन नियुक्त्या

**वाशिम :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी – शरदचंद्र पवार पक्षाच्या संघटनात्मक बांधणीला अधिक बळकटी देण्यासाठी मालेगाव व वाशिम शहराध्यक्षांच्या नियुक्त्या करण्यात आल्या.

मालेगाव शहराध्यक्षपदी डॉ. दीपक जाधव, तर वाशिम शहराध्यक्षपदी गणेश मापारी यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या नियुक्तीप्रसंगी पक्षाचे जिल्हाध्यक्ष अमित पाटील खडसे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. वाशिम तालुकाध्यक्ष रमेश पाटील गोटे, मालेगाव तालुकाध्यक्ष सतीश पाटील जाधव, मानोरा तालुकाध्यक्ष राठोड, मंगरूळपीर तालुकाध्यक्ष राजेश टोपले, रिसोड तालुकाध्यक्ष सरनाईक यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत श्रीगणेशा आरोग्याचा



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगांव येथील तेली वेटाळ मालेगांव भव्य अश्या आरोग्य शिबिराचे आयोजन जनता गणेश मंडळ नवरंग गणेश मंडळ व महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना संलग्निक श्री गजानन बाल रुग्णालय मालेगांव यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीगणेशा आरोग्याचा आरोग्य अभियान २०२६ अंतर्गत आज दिनांक २० सप्टेंबर मंगळवार रोजी मोफत आरोग्य शिबीर व औषध वाटप यशस्वीपणे पार पडले असून यामध्ये १३० लोकांची अतिशय महागडी असलेली बी एम डी ही हाडाची तपासणी अगदी मोफत करण्यात आली. मालेगांव येथील ५६ वर्षांपासून सुरू असलेला तेली वेटाळ येथील जनता गणेश मंडळ येथे जनता गणेश मंडळ , नवरंग गणेश मंडळ व महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना संलग्निक श्री गजानन बाल रुग्णालय मालेगांव यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीगणेशा आरोग्याचा आरोग्य अभियान २०२६ अंतर्गत जनता गणेश मंडळ तेली वेटाळ मालेगांव येथे मोफत आरोग्य शिबीर व औषध वाटप शिबीर यशस्वीपणे पार पडला असून यामध्ये ५०० रुग्णांची मोफत तपासणी व औषधांचा वाटप करण्यात आल.

## तात्काळ सर्व शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्या: शिक्षक आ.किरण सरनाईक

**पावसाच्या खंडामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत सुखा दुष्काळ जाहीर**

■ प्रतिनिधी | वाशिम ■

अमरावती विभागात पावसाच्या मोठ्या खंडामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत तात्काळ सुखा दुष्काळ जाहीर करावा. तसेच सर्व प्रभावित शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत व पिक विमा लाभ उपलब्ध करून द्यावा अशी मागणी मा. श्री किरणरावजी सरनाईक यांनी अकोला येथील बैठकीत महाराष्ट्राचे कृषिमंत्री व वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. श्री दत्तामामा विदर्भातील बहुतांश शेती कोरडवाहू असून मोसमी पावसावर अवलंबून असते. खरीप हंगामात मागील दोन महिने योग्य पाऊस न पडल्याने पिके




सुकले आहेत व शेतकऱ्यांनी शेतीची मशागत व पेरणी करिता जो खर्च लावलेला आहे तोही वसूल होण्याची चिन्हे नाहीत.

तसेच पुरेसा पाऊस न पडल्याने पिण्याच्या पाण्याची समस्या व गुराढोरांसाठी चाऱ्याची समस्या भीषण होणार आहे. त्यामुळे या संदर्भात तात्काळ सर्वेक्षण करून सुखा दुष्काळ जाहीर करावा व दुष्काळाने प्रभावित झालेल्या सर्व शेतकऱ्यांना आवश्यक आर्थिक लाभ, व पिक विमा सहाय्य उपलब्ध करून द्यावे अशी मागणी श्री किरणरावजी सरनाईक यांनी केली आहे.या बैठकीला महाराष्ट्राचे कृषिमंत्री मा.ना. श्री दत्तामामा भरणे, आदिवासी विकास मंत्री श्री अशोकजी उईके, मा.श्री संजय राठोड,श्री इंद्रनील नाईक,संजय सावकारे, श्री आकाश फुंडकर तथा विभागातील इतर जिल्ह्यांचे पालकमंत्री, खासदार, आमदार, आयुक्त व जिल्हाधिकारी उपस्थित होते.

## पांडे गल्लीचा गणाधिश नवरंग गणेश मंडळाची २०२६ ची नवीन कार्यकारिणी जाहीर

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

पांडे गल्ली चा गणाधिश नवरंग गणेश मंडळाच्या सन २०२६ च्या नवीन कार्यकारिणीची नुकतीच घोषणा करण्यात आली. मागील वर्षी मंडळाने ध्वनिप्रदूषणाला आळा घालण्याच्या उद्देशाने तसेच महिलांना व बिमार नागरिकांना प्राधान्य देत डीजेमुक्त गणेश मंडळ साजरा केला होता. यंदाही गणेशोत्सव पारंपरिक, भक्तिमय, पर्यावरणपूरक आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्याचा निर्धार मंडळाच्या पदाधिकाऱ्यानी व्यक्त केला आहे. त्यानुसार नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून अध्यक्षपदी अमोल दंडगे , उपाध्यक्षपदी गणेश देशमुख ,सचिवपदी अक्षय सावले , सदस्यपदी राहुल भांडेकर , सदस्यपदी कार्तीक भांडेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.




नवीन कार्यकारिणी
अध्यक्ष :- अमोल दंडगे
उपाध्यक्ष :- गणेश देशमुख
सचिव :- अक्षय सावले
सदस्य :- राहुल भांडेकर
सदस्य :- कार्तिक भांडेकर

यंदाचा गणेश मंडळ डीजेमुक्त ठेवतानाच पर्यावरणपूरक उपक्रमांवर भर देण्यात येणार आहे. गणेश मंडळ माध्यमातून सामाजिक एकोपा, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा मंडळाचा प्रयत्न राहणार आहे.

## जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे पथनाट्य

■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण च्या कॉमन मिनिमम प्रोग्राम किमान निर्धारित कार्यक्रमा अंतर्गत वाशिम जिल्हा विधी सेवा प्राधिकरण च्या वतीने गणेशोत्सव दरम्यान विविध गणेश मंडळांसमोर पोक्सो कायदा जनजागृती, बाल विवाह प्रतिबंधक कायद्यावर जनजागृती पर व येत्या काळात १२ डिसेंबर रोजी होणाऱ्या लोक अदालत संदर्भात वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे पथनाट्य सादर करून वरील विषयांची जनजागृती होऊन कायद्याची योग्य अंमलबजावणी व्हावी या उद्देशाने सदर पथनाट्य सादर करण्यात येत आहे.



या पथनाट्याची सुरुवात दिनांक १६ सप्टेंबर रोजी देवपेठ स्थित महाराष्ट्र गणेशोत्सव मंडळ, १७ सप्टेंबर रोजी मंत्री पार्क येथील मंत्री पार्क गणेशोत्सव मंडळ, १८ सप्टेंबर रोजी वाशिम तालुक्यातील राधाकृष्ण गणेशोत्सव मंडळ कोंडाळा झामरे व १९ सप्टेंबर रोजी आडोळी येथील छत्रपती गणेशोत्सव मंडळ समोर पथनाट्य सादर केले जाणार आहे. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तसेच अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण श्री अनिल सुब्रमण्यम आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण चे सचिव श्री विठ्ठल चौखंडे यांच्या मार्गदर्शनात या पथनाट्यात विधी स्वयंसेवक सुशील भिमजियाणी, राजकुमार पडघाण, शाहीर उत्तम ओंकार इंगोले, मोतीराम खडसे, माधव डोंगरदिवे, प्रभू कांबळे, शीतल बन्सोड, संध्या सभादिंडे, माधव कोंडुजी गायकवाड, यांनी अभिनय केला आहे.

## २८ सप्टेंबर हा दिवस माहीती अधिकार दिन म्हणुन साजरा करा



■ प्रतिनिधी | वाशिम ■

माहिती अधिकार हा नागरिकांना हक्क प्रदान करणारा महत्त्वपूर्ण कायदा असून या कायद्याचा प्रसार व प्रचार करणे ही शासन प्रशासनाची जबाबदारी असल्याने या कायद्याचे महत्त्व व उपयोगिता सर्व शासकीय कर्मचारी तसेच सामान्य नागरिकांना व्हावे. म्हणून २८ सप्टेंबर हा दिवस माहिती अधिकार दिन म्हणून साजरा करण्यात यावा. अशी मागणी माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे कार्यकारी संघटक वाशिम जिल्हा माणिक खिमा डोंगरे यांच्यासह इतरांनी केली आहे. जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम येथे देण्यात आलेल्या निवेदनातून माणिक खिमा डोंगरे यांनी मागणी करताना शासन निर्णय क्रमांक केमा २००८ पत्र क्रमांक ३७८/०८६ सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई यांनी २० सप्टेंबर २००८ रोजी हा निर्णय घेतला असून सदर निर्णयानुसार दरवर्षी सर्व शासकीय कार्यालय येथे माहिती अधिकार दिन साजरा करण्याचे शासनाचे आदेश आहेत. या निर्णयानुसार माहिती अधिकार या विषयावर प्रश्नमंजुषा, चर्चासत्र, व्याख्यानमाला इत्यादी विविध उपक्रम साजरे करून तसेच प्रसिद्धी माध्यमातून प्रसिद्धी देऊन नागरिकांना या माहिती अधिकार दिन उपक्रमात सहभागी करून घ्यावे.

## गोवंश चोर-तस्करांना एलसीबीचा दणका!

### दोन वाहने, मोबाईलसह ९.२५ लाखांचा मुद्देमाल जप्त

■ प्रतिनिधी | अकोला ■

गोवंश चोरी आणि तस्करीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली. खदान, चान्नी आणि अकोट फाईल पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील तीन गुन्ह्यांचा समांतर तपास करत पोलिसांनी तीन आरोपींना ताब्यात घेतले असून, दोन चारचाकी वाहने, मोबाईलसह तब्बल ९ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

खदान आणि चान्नी परिसरातील गोवंश चोरीच्या घटनांचा तपास करताना पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासले. चोरीसाठी एकाच वाहनाचा वापर होत असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर तांत्रिक तपासाच्या आधारे मिर्झा शोएब बेग मिर्झा अझहर बेग (२६, रा. अकोट फाईल) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून होंडा अमेझ कार आणि मोबाईल असा ३ लाख २५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.आरोपीच्या चौकशीतून मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी एका ठिकाणी शोध



घेतला असता चोरीला गेलेली काळ्या रंगाची गाय मिळून आली. फिर्यादीने ओळख पटवल्यानंतर गाय त्याच्या ताब्यात देण्यात आली. या प्रकरणातील अन्य फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

**नाकाबंदीत तस्करीचा डाव उधळला**

दरम्यान, अकोट फाईल परिसरातील फातेमा हॉस्पिटलजवळ गुप्त माहितीच्या आधारे नाकाबंदी करण्यात आली. टाटा एस वाहनाची झडती घेतली असता दोन गोवंश दाटीवाटीने कोंबून दोरीने बांधलेल्या अवस्थेत आढळले.

याप्रकरणी मंगेश गजानन बाळापुरे (३२, रा. दर्यापूर) आणि शेख ऐफाज शेख एजाज (३०, रा. अकोट फाईल) यांना ताब्यात घेण्यात आले. वाहन व गोवंश असा ६ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोघांविरुद्ध अकोट फाईल पोलिस ठाण्यात प्राणी संरक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**यांनी केली कारवाई :**

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अतिरिक्त पोलीस अधीक्षक बी. रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या नेतृत्वाखाली निलेश देशमुख, गोपाल जाधव, विष्णु बोडखे, माजीद पठाण, अनिल चव्हाण तसेच पोलीस अंमलदार शेख हसन, उमेश पराये, सुलतान पठाण, फिरोज खान, भारकर धोत्रे, अमित दुबे, अब्दुल माजिद, रविंद्र खंडारे, महेंद्र मलिये, किशोर सोनवणे, खुशाल नेमाडे, मंगेश इंगळे, वसीमोद्दीन, एजाज अहमद, राहुल गायकवाड, स्वप्नील खेडकर, श्रीकांत पातोंड, अन्सार अहमद, राज चंदेल, आकाश मानकर, धीरज वानखडे, पवन डांबलकर, अभिषेक पाठक, मोहम्मद आमीर, सतीश पवार, अशोक सोनवणे, भीमराव दिपके तसेच चालक विनोद ठाकरे, प्रविण कश्यप, रामकिसन डोईफोडे, मनिष ठाकरे, देवानंद खरात आणि प्रकाश लोखंडे यांनी केली.

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २९८ ■ गुरुवार, २४ सप्टेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# सिंदीकरांचा लढा जिंकला; आता तालुक्याच्या दर्जासाठी नवा रणसंग्राम

**सिंदी रेल्वे जनमाध्यम :** नागपूर जिल्ह्याच्या सीमेवरील वर्धा जिल्ह्यातील सिंदी रेल्वेकरांच्या स्वतंत्र तालुक्याच्या मागणीला अखेर अप्पर तहसील कार्यालयाच्या मंजुरीचा दिलासा मिळाला आहे. मात्र तालुक्याचा दर्जा अद्याप दूर असल्याने या निर्णयामुळे सिंदीकरांचा संघर्ष संपलेला नाही. उलट या निर्णयाचे राजकीय श्रेय घेण्यासाठी हालचाली सुरू झाल्या आहेत.




महसूल व वन विभागाच्या २ एप्रिल २०२६ च्या शासन निर्णयानुसार सिंदी रेल्वे येथे अप्पर तहसीलदार कार्यालय कार्यान्वित करण्यास अंतिम मंजुरी देण्यात आली आहे. या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात सिंदी रेल्वे महसूल मंडळाचा समावेश राहणार आहे. त्यामुळे महसूलविषयक कामांसाठी नागरिकांची होणारी गैरसोय काही प्रमाणात कमी होण्याची शक्यता आहे.

आमदार समीर कुणावार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन सिंदी रेल्वेला तालुक्याचा दर्जा देण्याची मागणी केल्याचे सांगितले. शासन नियमानुसार प्रथम अप्पर तहसीलचा दर्जा देण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

त्यामुळे अप्पर तहसीलची मंजुरी ही सिंदीकरांच्या दीर्घ संघर्षाची पावती असल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत. तालुक्याचा पूर्ण दर्जा मिळेपर्यंत लढा सुरूच राहणार असल्याचा निर्धारही व्यक्त होत आहे.

### भरपावसातील आंदोलनाची दखल; तालुक्याची मागणी मात्र कायम - अतुल वांदिले


महसूल आणि प्रशासकीय कामांसाठी नागरिकांना सेलू येथे करावी लागणारी धावपळ थांबविण्यासाठी सिंदी रेल्वे येथे अप्पर तहसीलदार कार्यालय सुरू करण्याची मागणी अखेर मार्गी लागली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि नागरिकांनी केलेल्या सातत्यपूर्ण आंदोलनामुळे हा प्रश्न शासनदरबारी पोहोचल्याचा दावा पक्षाचे जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांनी केला आहे. २६ जुलै २०२४ रोजी वांदिले यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाला निवेदन देण्यात आले. मात्र निवेदनानंतरही मागणीची दखल न घेतल्याने २७ ऑगस्ट २०२४ रोजी भरपावसात प्रतीकात्मक तहसील कार्यालय उभारून आंदोलन करण्यात आले. या आंदोलनातून सिंदी रेल्वेकरांच्या प्रशासकीय सुविधेचा प्रश्न ऐरणीवर आणण्यात आला. त्यानंतरही शासन आणि प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवण्यात आल्याचे पक्षाकडून सांगण्यात आले.अप्पर तहसीलदार कार्यालयाच्या मंजुरीमुळे सिंदी रेल्वे परिसरातील नागरिकांना महसूलविषयक कामांसाठी होणारी गैरसोय कमी होणार आहे. मात्र स्वतंत्र तालुक्याचा दर्जा मिळणे हीच नागरिकांची मूळ मागणी असल्याने हा संघर्ष येथेच थांबणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले. हा विजय कोण्या एका व्यक्तीचा नसून नागरिकांच्या एकजुटीचा आहे. निवेदनानंतरही प्रश्न सुटला नाही म्हणून भरपावसात आंदोलन केले. नागरिकांच्या हक्काच्या प्रश्नासाठी संघर्ष थांबवणार नाही, अशी प्रतिक्रिया अतुल वांदिले यांनी दिली. या निर्णयामुळे सिंदीकरांच्या दीर्घ लढ्याला मिळालेला हा पहिला प्रशासकीय टप्पा असल्याची चर्चा आहे.


# शाळेतून थेट शेतात आणि काळाने हिरावल्या दोन चिमुकल्या बहिणी

## विहिरीत पडून दिव्या आणि उन्नतीचा मृत्यू, पाय घसरल्याचे पोलिसांचे प्राथमिक म्हणणे, नेमके कारण अद्याप गूढ

**सेलू जनमाध्यम :** शाळेतून बाहेरगावी जायचे असल्याचे सांगून वडिलांनी दोन चिमुकल्या मुलींना सोबत घेतले आणि थेट शेत गाठले. मात्र काही वेळातच कोलगाव शिवारातील एका विहिरीने दोन्ही बहिणींना आपल्या कवेत घेतले. या हृदयद्रावक घटनेत दिव्या सचिन साटोने वय ८ आणि उन्नती सचिन साटोने वय १० या बहिणींचा दुर्दैवी मृत्यू झाला. बुधवारी दुपारी ही घटना उघडकीस आल्यानंतर सेलू शहर सुन्न झाले.







दोन्ही मुली सेलूतील शाळांमध्ये शिक्षण घेत होत्या. वडिलांनी बाहेरगावी जायचे असल्याचे सांगून शाळेतून त्यांना सोबत घेतल्याची माहिती आहे. त्यानंतर त्या कोलगाव शिवारातील शेतात गेल्या. विहिरीजवळ पाणी पिण्यासाठी गेल्या असताना पाय घसरून दोघी विहिरीत पडल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे. शेतातील कुत्रा भुंकल्याने मुली घाबरल्या आणि त्यातून पाय घसरल्याची चर्चाही परिसरात आहे. मात्र नेमकी घटना कशी घडली याबाबत अद्याप अधिकृत निष्कर्ष समोर आलेला नाही.

मुली विहिरीत पडल्याचे लक्षात येताच वडिलांनीही विहिरीत उडी घेऊन त्यांना वाचविण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले जाते. घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. रुग्णमित्र प्रज्वल लटारे तसेच ठाणेदार पंकज वाघोडे आणि पोलिस कर्मचारी प्रशांत श्रीवास्तव राकेश देवगडे मंगेश राऊत नितीन डाखोळे यांनी घटनास्थळी दाखल होत नागरिकांच्या मदतीने दोन्ही मुलींचे मृतदेह विहिरीबाहेर काढले.

दोन्ही मृतदेह सेलू ग्रामीण रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. घटनेची नोंद घेण्यात आली असून पुढील तपास सेलू पोलीस करीत आहेत. घटनेमागचे नेमके कारण तपासानंतरच स्पष्ट होणार आहे.

### एकाच घरातील दोन चिमुकल्या गेल्या

साटोने कुटुंबाला तीन मुली असून मोठी मुलगी देवयानी सहाव्या वर्गात शिकते. ती गावातील गणपती कार्यक्रमासाठी गेल्याने तिचा या घटनेत समावेश झाला नाही. मात्र दोन बहिणींच्या अकाली जाण्याने साटोने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दिव्या आणि उन्नतीच्या मृत्यूची वार्ता कळताच नातेवाईक मित्रपरिवार आणि नागरिकांनी साटोने यांच्या घरी गर्दी केली. दोन चिमुकल्यांच्या जाण्याने संपूर्ण सेलू परिसरावर शोककळा पसरली आहे.

# लोडरचा जीवघेणा घाव : अंकूर सिड्समध्ये कामगाराचा बळी

## मशीन अंगावर कोसळून बाबाराव भोयर यांचा जागीच मृत्यू

### संतप्त कुटुंबीयांचा सावंगी ठाण्यात ठिय्या

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा-वायगाव मार्गावरील अंकूर सिड्स कंपनीत लोडर मशीन अंगावर पडल्याने ६० वर्षीय कामगाराचा जागीच मृत्यू झाला. बाबाराव केशवराव भोयर रा. करंजी भोगे असे मृत कामगाराचे नाव आहे. बुधवारी २३ सप्टेंबर रोजी दुपारी सुमारे १२ वाजता ही दुर्घटना घडली. या घटनेने कंपनीतील सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून संतप्त कामगार आणि मृताच्या कुटुंबीयांनी सावंगी पोलिस ठाण्यात ठिय्या देत कंपनी प्रशासनाविरोधात कारवाईची मागणी केली.



अंकूर सिड्समध्ये नेहमीप्रमाणे काम सुरू असताना अचानक लोडर मशीन बाबाराव भोयर यांच्या अंगावर कोसळले. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच सावंगी पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला.

दरम्यान कंपनी प्रशासनाने मृताच्या कुटुंबीयांना भरीव आर्थिक मदत द्यावी आणि निष्काळजीपणाबाबत कंपनी प्रशासनाविरोधात गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी संतप्तांनी पोलिस ठाण्यात ठिय्या दिला. मृताच्या कुटुंबीय आणि कंपनी प्रशासनातील वाटाघाटीनंतर गुरुवारी शवविच्छेदन करण्याचे ठरल्याची माहिती आहे.

# इंडिकेटर न देता ट्रेलरचे वळण; कारला धडक महिला जखमी

**वर्धा जनमाध्यम :** समृद्धी महामार्गावर इंडिकेटर न देता अचानक डावीकडे वळण घेणाऱ्या ट्रेलरने कारला धडक दिली. या अपघातात कारमधील पूजा मोहिते जखमी झाल्या. अपघातानंतर काही वेळातच कारने पेट घेतल्याने ती पूर्णपणे जळून खाक झाली. यात सुमारे १५ लाख रुपयांचे नुकसान झाले. ही घटना येळाकेळी परिसरात घडली. या प्रकरणी सावंगी पोलिसांनी ट्रेलरचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### कारने घेतला पेट १५ लाखांचे नुकसान

अमरावती जिल्ह्यातील चांदूर तालुक्यातील बागापूर येथील सूरज मोहिते वय २७ पत्नी पूजा मोहिते वय २० भाऊ अजय मोहिते आणि मित्र रूपम नाईक हे चौघे एमएच ३१ एफएक्स ०४१७ क्रमांकाच्या कारने डोंगरगड येथे देवदर्शनासाठी जात होते. येळाकेळी परिसरातील समृद्धी महामार्गावर एनएल ०१ ए १८१३ क्रमांकाचा ट्रेलर जात होता. चालकाने इंडिकेटर न देता अचानक डाव्या बाजूला वळण घेतल्याने कारची ट्रेलरला धडक बसली. यात पूजा मोहिते किरकोळ जखमी झाल्या. दरम्यान कारने अचानक पेट घेतला. काही वेळातच कार आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. सावंगी पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# हवामान बदलाच्या संकटात आधुनिक तंत्रज्ञानाची शिदोरी

**वर्धा जनमाध्यम :** हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर आधुनिक आणि शाश्वत शेती तंत्रज्ञानाची दिशा देणाऱ्या डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथील तीन दिवसीय शिवार फेरीला वर्धा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पोखरा मॉडेल व्हिलेज अंतर्गत आठही तालुक्यांतील शेतकरी उत्पादक गट महिला बचतगट युवक युवती आणि कृषी महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी झाले.



२५ एकर क्षेत्रावर ११० खरीप पिके २७ भाजीपाला ६५ फुलवर्गीय पिके आणि १५ तंत्रज्ञान शिफारसी अशी २२८ पीकवाणे व तंत्रज्ञानाची जिवंत प्रात्यक्षिके शेतकऱ्यांचे मुख्य आकर्षण ठरली. सघन कापूस लागवडीतील दफ्तरी २१२१ एकेए धवल एकेए ७ आणि सुवर्ण शुभ्रा तसेच सोयाबीनमधील पीडीकेव्ही अंबा आणि सुवर्ण सोया वाणांना शेतकऱ्यांनी पसंती दर्शविली. तुरीतील पंचगंगा वाणाचीही माहिती घेण्यात आली. जैविक खते गांडूळखत निर्मिती मिनी दाल मिल ऑईल मिल हळद लावणी व काढणी यंत्र कांदा चाळ आदी तंत्रज्ञानाची प्रात्यक्षिके पाहून शेतकऱ्यांनी माहिती घेतली. कमी पाणी कमी कालावधी आणि कमी कीड रोग प्रादुर्भावातून उत्पादन वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करण्याचा संकल्प शेतकऱ्यांनी केला.

# सेलूच्या ६२ गावांत सरपंचपदाचे आरक्षण जाहीर; राजकीय गणिते उलटणार

## ३२ पदे महिलांसाठी राखीव; ३१ ग्रामपंचायती सर्वसाधारण तर १४ ना.मा.प्र. प्रवर्गात

**सेलू जनमाध्यम :** सेलू तालुक्यातील ६२ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण अखेर निश्चित झाले असून गावागावातील राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे आहेत. २०२५ ते २०३० या पाच वर्षांच्या कालावधीसाठी बुधवारी २३ सप्टेंबर रोजी पंचायत समिती सभागृहात विशेष सभा घेण्यात आली. तहसीलदार डॉ. शकुंतला पाराजे यांच्या उपस्थितीत आरक्षणाची प्रक्रिया पूर्ण करून अंतिम यादी जाहीर करण्यात आली.



आरक्षणानुसार अनुसूचित जातीसाठी ८ ग्रामपंचायती असून त्यापैकी ४ सरपंचपदे महिलांसाठी राखीव आहेत. अनुसूचित जमातीसाठी ९ ग्रामपंचायती निश्चित करण्यात आल्या असून ५ पदे महिलांसाठी राखीव आहेत. नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी १४ ग्रामपंचायती असून ७ पदे महिलांसाठी आहेत. सर्वसाधारण प्रवर्गात ३१ ग्रामपंचायती असून त्यापैकी १६ सरपंचपदे महिलांसाठी राखीव आहेत. अशा प्रकारे ६२ पैकी तब्बल ३२ पदांवर महिलांना संधी मिळणार आहे.

अनुसूचित जाती प्रवर्गात वडगाव कला, धानोली मेघे, हिंगणी, रेहकी कला, मोई, जामणी, आमगाव खडकी आणि गरमसुर या ग्रामपंचायतींचा समावेश आहे. अनुसूचित जमाती प्रवर्गात चाणकी, हमदापूर, खैरी कामठी, घोराड, टाकळी झडशी, पळसगाव बाई, क्षिरसमुद्र, येळाकेळी आणि टाकळी किटे यांचा समावेश आहे.

ना.मा.प्र. प्रवर्गात सुरगाव, सेलडोह, वडगाव जंगली, अंतरगाव, कोपरा, जयपूर, जुवाडी, सालई कला, नानबर्डी, बोरी कोकाटे, हेलोडी, रिधोरा, दिंदोडा आणि बोंडसुला या ग्रामपंचायती आहेत. सालई पेवट आणि बाभुळगाव या ग्रामपंचायती अनारक्षित करून सर्वसाधारण प्रवर्गात समाविष्ट करण्यात आल्या.

सर्वसाधारण प्रवर्गात सुकळी बाई, आकोली, कान्हापूर, वडगाव खुर्द, तळोदी, वाहितपूर, खडका, केळझर, देऊळगाव, झडशी, दिग्रज, कोटंबा, चारमंडळ यासह ३१ ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

चिठ्ठीद्वारे आरक्षण निश्चित करण्याची गरज असलेल्या ग्रामपंचायतींसाठी आठ वर्षीय कार्तिक संतोष उरकुडे याच्या हस्ते चिठ्ठ्या काढण्यात आल्या. या प्रक्रियेनंतर आरक्षणाची अंतिम यादी निश्चित करण्यात आली. सभेचे इतिवृत्त आणि उपस्थित सदस्यांच्या स्वाक्षऱ्यांची प्रत जिल्हाधिकारी कार्यालयातील ग्रामपंचायत निवडणूक शाखेकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आली आहे. आरक्षण जाहीर होताच इच्छुक उमेदवारांच्या हालचालींना वेग आला असून गावागावातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# घरातून बेपत्ता इसमाचा विहिरीत मृतदेह

## पळसगावात मधुकर थुले यांच्या मृत्यूने खळबळ

**देवळी जनमाध्यम :** कोणालाही काहीही न सांगता घराबाहेर पडलेल्या इसमाचा मृतदेह गावातील विहिरीच्या पाण्यात आढळून आल्याने पळसगावात खळबळ उडाली. ही घटना २२ सप्टेंबर रोजी तालुक्यातील पळसगाव येथे घडली. मधुकर थुले वय ५२ असे मृत इसमाचे नाव आहे. याप्रकरणी देवळी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

मधुकर थुले हे २२ सप्टेंबर रोजी कोणालाही काहीही न सांगता घरातून निघून गेले होते. बराच वेळ उलटूनही ते घरी परतले नसल्याने कुटुंबीयांनी त्यांचा परिसरात शोध सुरू केला. मात्र त्यांचा ठावठिकाणा लागला नाही. दरम्यान गावातील गोपाल डफरे यांनी गावातील एका विहिरीच्या पाण्यात इसम पडल्याची माहिती दिली. ही माहिती मिळताच उमेश थुले यांनी घटनास्थळी धाव घेत विहिरीत पाहणी केली.

त्यावेळी पाण्यात आढळलेला मृतदेह हा त्यांचे काका मधुकर थुले यांचा असल्याचे स्पष्ट झाले. घटनेची माहिती देवळी पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत पंचनामा केला. उमेश थुले यांच्या तक्रारीवरून अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून मधुकर थुले यांच्या मृत्यूचे नेमके कारण शोधण्यासाठी तपास सुरू आहे.

# वर्ध्यात २० ब्रास रेतीसह १२.२० लाखांचा मुद्देमाल जप्त

### हिंगणघाटातील बोरखेडी रेतीघाटावर एलसीबीची कारवाई

**वर्धा जनमाध्यम :** अवैध रेती वाहतुकीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत हिंगणघाट तालुक्यातील बोरखेडी रेतीघाट परिसरातून दोन ट्रॅक्टर ट्रॉलींसह २० ब्रास रेती जप्त केली. या कारवाईत एकूण १२ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला.

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या निर्देशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध व्यवसायाविरोधात कारवाई करीत आहे. २३ सप्टेंबर रोजी पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे बोरखेडी रेतीघाट व वणा नदीपात्राच्या रस्त्यावर सापळा रचण्यात आला. यावेळी विनापरवाना रेती वाहतूक करणारे दोन महिंद्रा ५७५ डीआय ट्रॅक्टर आढळून आले.



पोलिसांनी आकाश बिंदुसागर बानमारे, किशोर दत्तुजी कुडमते आणि कुणाल मोरेश्वर येसंबरे यांच्याविरुद्ध हिंगणघाट पोलीस ठाण्यात रेती चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या पथकाने केली.

# सेलूच्या शेतशिवारात हातभट्टीवर धाड

## ४.१४ लाखांचा मुद्देमाल नष्ट; दोघांविरुद्ध गुन्हा

**सेलू जनमाध्यम :** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सेलू वडगाव शेतशिवारात बोर नदीजवळ गावठी दारू निर्मितीच्या ठिकाणी धडक कारवाई केली. २१ सप्टेंबर रोजी करण्यात आलेल्या या कारवाईत सुमारे २४७० लिटर मोहा सडवा रसायण आणि भट्टी साहित्य असा एकूण ४ लाख १४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. पोलिसांनी हा मुद्देमाल घटनास्थळीच नष्ट केला. या प्रकरणी कुणाल ऊर्फ केशव पचारे आणि धर्मराज पचारे दोघेही रा. वॉर्ड क्रमांक ४ सेलू यांच्याविरुद्ध सेलू पोलिस ठाण्यात दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्ह्यात अवैध दारू निर्मिती आणि विक्रीविरोधात कारवाई करण्याचे निर्देश पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी दिले होते. त्यांच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आली.



# सेवा संकल्प अभियानांतर्गत उद्या जिल्हाभर अवयवदान शिबिर

## जिल्हाधिकारी व सीईओंच्या उपस्थितीत होणार शुभारंभ

**वर्धा जनमाध्यम :** सर्वसामान्य नागरिकांना विविध शासकीय योजना, सेवांचा लाभ उपलब्ध करून देण्यासोबतच योजनांची जनजागृती करण्यासाठी सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. अभियानांतर्गत एकाच दिवशी दि.२५ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता जिल्हाभर अवयवदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी वान्मथी सी व मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांच्या उपस्थितीत या उपक्रमाचा जिल्हास्तरीय शुभारंभ होईल.

सेवा संकल्प अभियानांतर्गत विविध विभागांच्यावतीने विविध लोककल्याणकारी उपक्रम राबविण्यात येत आहे. अभियानात विविध सामाजिक उपक्रमांची देखील जोड देण्यात आली आहे.

त्यानुसार या अवयवदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. मृत्यूनंतर अवयवांचे दान केल्यास अनेक गरजूंना ते उपयोगी पडू शकतात. मागणीच्या तुलनेत अवयव कमी उपलब्ध होत असल्याने प्रत्येक गरजू व्यक्तीस अवयव उपलब्ध होत नाही. सामाजिक भावनेतून अवयवदान केल्यास मृत्यूनंतर अनेकांना दिलासा देण्याचे पुण्य प्राप्त होऊ शकते.

# पदार्पणातच आशियाई सुवर्णपदक जिंकणे अभिभूत करणारे : भारती फुलमाली

## भारती सुवर्णपदक जिंकणारी शहरातील दुसरी, तर पहिली महिला क्रिकेटपटू ठरली



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावतीची भारती फुलमाली ही २०२३ मध्ये चीनमधील हांगझोऊ येथे जितेश शर्मा नंतर आशियाई क्रीडा स्पर्धेत क्रिकेटमध्ये सुवर्णपदक जिंकणारी शहरातील दुसरी, तर पहिली महिला क्रिकेटपटू ठरली आहे. जपानमध्ये अंतिम सामन्यात भारतीय महिला संघाने श्रीलंकेवर दणदणीत विजय मिळवत २०२३ मध्ये प्रथम जिंकलेले विजेतेपद यशस्वीपणे राखले. या सुवर्णपदक विजेत्या भारतीय संघाची सदस्य आणि येथील संत गजानन महाराज क्रिकेट अकादमीची खेळाडू असलेल्या भारती फुलमाली हिने आज सायंकाळी जपानमधून प्रतिनिधीशी मनमोकळा संवाद साधला. या सुवर्णपदकामुळे आपण भारावून गेल्याचे तिने सांगितले.

आशियाई क्रीडा स्पर्धेत पदार्पणातच सुवर्णपदक जिंकल्याबद्दल कसे वाटते? या प्रश्नावर ती म्हणाली, खरोखरच खूप खास आणि प्रामाणिकपणे सांगायचे तर थोडे भारावून टाकणारे वाटते आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेत पदार्पण करून सुवर्णपदकासह परतणे ही गोष्ट मी नेहमीच जपून ठेवेन. याला आणखी खास बनवणारी गोष्ट म्हणजे अवघ्या १०-११ दिवसांत मला दोन अंतिम सामने खेळण्याची आणि दोन वेळा चॅम्पियन बनण्याची संधी मिळाली - प्रथम आशिया कप आणि आता आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक. त्यामुळे माझ्यासाठी आणि संघासाठी हे काही दिवस अविश्वसनीय ठरले आहेत.

माझ्या सहकारी खेळाडू, प्रशिक्षक, सपोर्ट स्टाफ आणि या संपूर्ण प्रवासात मला पाठिंबा देणाऱ्या प्रत्येकाची मी खूप आभारी आहे. एवढ्या मोठ्या बहु-क्रीडा स्पर्धेचा भाग बनणे आणि भारताचे प्रतिनिधित्व करणे हाच एक मोठा शिकण्याचा अनुभव होता आणि त्याची सांगता सुवर्णपदकाने होणे आणखी संस्मरणीय ठरले.

तुम्हाला फक्त दोनच संधी मिळाल्या, त्यातही फारसे यश नाही. याबद्दल काय सांगाल? या प्रश्नावर बोलतांना भारती म्हणाल्या, अर्थात, थोडी घबराट होतीच, कारण माझी पहिलीच आशियाई क्रीडा स्पर्धा होती आणि व्यासपीठ खूप मोठे होते. पण मला त्या दोन संधींकडे केवळ निकालाच्या दृष्टीने पाहायचे नाही. त्या संधींनी मला त्या स्तरावर खेळण्याचा मौल्यवान अनुभव दिला आणि मी आणखी चांगले काय करू शकते हे समजण्यास मदत केली.

माझ्यासाठी सर्वात मोठा धडा म्हणजे माझ्या तयारीवर विश्वास ठेवणे आणि नेहमी तयार राहणे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये संधी कधीही येऊ शकते, त्यामुळे तुम्हाला मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या तयार राहावे लागते.

सुवर्णपदक जिंकणे हा खेळाडू, प्रशिक्षक आणि सपोर्ट स्टाफ यांच्या सामूहिक प्रयत्नांचा परिणाम होता. प्रत्येकाने आपली भूमिका समजून घेतली आणि संपूर्ण स्पर्धेत एकमेकांना पाठिंबा दिला. त्या गटाचा भाग बनणे आणि एकत्रितपणे हा यशाचा अनुभव घेणे खूप खास होते.

तुम्हाला भारताकडून खेळण्याच्या अधिक संधी मिळतील असे वाटते का? यावर भारती म्हणाल्या, मला नक्कीच तशी आशा आहे. पण माझा विश्वास आहे की सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कठोर परिश्रम करत राहणे आणि संधी येईल तेव्हा तयार राहणे.

पुढील संधी कधी येईल यावर जास्त लक्ष केंद्रित करायचे नाही. माझे लक्ष माझा खेळ सुधारण्यावर, सातत्यपूर्ण कामगिरी करण्यावर आणि जेव्हा संधी मिळेल तेव्हा योगदान देण्यासाठी स्वतःला सर्वोत्तम स्थितीत ठेवण्यावर आहे. जेव्हाही मी भारताचे प्रतिनिधित्व करेन, तेव्हा मला माझे सर्वोत्तम द्यायचे आहे आणि संधीचे सोने करायचे आहे.

# गेल्या ३१,६२८ कोटींच्या पॅकेजचे काय झाले?

## मुख्यमंत्री दुष्काळ दौ-यावर असतानाच विजय वडेट्टीवार यांनी घेरले

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मराठवाड्यातील लातूर, धाराशिव आणि पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी भागाला भेट देत आहेत. दुष्काळाची भीषणता, दाहकता त्यांनी पाहिली. सरकार शेतक-यांच्या पाठीशी असल्याचे त्यांनी या दौ-यात जाहीर केले. त्याचवेळी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी पॅकेजवरून मुख्यमंर्त्यांना घेरण्याचा प्रयत्न केला. मागच्या ३१,६२८ कोटींच्या पॅकेजचे काय झाले? असा थेट सवाल त्यांनी फडणवीस यांना विचारला. ओला दुष्काळाचे पैसे आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेत उर्वरीत शेतक-यांना अद्याप लाभ न मिळाल्यावरून त्यांनी सरकारवर निशाणा साधला.७ ऑक्टोबर २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पॅकेजची घोषणा केली होती. ३१,६२८ कोटींच्या पॅकेजची घोषणा केली होती. गेल्या वर्षी अतिवृष्टीमुळे राज्यातील २९ जिल्ह्यातील २५३तालुक्यातील ६८.६९ लाख हेक्टर जमीन बाधित झाली होती. मोठे नुकसान झाले होते. शेतक-यांच्या हातातून पिके गेली होती.३१,६२८ कोटींच्या पॅकेजमधून सरकारने केवळ ९९ लाख रुपये दिले. गेल्या पॅकेजमध्ये सरकारने केवळ १५,६६१ कोटी रुपये खर्च झाला. म्हणजे इतकी मोठी घोषणा करून निम्मेच पैसे शेतक-यांच्या पदरात पडले. म्हणजे तुम्ही पॅकेजची घोषणा करणार, पण ते शेतक-यांच्या खात्यात, हातात गेले पाहिजेत ना, असा टोला विजय वडेट्टीवार यांनी लगावला.



**किमान ५० हजारांची मदत द्या**

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्रिमंडळ पाहणी दौरा करणार, फिरून येणार. पण शेतक-यांना तुम्ही काय देणार आहात. त्यांच्या डोळ्यांम अश्रू आहेत. ते पुसण्याचे काम सरकारने केले पाहिजे. ५० हजारांची किमान मदत केली पाहिजे. रोजगार हमीची कामं सुरू केली पाहिजेत. सर्व प्रकारचे कर्ज कर्ज माफ व्हावं. पीक कर्ज असेल वा इतर कर्ज माफ करा. शेतात काही पिकणारच नसेल तर शेतकरी कुठून भरपाई करणार. तातडीने पंचनामे करा. दुष्काळी स्थितीच्या पार्श्वभूमीवर तीन दिवसाचे विशेष अधिवेशन घेउन मदत पैकेजची घोषणा करा विजय वडेट्टीवार यांची मागणी कर्जातून शेतक-यांना मुक्त करावे. दोन लाखांपर्यंत कर्जमाफीची घोषणाही पोकळ निघाली. कोणताही शेतकरी कर्जातून मुक्त झाला नाही. शेतकरी कर्जमुक्त झाला नाही. त्याचा सातबारा अजून कोरा झाला नाही असा आरोप वडेट्टीवार यांनी केला.

**शक्तिपीठ महामार्गाची काय गरज?**

वाढवण बंदर प्रकल्पावरून त्यांनी सरकारवर निशाणा साधला. या प्रकल्पासाठी सरकारने साडेतेवीस हजार कोटींची निविदा काढली. हे बंदर सरकारने अदाणीला दिला. म्हणजे मालकी अदाणींची आणि सरकारच्या तिजोरीतून त्यासाठी पैसा दिला जाणार असा आरोप त्यांनी केला. हे पैसे शेतक-यांना द्या. शक्तिपीठ महामार्गाची काय गरज आहे. हा पैसा शेतक-यांकडे वळला तर दुष्काळावर मात करता येईल असे विजय वडेट्टीवार म्हणाले.

# अल निनोमुळे 6 महिन्यांत जगभरात 4,51,000 हून जास्त लोकांचा मृत्यू होण्याचा अंदाज





**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** प्रशांत महासागरात विकसित होत असलेला अल निनोमुळे सप्टेंबर २०२६ ते फेब्रुवारी २०२७ या काळात उष्णतेची तीव्र लाट येण्याचा इशारा देण्यात आला आहे. वाढलेल्या उष्णतेमुळे जगभरात ४,५१,००० पेक्षा जास्त माणसाचा मृत्यू होउ शकतो असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. जगभरातील उष्णतेशी संबंधित मृत्यूंचा सर्वाधिक फटका ग्लोबल साउथमधील देशांना बसण्याची शक्यता आहे. यात भारतातील मृत्यूचे अंदाजित आकडेही सांगण्यात आले आहेत.

क्लायमेट इम्पॅक्ट लॅबच्या एका नवीन रिपोर्टमध्ये हे अंदाज वर्तवण्यात आले आहेत. क्लायमेट इम्पॅक्ट लॅब हे हवामान बदल आणि अत्यंत प्रतिकूल हवामानाचा जगभरातील लोक, अर्थव्यवस्था आणि समुदायांवर कसा परिणाम होतो, याचा अभ्यास करण्यासाठी हवामान विज्ञान, अर्थशास्त्र आणि डेटा विश्लेषणाची सांगड घालणारे एक संशोधन संस्था आहे.संस्थेने वर्तवलेला हा अंदाज म्हणजे आधीच नोंदवल्या गेलेल्या मृत्यूंची भविष्यवाणी नाही, तर १९९६-२०२५ या कालावधीला ग्रहित धरून एका सरासरी वर्षात संशोधकांना जेवढ्या मृत्यूंची अपेक्षा असते, त्या तुलनेत उष्णतेशी संबंधित हा अतिरिक्त मृत्यूदर दर्शवतो.एकट्या सहारा वाळवंटी प्रदेशात उष्णतेमुळे ६६,८०० अतिरिक्त मृत्यू होण्याची शक्यता आहे. यात नायजेरियात सर्वाधिक ३१,४०० हजार मृत्यू होण्याचा अंदाज आहे. सुदानमध्ये १७,५००, नायजरमध्ये १०,००० आणि चाडमधील ८,००० मृत्यूंचा समावेश आहे.दक्षिणपूर्व आशियामधील फिलीपिन्स, व्हिएतनाम, थायलंड आणि कंबोडियामध्ये मिळून १९,४०० अतिरिक्त मृत्यू होउ शकतात, तर इंडोनेशियामध्ये १९,३०० मृत्यूंची नोंद होण्याचा अंदाज आहे. रिपोर्टनुसार, ब्राझीलमध्ये १३,३००, तर भारतात १५,८०० हजारांहून अधिक लोकांचा मृत्यू होण्याचा अंदाज आहे.

क्लायमेट इम्पॅक्ट लॅबने असेही म्हटले आहे की, या अंदाजामुळे सरकारांना उष्णतेचे इशारे, कुलिंग सेंटर्स, हायड्रेशन सुविधा, बाहेर काम करणा-या कामगारांसाठी संरक्षण आणि आरोग्य व्यवस्था बळकट करणे यासारख्या उपाययोजनांवर लक्ष केंद्रित करण्यास मदत होउ शकते.अल निनो अजून सर्वोच्च शिखरावर पोहोचलेला नाही. जागतिक हवामान संघटनेने ३ सप्टेंबर रोजी सांगितले की, ही स्थिती आता पूर्णपणे प्रस्थापित झाली आहे आणि ती आणखी तीव्र होण्याची शक्यता असून, नोव्हेंबर-डिसेंबरच्या आसपास त्याची तीव्रता सर्वोच्च पातळीवर पोहोचण्याचा अंदाज आहे.ज़्ग्र ने असेही म्हटले आहे की, फेब्रुवारी २०२७ पर्यंत अल निनो कायम राहण्याची शक्यता जवळपास १०० टक्के आहे. अमेरिकेच्या नॅशनल ओशियानिक अँड अटमस्फेरिक अडमिनिस्ट्रेशनच्या अलिकडेच्या मूल्यांकनानुसार, नीनो ३.४ प्रदेशातील समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान सामान्यपेक्षा १.८ सेल्सिअसपेक्षा अधिक असल्याचे दिसून आले आहे, तर पूर्व विषुववृत्तीय पॅसिफिकमध्ये हे तापमान सामान्यपेक्षा ३ सेल्सिअसने अधिक होते. रिपोर्ट तयार करणा-या संशोधकांनी म्हटले आहे की, 'सध्याच्या ६-महिन्यांच्या अंदाजाच्या पलीकडे (जो फेब्रुवारी २०२७ पर्यंत आहे) विचार करता, आम्हाला अपेक्षा आहे की उत्तर गोलार्धातील भारत आणि पाकिस्तानसारख्या प्रमुख देशांमध्ये पुढील उन्हाळ्यापर्यंत उष्णतेमुळे होणा-या मृत्यूंमध्ये वाढ होत राहील.' या विश्लेषणात असाही इशारा देण्यात आला आहे की उष्णतेमुळे होणारे मृत्यू २०२७ पर्यंत वाढत जाण्याची शक्यता आहे, विशेषत? जेव्हा भारत आणि या प्रदेशातील इतर देश पुढील उन्हाळ्यात प्रवेश करतील.

# यूपीत दुसरीच्या विद्यार्थिनीचा बसल्या बसल्या मृत्यू

## शाळा मॅनेजरचा दावा- गणेश विसर्जन मिरवणुकीत डीजे वाजत होता, मोठ्या आवाजामुळे जीव गेला

**बलरामपूर**-बलरामपूरमध्ये वर्गात बसलेल्या इयत्ता-२ मधील विद्यार्थिनीचा मृत्यू झाला. मुलगी अचानक आपल्या जागेवरून उभी राहिली आणि नंतर खाली कोसळली. काही वेळाने ती पुन्हा सावरली, मात्र त्यानंतर बेशुद्ध होउन पडली. त्यानंतर ती उठलीच नाही. हे पाहून शिक्षकांनी मुलीला रुग्णालयात नेले, तेथे ड?क्टरांनी तिला मृत घोषित केले. या संपूर्ण घटनेचे सीसीटीव्ही फुटेजही समोर आले आहे.दरम्यान, शाळा व्यवस्थापनाचे म्हणणे आहे की, ही घटना घडली त्यावेळी शाळेजवळ गणेश विसर्जनाची मिरवणूक निघाली होती. त्यात मोठ्या आवाजात डीजे वाजत होता. त्याच्या तीव्र आवाजामुळेच मुलीची प्रकृती खालावली आणि तिचा मृत्यू झाला. ही घटना सोमवारी सकाळी ११ वाजता डिवाइन पब्लिक स्कूलमध्ये घडली. गुलहरिया गावचे रहिवासी सोनू तिवारी



बलरामपूरमध्ये भाड्याने राहतात. त्यांची एकुलती एक मुलगी वैष्णवी तिवारी (७) सोमवारी डिवाइन पब्लिक स्कूलमध्ये शिकण्यासाठी गेली होती. सकाळी सुमारे १०:५८ वाजता ती वर्गात होती. ती हसत होती आणि इतर मुलांशी बोलतही होती. वैष्णवी पूर्णपणे सामान्य दिसत होती.सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसत आहे की शाळेच्या बाजूने डीजे जात आहे. काही लोक नाचत पुढे जात आहेत. डीजेचा आवाज ऐकून वर्गात बसलेली मुलेही काही वेळ नाचू लागतात. यादरम्यान मुलगीही आपल्या जागेवरून उठते, मात्र पुन्हा आपल्या जागेवर बसते. एकदा ती अडखळते, पण एका सेकंदात स्वतःला सावरून पुन्हा बसते. मात्र, काही सेकंदांनंतर ती पुन्हा खाली पडली आणि यावेळी उठू शकली नाही.

**डीजेच्या आवाजामुळे वर्गात बसलेली मुलेही नाचू लागली होती.**

जेव्हा वर्गशिक्षिकेची नजर वैष्णवीवर पडली, तेव्हा त्या धावत तिच्याजवळ पोहोचल्या. तिला उचलून आसनावर बसवण्याचा प्रयत्न केला. मात्र, वैष्णवी उठली नाही. त्यानंतर त्यांनी एका मुलाला पाठवून शाळेतील कर्मचा-यांना बोलावले. शिक्षकांनी मिळून वैष्णवीला सावरले आणि शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न केला. सुमारे २ मिनिटांपर्यंत वैष्णवी शुद्धीवर न आल्याने तिला जिल्हा मेमोरियल रुग्णालयात नेण्यात आले. यावेळी शाळेतील कर्मचारी आणि वैष्णवीचे कुटुंबीयही तिच्यासोबत होते. रुग्णालयात डाक्टरांनी तिची नाडी तपासली; मात्र तोपर्यंत तिचा मृत्यू झाला होता.

# होर्मुझ समुद्रात जहाजावर क्षेपणास्त्र हल्ला;

## भारतीय खलाशाचा मृत्यू, सागरी सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

**नवी दिल्ली:** ओमानच्या किनारपट्टीजवळ होर्मुझ समुद्रात एक अत्यंत दुर्दैवी आणि खळबळजनक घटना घडली आहे. येथील एका मालवाहू जहाजावर टार्पिडोहल्ला झाल्याची पुष्टी झाली असून, या भीषण हल्ल्यात उत्तर प्रदेशमधील देवरिया येथील एका भारतीय खलाशाचा मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे सागरी सुरक्षा आणि खलाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अँटिगुआ आणि बारबुडाचा झेंडा असलेला एमव्ही केप डाओ हा मालवाहू जहाज होर्मुझमधून भारताच्या दिशेने येत होता. यादरम्यान बुधवारी या जहाजावर संशयितपणे दोन टॉर्पिडो हल्ले झाले. पहिला हल्ला जहाजाच्या डाव्या बाजूच्या राहत्या भागावर झाला, तर दुसरा



हल्ला थेट इंजिन कक्षात झाला.या भीषण हल्ल्यानंतर जहाजाला आग लागली आणि त्याची वीज पुरवठा यंत्रणा व दिशा नियंत्रित करण्याची क्षमता पूर्णपणे कोलमडली. ओमानच्या तटरक्षक दलाने प्रसंगावधान दाखवत जहाजावरील कर्मचा-यांना सुखरूप बाहेर काढले. या जहाजावर एकूण २८ खलाशी होते, पैकी २० भारतीय नागरिक असल्याची माहिती समोर आली आहे.या हल्ल्यात जहाजावर 'वायपर' म्हणून कार्यरत असलेले उत्तर प्रदेशच्या देवरिया जिल्ह्यातील रहिवासी सूरज यादव यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली, ज्यामुळे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेची माहिती मिळताच त्यांच्या कुटुंबीयांवर व गावावर शोककळा पसरली आहे. सागरी प्रशासनाकडून त्यांच्या कुटुंबीयांना या घटनेची अधिकृत माहिती देण्यात आली आहे. याशिवाय, एका भारतीय अभियंताला किरकोळ दुखापत झाल्याची माहितीही समोर आली आहे.या हल्ल्यानंतर 'फारवर्ड सीमेन युनियन ऑफ इंडिया' या संघटनेने तीव्र चिंता व्यक्तकेली आहे. होर्मुझ आणि परिसरातील सागरी क्षेत्रात काम करणारे नागरिक खलाशी सतत धोक्याच्या छायेत असल्याचे संघटनेने म्हटले आहे. तसेच, या हल्ल्याची जबाबदारी निश्चित करून सूरज यादव यांच्या कुटुंबाला योग्य तो न्याय मिळवून देण्याची मागणी करण्यात आली आहे. खलाशांच्या सुरक्षेच्या निषेधार्थ २५ नोव्हेंबर रोजी नाविक काळ्या पट्टी बांधून विरोध दर्शवणार असल्याची घोषणाही युनियनने केली आहे.

# जिल्हा नियोजन समितीत अल्पसंख्याकांसाठी स्वतंत्र निधी; वहिद पटेल यांची माहिती

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील अल्पसंख्याक घटकांच्या विकासासाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीत स्वतंत्र तरतूद करण्यासाठी मुस्लिम अधिकार परिषदेचे अध्यक्ष वहीद पटेल यांनी पाठपुरावा केला होता. मुंबई येथे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची मंगळवारी वहीद पटेल यांनी भेट घेउन या मागणीचा पुन्हा पाठपुरावा केला. यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी यापुढे जिल्हा नियोजन समितीच्या निधीत अल्पसंख्याक घटकांसाठी स्वतंत्र निधी राखीव ठेवण्यात येणार असल्याची माहिती दिल्याचे मुस्लिम अधिकार परिषदेच्या वतीने सांगण्यात आले.या स्वतंत्र निधीमुळे अल्पसंख्याकबहुल वस्त्यांमधील रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य तसेच इतर मूलभूत आणि समाजोपयोगी विकासकामांना निधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. जिल्हा नियोजन समितीमार्फत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती घटकांच्या विकासासाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात स्वतंत्र निधीची



तरतूद करण्यात येते. त्यासाठी स्वतंत्र लेखाशीर्षही उपलब्ध आहे. मात्र, अल्पसंख्याक समाजासाठी अशा प्रकारची स्वतंत्र आर्थिक तरतूद किंवा स्वतंत्र लेखाशीर्ष उपलब्ध नसल्याने अल्पसंख्याकबहुल भागातील विविध विकासकामांना निधी उपलब्ध करून देताना अडचणी येत होत्या.अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जिल्हा नियोजन समितीच्या निधीत स्वतंत्र तरतूद करावी आणि त्यासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष निर्माण करावे, अशी मागणी मुस्लिम अधिकार परिषदेच्या वतीने दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे करण्यात आली होती. त्यानंतर विद्यमान उपमुख्यमंत्री तथा अल्पसंख्याक विकास मंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडेही या मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता. उपमुख्यमंत्र्यांनी उपरोक्त मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिल्याने अल्पसंख्याक घटकाच्या विकास कामांसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होण्यास मदत होणार असून या निर्णयाबद्दल समाधान व्यक्त होत आहे.

# प्रसूतीदरम्यान माता व नवजात बालकाचा मृत्यू; रुग्णालयात तणाव

**चंद्रपूर :** बल्लारपूर शहरातील एका नामांकित रुग्णालयात प्रसूतीदरम्यान माता आणि नवजात बालकाचा मृत्यू झाल्याची घटना बुधवारी (२३ सप्टेंबर) घडली. या घटनेनंतर रुग्णालय परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, बल्लारपूर पोलिस ठाण्याचे ठाणेदार विपिन इंगळे यांनी घटनास्थळी धाव घेत मध्यस्थी केल्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आली.मृत महिलेचे पती रणधीर कुमार सिंह यांच्या तक्रारीवरून बल्लारशाह पोलिसांनी सध्या आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. मृतदेह बल्लारपूर ग्रामीण रुग्णालयामार्फत चंद्रपूर येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे. शवविच्छेदन अहवाल तसेच संबंधित सिव्हिल सर्जन यांच्या अहवालानंतर पुढील कायदेशीर



कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. मृत महिलेचे नाव नीलम कुमारी सिंह (३४) असून त्यांचे पती रणधीर कुमार सिंह हे मध्य रेल्वेच्या बल्लारशाह स्थानकात लोको पायलट म्हणून कार्यरत आहेत. नीलम कुमारी यांच्यावर गर्भावस्थेपासून संबंधित रुग्णालयात नियमित उपचार सुरू होते.

डाक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांना २२ सप्टेंबर रोजी दुपारी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.२३ सप्टेंबरच्या पहाटे सुमारे चार वाजता त्यांना प्रसूतीकळा सुरू झाल्यानंतर प्रसूती प्रक्रिया सुरू करण्यात आली. नैसर्गिक प्रसूतीनंतर सुमारे एका तासाने नवजात बालकाचा मृत्यू झाला. त्यानंतर काही वेळातच नीलम कुमारी यांचाही मृत्यू झाला.

डाक्टरांचे म्हणणे-रुग्णालयातील डाक्टरांच्या माहितीनुसार, नवजात बालकाच्या गळ्याभोवती नाळ गुंडाळल्याने त्याला पुरेसा ऑक्सिजन मिळू शकला नाही. त्यामुळे बालकाचा मृत्यू झाल्याचे डाक्टरांनी सांगितले. त्यानंतर नीलम कुमारी यांचा रक्तद्राब अत्यंत कमी झाल्याने त्यांची प्रकृती गंभीर झाली. परिस्थिती लक्षात घेउन चंद्रपूर येथून दोन तज्ज्ञ डाक्टरांना तातडीने पाचारण करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांना वाचवता आले नाही. उपचारादरम्यान रुग्णालयाकडून कोणतीही निष्काळजीपणा झालेला नसल्याचा दावा संबंधित डाक्टरांनी केला आहे.

# १५ वर्षांच्या गर्भवतीने दिला तीन किलोच्या बाळाला जन्म

**भंडारा :** अवघ्या पंधरा वर्षांच्या अल्पवयीन मुलीने तीन किलो वजनाच्या बाळाला जन्म दिल्यानंतर तिचा प्रसुती पश्चात मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना भंडारा येथे समोर आली आहे.मंगळवारी (२२ सप्टेंबर) जिल्हा सामान्य रुग्णालयात ही प्रसूती झाल्याची माहिती आहे. प्रसूतीनंतर तिची प्रकृती बिघडल्याचे सांगण्यात येत असून त्यानंतर तिचा मृत्यू झाला. मात्र, मृत्यूचे नेमके कारण काय, प्रसूती सामान्य झाली की शस्त्रक्रियेद्वारे, तसेच उपचारादरम्यान नेमकी कोणती वैद्यकीय गुंतागुंत निर्माण झाली, याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही.छत्तीसगडमधून रोजगाराच्या शोधात अनेक कुटुंबे महाराष्ट्रात येउन विविध ठिकाणी मजुरीची कामे करतात. त्यापैकीच एक कुटुंब नागपूर जिल्ह्यातील मौदा तालुक्यातील अरोली येथे वास्तव्यास आले होते. या कुटुंबात संबंधित अल्पवयीन मुलगी तिच्या आई-वडील आणि भावासोबत राहत होती. त्याच परिसरात छत्तीसगडमधून आलेला २१ वर्षीय तरुणही वास्तव्यास होता. कार्तिक अर्जुन कुरवे, छत्तीसगड, मु. पो. अरोली, जि. नागपूर असे या २१ वर्षे आरोपी तरुणाचे नाव आहे. मृतक अल्पवयीन मुलगी आणि आरोपी तरुण एकाच राज्यातील असल्यामुळे त्यांची एकमेकांशी ओळख होती. पुढे त्यांच्यात प्रेमसंबंध निर्माण झाले.या प्रेम संबंधातून अल्पवयीन मुलीला गर्भधारणा झाल्याची माहिती आहे. सोमवारी या अल्पवयीन मुलीला प्रसुती कळा सुरू झाल्यानंतर तिला भंडारा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## प्रसूतीनंतर अल्पवयीन मातेचा मृत्यू

विशेष म्हणजे, मुलीला जिल्हा रुग्णालयात आणण्यात आले त्यावेळी आरोपी कार्तिक कुरवे हा तिच्यासोबत असल्याची माहिती आहे.मंगळवारी जिल्हा सामान्य रुग्णालयात तिची प्रसूती झाली आणि तिने तीन किलो वजनाच्या बाळाला जन्म दिला. नवजात बाळ अत्यंत सुदृढ असल्याची माहिती आहे. मात्र, प्रसूतीनंतर अल्पवयीन मातेची प्रकृती बिघडली आणि तिचा मृत्यू झाला आहे.या प्रकरणाबाबत भंडारा वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डा. सुजाता दुधगावकर यांच्याशी संपर्क साधून संबंधित अल्पवयीन तरुणीच्या प्रसूतीची पद्धत, प्रसूतीवेळी उपस्थित असलेले डाक्टर, प्रसूतीनंतर निर्माण झालेली वैद्यकीय गुंतागुंत तसेच मृत्यूचे नेमके कारण याबाबत विचारणा केली. मात्र, याप्रकरणी कोणत्याही प्रकारची माहिती देण्यास त्यांनी नकार दिला. प्रसूतीच्या वेळी नेमकी कोणती वैद्यकीय गुंतागुंत निर्माण झाली? प्रसूतीच्या वेळी कोणते डाक्टर उपस्थित होते? प्रसूतीपूर्वी तिची वैद्यकीय तपासणी कोणत्या रुग्णालयात झाली होती? जिल्हा रुग्णालयात दाखल झाल्यानंतर तिच्यावर कोणते उपचार करण्यात आले? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, तीन किलोच्या बाळाला जन्म दिल्यानंतर अल्पावधीतच तिचा मृत्यू नेमका कशामुळे झाला? या प्रश्नांची उत्तरे सध्या अधिकृतरीत्या उपलब्ध झालेली नाहीत. शवविच्छेदन अहवाल, वैद्यकीय नोंदी आणि उपचाराची कागदपत्रे समोर आल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# महागाईचा दुहेरी फटका

१४ सप्टेंबर २०२६ रोजी जाहीर झालेल्या सरकारी आकडेवारीने महागाईच्या चर्चेला नवा रंग दिला आहे. किरकोळ महागाई दर ४.८२ टक्क्यांवर गेला आहे, तर घाऊक महागाई दर तब्बल ९.९२ टक्क्यांवर पोहोचला आहे. हा गेल्या अनेक महिन्यांतील उच्चांक आहे.वरवर पाहता किरकोळ महागाई रिझर्व्ह बँकेच्या २ ते ६ टक्के या टॉलरन्स बँडमध्येच आहे, त्यामुळे घाबरण्याचे कारण नाही असं वाटेल. पण खरी गोष्ट या दोन आकड्यांमधल्या ५.१० टक्क्यांच्या प्रचंड तफावतीत आहे.ही तफावत धोक्याची घंटा आहे.ऑगस्टमध्ये अन्नमहागाईचा दर ७.०५ टक्क्यांवर पोहोचला. जुलैमध्ये तो ६.६५ टक्के होता. उत्पादित वस्तूंच्या गटातील डब्ल्यूपीआय महागाईचा दर मालिकेतील उच्चांकी पातळीवर म्हणजे ८.३७ टक्क्यांवर गेला. जुलैमध्ये हा दर ८.२९ टक्के होता.इंधन आणि वीज गटातील घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित महागाईचा दर ऑगस्टमध्ये २२.९३ टक्के झाला. जुलैमध्ये तो २०.०५ टक्के होता.दुष्काळाचा दाह वाढत असताना महागाईचे चटकेही देशभरातील देशभरातील जनतेला चांगलेच बसत आहेत. देशात खाद्य पदार्थांचेच दर वाढले, की महागाईबाबत ओरड सुरू होते. इतर वस्तू-उत्पादने, सेवा यांचे दराचा कितीही भडका उडाला तरी कोणी 'ब्र' देखील काढत नाही. याला काही वेळ घरगुती गॅस तसेच पेट्रोल, डिझेल अपवाद राहिले आहे. आताही गेल्या महिनाभरात मसाले, डाळी, खाद्यतेलाच्या किमतीत मोठी वाढ झाल्याने काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी केंद्र सरकारवर टीकास्त्र सोडले आहे. त्याच वेळी बाजारातून नित्योपयोगी कोणतीही वस्तू-उत्पादन घ्या, या सर्वांचे दर प्रचंड वाढलेले आहेत. परंतु शेतीमाल, खाद्य पदार्थांचे वाढलेले दरच सर्वांच्या डोळ्यांत खुपतात. सरकारही शेतीमाल, खाद्यपदार्थ यांचे दर नियंत्रणात ठेवण्यासाठी तत्काळ बाजारात हस्तक्षेप करते. पर्यायाने शेतीमालाचे दर पडून त्याचा फटका मात्र उत्पादक शेतकऱ्यांना बसत आला आहे. वाढत्या महागाईचा मार गरीब तसेच मध्यमवर्गीय कुटुंबांना अधिक बसतो. त्यामुळे महागाई नियंत्रणात राहिली पाहिजे, यात दुमत असण्याचे कारण नाही. परंतु हे दर नियंत्रणाचे काम केवळ शेतीमाल, खाद्यपदार्थ याबाबत नव्हे, तर सर्वच वस्तू-उत्पादनांबाबत घडायला हवे. आगामी काळ हा सणासुदीचा आहे. इतरही अनेक घटक महागाई वाढीस पोषकच दिसत आहेत. त्यामुळे गरीब मध्यमवर्गीय कुटुंबावरील आर्थिक भार वाढतच जाणार आहे. इंधनाचे दर सातत्याने वाढत आहेत. त्यामुळे शेतीमालासह कंपनी उत्पादनांचा वाहतूक खर्च वाढणार आहे. देशावर दुष्काळाचे सावट आहे. कमी पाऊसमानामुळे उत्पादन घटून पुरवठा मर्यादित राहू शकतो. युद्धामुळे भू-राजकीय तणाव वाढत आहे. आयात-निर्यात विस्कळीत झाली आहे. टेरिफ वॉरचा फटक्याने देखील वस्तूंच्या मागणी-पुरवठ्यात तफावत येऊन महागाई वाढत आहे.महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्र राज्य सरकारसह रिझर्व्ह बँककडून देखील दीर्घकालीन, शाश्वत उपायांऐवजी अल्पकालीन, अशाश्वत उपायांवरच भर दिला जात आहे. मागील काही महिन्यांपासून रेपो रेट 'जैसे थे' ठेवण्यावर रिझर्व्ह बँकेचा भर दिसतो. यामुळे कर्जावरील व्याज वाढत नाही आणि सर्वसामान्यांना दिलासा मिळतो. शेतीमाल अथवा खाद्यान्न महागाईच्या बाबतीत बोलायचे झाले तर त्यावर नियंत्रणासाठी सरकार तातडीची आयात, निर्यात निर्बंध अथवा बंदी, साठेबाजीवर कारवाई अशी पावले उचलली जातात. परंतु येथून पुढे वाढत्या नैसर्गिक आपत्ती तसेच कायमच युद्धजन्य परिस्थिती यामुळे जागतिक बाजारात अनिश्चितता वाढली आहे. त्यामुळे खाद्य पदार्थांच्या महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे लागेल. पिकांची उत्पादकता, पर्यायाने उत्पादन वाढल्यावर त्याचा बाजारात सुरळीत पुरवठा होण्यासाठी, साठवणूक, वितरण, विक्री व्यवस्था बळकट करावी लागेल. कंपनी उत्पादनांबाबत देखील याच धोरणाचा अवलंब करावा लागेल. कर रचनेत बदल करून देखील महागाई नियंत्रणात आणता येते. पेट्रोल, डिझेल तसेच इतर जीवनावश्यक वस्तूंवरील कर कमी केल्यास उत्पादन क्षेत्राबरोबर सर्वसामान्य ग्राहकांना देखील महागाईत दिलासा मिळू शकतो. महागाईवर मात करण्यासाठी वैयक्तिक पातळीवरही देखील काही उपाय केले जाऊ शकतात. त्यात प्रामुख्याने इंधनाच्या वापरावर मर्यादा, अनावश्यक चैनीच्या वस्तूंची खरेदी टाळणे आणि एकंदरीतच खर्चाचे काटेकोर नियोजन केले तर महागाईचा भार थोडा कमी होऊ शकतो.आजच्या आधुनिक युगात माणसाच्या गरजा जितक्या वेगाने वाढत आहेत, तितक्याच वेगाने 'महागाई' देखील वाढत आहे. यावर दोन्ही सरकारांनी योग्य उपाययोजना कराव्यात हिच अपेक्षा.

# ध्येय सक्षम अन् शाश्वत अर्थव्यवस्थेचे

**सरकारी अनुदान आवश्यक आहे; पण अनुदानावर कायम अवलंबून राहणारी अर्थव्यवस्था सक्षम अर्थव्यवस्था होऊ शकत नाही. म्हणून भारताचा पुढील विकासमंत्र स्पष्ट असला पाहिजे - 'अनुदानापासून उत्पादकतेकडे, संरक्षणापासून सक्षमीकरणाकडे आणि लाभार्थ्या पासून उद्योजकाकडे.'**

भारताने गरिबांना संरक्षण देणाऱ्या योजनांची मोठी व्यवस्था उभी केली आहे; आता या व्यवस्थेचा पुढील टप्पा 'लाभार्थी निर्माण करण्यापेक्षा सक्षम नागरिक निर्माण करणे', असा असला पाहिजे. सामाजिक सुरक्षा बंद करणे हा त्याचा अर्थ नाही. उलट, ज्यांना आधाराची खरोखर गरज आहे त्यांना तो मिळत राहिला पाहिजे; परंतु सरकारी मदतीचा मोठा भाग हळूहळू उत्पादक मालमत्ता, कौशल्य, तंत्रज्ञान, रोजगार आणि उद्योजकतेशी जोडला पाहिजे. अन्नसुरक्षा त्याचे पहिले उदाहरण आहे. सुमारे ८० कोटी लोकांना मोफत धान्य देणे हे गरिबांसाठी महत्त्वाचे संरक्षण आहे; मात्र दीर्घकालीन दृष्टीने अन्नधान्य वितरणाबरोबर पोषण, रोजगार आणि उत्पन्ननिर्मितीवर भर असला पाहिजे. भविष्यात पात्र लाभार्थ्यांसाठी अन्न कूपनासारख्या पर्यायांचा विचार करता येईल. त्यामुळे कुटुंबांना त्यांच्या गरजेनुसार अन्न निवडण्याचे स्वातंत्र्य मिळू शकते आणि धान्यकेंद्रित व्यवस्थेतून पोषणकेंद्रित व्यवस्थेकडे वाटचाल होऊ शकते.



खत अनुदानातही असाच बदल आवश्यक आहे. शेतकऱ्याला स्वस्त खत मिळणे महत्त्वाचे असले तरी त्यातून असंतुलित वापराला प्रोत्साहन मिळत असेल तर दीर्घकालीन खर्च समाजालाच सहन करावा लागतो. म्हणून मृदा परीक्षण, संतुलित खत वापर, सेंद्रिय व जैविक स्रोत, पीक अवशेषांचे पुनर्वापर आणि सूक्ष्म पोषकद्रव्ये यांना प्रोत्साहन देणारी व्यवस्था अधिक परिणामकारक ठरेल. पीक विविधीकरण ही त्याचीच पुढची पायरी आहे. गहू-तांदूळ पद्धतीने भारताच्या अन्नसुरक्षेत ऐतिहासिक योगदान दिले; परंतु आता डाळी, तेलबिया, भरडधान्ये, फळे, भाजीपाला, पशुधन, मत्स्यव्यवसाय आणि इतर उच्च मूल्य कृषी क्षेत्रांचा विस्तार करणे आवश्यक आहे. तेलबिया आणि डाळींच्या उत्पादनाला चालना देणे आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठीही महत्त्वाचे आहे. पाण्याच्या बाबतीत 'प्रति हेक्टर अधिक उत्पादन' या उद्दिष्टाबरोबर 'प्रति थेंब अधिक उत्पादन' हेही राष्ट्रीय कृषी ध्येय झाले पाहिजे.

कृषी क्षेत्राचे पुढील परिवर्तन केवळ सिंचन आणि कृषी निविष्ठांच्या उपलब्धतेमुळे होणार नाही; ते माहिती, आकडेवारी आणि आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असेल. २०२४ मध्ये केंद्र सरकारने डिजिटल कृषी अभियान मंजूर केले असून, त्यासाठी २ हजार ८१७ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. या अभियानांतर्गत ॲग्रीस्टॅक, शेतकरी नोंदणी, पिकांची लागवड नोंदणी, कृषी निर्णय साह्य प्रणाली, मृदा आरोग्याची माहिती, हवामान, भूजल आणि उपग्रहाद्वारे मिळणारी माहिती एकत्रित करण्याचा प्रयत्न केला जात आहे. यामुळे भविष्यात प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या शेताच्या परिस्थितीनुसार वैयक्तिक आणि अचूक कृषी सल्ला उपलब्ध होऊ शकतो. कोणते पीक घ्यावे, किती पाणी द्यावे, किती खत वापरावे, रोग-किडीचा धोका किती आहे आणि कोणत्या बाजारपेठेत शेतीमाल विकल्यास अधिक चांगला भाव मिळू शकतो, याबाबत वेळेवर माहिती मिळणे शक्य होईल. अशा तत्काळ उपलब्ध होणाऱ्या माहितीमुळे थेट लाभ हस्तांतर, पीक विमा आणि कृषी कर्ज योजनांची अंमलबजावणीही अधिक अचूक आणि पारदर्शक करता येईल.

### तंत्रज्ञान बदलाचा वेग

कृषी-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही वेगाने बदल होत आहेत. २०२५ पर्यंत केंद्र सरकारच्या नवोन्मेष आणि कृषी उद्योजकता विकास कार्यक्रमांतर्गत २,०९६ कृषी नव उद्योजक संस्थांना मदत देण्यात आली होती. कृत्रिम बुद्धिमत्ता, अचूक शेंती तंत्रज्ञान, वस्तूंच्या परस्परसंवादावर आधारित तंत्रज्ञान, ड्रोन, आधुनिक शेती यंत्रसामग्री, काढणीनंतरचे तंत्रज्ञान, अन्नप्रक्रिया आणि शेतमालाच्या पुरवठा साखळी व्यवस्थापनामध्ये या नव्या तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे. या बदलामुळे शेती ही केवळ पारंपरिक अनुभवावर आधारित उपजीविका न राहता माहिती, विज्ञान आणि तंत्रज्ञानावर आधारित व्यवसाय बनू शकते. मात्र या तंत्रज्ञानाचा खरा फायदा तेव्हाच होईल जेव्हा तो लहान आणि सीमांत शेतकऱ्यांपर्यंत परवडणाऱ्या दरात आणि स्थानिक भाषेत पोहोचेल.

ड्रोन तंत्रज्ञान विशेषतः महत्त्वाचे ठरू शकते. नमो ड्रोन दीदी योजनेअंतर्गत महिला स्वयंसाह्यता गटांना ड्रोन सेवा पुरवठादार म्हणून सक्षम करण्याचा प्रयत्न आहे. यामुळे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याबरोबर ग्रामीण महिलांसाठी नवीन उत्पन्नाचा स्रोतही निर्माण होऊ शकतो. परंतु शेतीतूनच सर्व ग्रामीण रोजगार निर्माण होऊ शकत नाहीत. ग्रामीण अर्थव्यवस्थेला अन्नप्रक्रिया, दुग्ध व्यवसाय, मत्स्य डिजिटल सेवा आणि ग्रामीण उद्योजकता यांच्याशी आवश्यक आहे. शेतीमाल कच्च्या स्वरूपात विकण्याऐवजी व्यवसाय, कुक्कुटपालन, लघुउद्योग, पर्यटन, लॉजिस्टिक्स, प्रक्रिया, पॅकेजिंग, ब्रडिंग आणि बाजारपेठेशी थेट जोडल्यास शेतकऱ्याला उत्पादनाच्या नव्हे तर मूल्यवर्धनाच्या मोठ्या वाट्यात सहभागी होता येईल.

### पुढील विकासमंत्र

हवामान बदल हा या संपूर्ण परिवर्तनाचा मोठा कसोटीचा मुद्दा आहे. उष्णतेच्या लाटा, अनियमित पाऊस, दुष्काळ आणि अतिवृष्टी यामुळे पारंपरिक शेती अधिक जोखमीची होत आहे. त्यामुळे हवामान-प्रतिरोधक वाण, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, जलक्षम शेती, कृषिवनशेती, मृदा सेंद्रिय कर्ब वाढवणे, सौर सिंचन आणि हवामान आधारित सल्ला सेवा यांना कृषी धोरणाच्या केंद्रस्थानी आणावे लागेल. पीक विम्यालाही नुकसानभरपाईच्या यंत्रणेपुरते मर्यादित न ठेवता हवामान जोखीम व्यवस्थापनाचे साधन बनवावे लागेल. शेवटी, भारताने दारिद्र्य कमी करण्याचा, अन्नसुरक्षा निर्माण करण्याचा आणि मोठी अर्थव्यवस्था उभारण्याचा मोठा टप्पा पार केला आहे. आता पुढील आव्हान उत्पादनाची गुणवत्ता, विकासाची शाश्वतता हे आहे. सरकारी अनुदान आवश्यक आहे; पण अनुदानावर कायम अवलंबून राहणारी अर्थव्यवस्था सक्षम होऊ शकत नाही. म्हणून भारताचा पुढील विकासमंत्र स्पष्ट असला पाहिजे 'अनुदानापासून उत्पादकतेकडे, संरक्षणापासून सक्षमीकरणाकडे आणि लाभार्थ्यांपासून उद्योजकाकडे.' गरीब कुटुंबाला सुरक्षितता, शेतकऱ्याला उत्पादकता, युवकाला कौशल्य आणि रोजगार, महिलेला उद्योजकतेची संधी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बाजारपेठ व तंत्रज्ञान मिळाले, तर भारताचा विकास व्यापक, टिकाऊ बनेल, भारत केवळ मोठी जीडीपी असलेली अर्थव्यवस्था बनणे हे अंतिम उद्दिष्ट नसावे. प्रत्येक नागरिकाला अधिक उत्पादक, स्वावलंबी, सन्मानाने जगण्याची संधी मिळणे, हेच विकसित भारताचे खरे मापदंड असले पाहिजे.

उत्तरार्ध

**डॉ. किरण गायकवाड**

# आयआयटीच्या भिंतीआड विद्यार्थ्यांचा आक्रोश कोण ऐकणार?

**प्रत्येक उच्च शिक्षण संस्थेत नियमित विद्यार्थीकल्याण आणि मानसिक आरोग्य लेखापरीक्षण झाले पाहिजे. समुपदेशन व्यवस्था स्वतंत्र, सहज उपलब्ध आणि गोपनीय असली पाहिजे. विद्यार्थ्याला मानसिक मदत घेतल्यामुळे त्याच्या शैक्षणिक किंवा करिअरच्या नोंदीवर विपरीत परणिाम होणार नाही, याबाबत स्पष्ट संस्थात्मक धोरण असले पाहिजे.**

१८ सप्टेंबरला आयआयटी मुंबईतील दुसऱ्या वर्षाच्या एका विद्यार्थ्याचा वसतिगृहातील खोलीत मृत्यू झाला. उपलब्ध वृत्तांनुसार, तो परीक्षेदरम्यान मोबाइल वापरताना आढळला होता आणि त्याने प्रश्नपत्रिका ChatGPT वर पाठवून उत्तरे मिळवण्याचा प्रयत्न केल्याचे संस्थेने सांगितले. शिक्षक आणि विभागप्रमुखांनी त्याच्याशी चर्चा करून या घटनेमुळे त्याच्या शैक्षणिक कारकिर्दीवर नकारात्मक परिणाम होणार नाही, असे आश्वासन दिल्याचेही वृत्त आहे. मात्र काही तासांतच तो मृतावस्थेत आढळला. त्यानंतर चारशेहून अधिक विद्यार्थ्यांनी आंदोलन केले आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यापासून प्रशासनाच्या संवेदनशीलतेपर्यंत अनेक प्रश्न उपस्थित झाले. या मृत्यूमागील नेमके कारण काय होते, हे तपासातून स्पष्ट होणे आवश्यक आहे; कोणत्याही एका घटनेला थेट कारण मानणे घाईचे आणि अयोग्य ठरेल.

परंतु हा प्रश्न केवळ एका विद्यार्थ्यापुरता मर्यादित राहिलेला नाही. जुलै २०२६ मध्ये आयआयटी मुंबईतील आणखी एका दुसऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्याचा मृत्यू झाला होता. त्या घटनेचा वैयक्तिक कारणांच्या शक्यतेसह तपास सुरू आहे, असे पोलिसांचे म्हणणे आहे. ऑगस्टमध्ये पुण्यातील आयसरमध्ये एका विद्यार्थिनीचा मृत्यू झाला. ते प्रकरणही अद्याप तपासाधीन आहे. त्यानंतर आयसरच्या विद्यार्थ्यांनी मानसिक आरोग्य सुविधा, शैक्षणिक सवलती, विद्यार्थी प्रतिनिधित्व आणि संस्थात्मक संवाद यासंबंधी मागण्या पुढे केल्या. या घटनांकडे पाहताना सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रत्येक मृत्यूमागे एकच कारण शोधण्याची घाई करू नये. आत्महत्येची कारणे अनेकदा गुंतागुंतीची आणि परस्परांशी जोडलेली असतात. परीक्षा, प्रेमसंबंध, कौटुंबिक प्रश्न, आर्थिक अडचणी, भेदभाव, एकटेपणा, आजारपण, व्यसन, करिअरची चिंता किंवा मानसिक आरोग्याच्या समस्या यापैकी एक किंवा अनेक घटक एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यात एकत्र येऊ शकतात. म्हणूनच प्रश्न 'परीक्षेचा ताण किती?' एवढाच नसून 'विद्यार्थ्याच्या आयुष्यातील ताण ओळखून त्याला वेळेवर आधार देणारी व्यवस्था किती सक्षम आहे?' हा आहे.

नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या अहवालात २०२४ची आकडेवारी जाहीर झालेली आहे अजूनही २०२५ ची आकडेवारी यायची आहे. तर या २०२४ च्या आकडेवारीकडे पाहिले तर परिस्थिती अधिक अस्वस्थ करणारी आहे. देशात त्या वर्षी १ लाख ७० हजार ७४६ आत्महत्यांची नोंद झाली. त्यापैकी १४ हजार ४८८ विद्यार्थी होते म्हणजे सरासरी दररोज जवळपास ४० विद्यार्थी. २०१४ मध्ये विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांची नोंद ८ हजार ६८ इतकी होती. म्हणजे दशकभरात ही संख्या जवळपास ८० टक्क्यांनी वाढली आहे. २०२४ मधील एकूण आत्महत्यांमध्ये विद्यार्थ्यांचा वाटा ८.५ टक्के होता. महाराष्ट्रात १ हजार ९०९ विद्यार्थी आत्महत्यांची नोंद झाली आणि ही देशातील कोणत्याही एका राज्यातील सर्वाधिक आकडेवारी होती. मात्र या आकडेवारीचे वाचन अत्यंत सावधपणे करणे गरजेचे आहे, कारण हे केवळ आयआयटी, आयसर किंवा उच्च शिक्षण संस्थांमधील विद्यार्थी नाहीत; यात विविध स्तरांवरील विद्यार्थी येतात. तसेच 'परीक्षेतील अपयश ८ आत्महत्या' असे सरळ समीकरणही NCRBची आकडेवारी मांडत नाही. २०२४ मध्ये परीक्षेतील अपयश हे २ हजार ३२ आत्महत्यांमध्ये नोंदवलेले कारण होते. एकूण आत्महत्यांमध्ये कौटुंबिक समस्या ३३.५ टक्के, आजारपण १७.९ टक्के आणि व्यसनाधीनता ७.६ टक्के होती. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मानसिक संकटाकडे केवळ परीक्षा आणि गुणांच्या चौकटीत पाहणे चुकीचे ठरेल.



तरीही आपल्या समाजाची एक धोकादायक समजूत आहे 'तो आयआयटीत आहे; त्याला कसला ताण?' पण मनाला संस्थेची ब्रँड व्हॅल्यू कळत नाही. वेदनेला रँकिंग नसते. आयआयटी, आयआयएम, आयसर किंवा आयआयएससीमध्ये प्रवेश मिळाल्यानंतर संघर्ष संपत नाही; अनेक विद्यार्थ्यांसाठी तो एका नव्या संघर्षाचा आरंभ असतो. शाळेत किंवा गावात कायम पहिल्या क्रमांकावर असलेला विद्यार्थी जेव्हा अचानक स्वतःभोवती शेकडो अत्यंत हुशार विद्यार्थी पाहतो, तेव्हा तुलना सुरू होते. 'मी इथे पुरेसा चांगला आहे का?' हा प्रश्न मनात रुंजी घालू शकतो. पहिल्या परीक्षेत अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळणे, संशोधनाचा प्रयोग वारंवार अपयशी होणे, प्रबंधातील अडथळे, मार्गदर्शकाशी मतभेद, नोकरी किंवा प्लेसमेंटची चिंता या प्रत्येक गोष्टीचा मानसिक परिणाम होऊ शकतो. विशेषतः संशोधनाच्या विद्यार्थ्यांसाठी परिस्थिती अधिक गुंतागुंतीची असू शकते. पीएच.डी.चा विद्यार्थी केवळ अभ्यास करत नसतो; त्याच्या संशोधनाची दिशा, प्रबंधाची प्रगती, शिष्यवृत्ती, प्रकाशने, शिफारसपत्रे आणि पुढील करिअर यांचा मोठा भाग संस्थात्मक नातेसंबंधांवर अवलंबून असतो. अशा परिस्थितीत त्याला समस्या मांडण्यासाठी स्वतंत्र आणि सुरक्षित व्यासपीठ नसेल, तर कॅम्पसमध्ये विद्यार्थी मानसिकदृष्ट्या पूर्णपणे एकटा पडू शकतो.

मग प्रश्न येतो समुपदेशक आहेत ना? होय, अनेक संस्थांमध्ये आहेत. पण फक्त दारावर समुपदेशन केंद्राचा फलक लावल्याने समस्या सुटत नाहीत. किती विद्यार्थ्यांमागे किती समुपदेशक आहेत? भेटीसाठी किती वेळ लागतो? सेवा खरोखर गोपनीय आहे का? मदत मागितल्यामुळे 'कमकुवत', 'अस्थिर' किंवा 'समस्या निर्माण करणारा' असा शिक्का बसणार नाही, याची खात्री विद्यार्थ्याला वाटते का? शिक्षक, वॉर्डन आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांना मानसिक संकटाची प्राथमिक चिन्हे ओळखण्याचे प्रशिक्षण आहे का? आणि सर्वांत महत्त्वाचे विद्यार्थ्याने मदत मागण्यापूर्वीच संस्था त्याच्यापर्यंत पोहोचते का? या प्रश्नांची गंभीरता लक्षात घेऊनच सर्वोच्च न्यायालयाने मार्च २०२५ मध्ये उच्च शिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्य आणि आत्महत्या प्रतिबंधासाठी राष्ट्रीय कार्यदलाची स्थापना केली. या कार्यदलाला विद्यार्थी आत्महत्यांची प्रमुख कारणे समजून घेणे, विद्यमान कायदे व संस्थात्मक व्यवस्था तपासणे आणि अधिक जबाबदार, समावेशक व प्रतिबंधात्मक व्यवस्था सुचवणे अशी जबाबदारी देण्यात आली. जून २०२६ पर्यंत या कार्यदलाने ३० उच्च शिक्षण संस्थांना भेटी दिल्या असून विविध भागधारकांशी चर्चा केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने त्याला अंतिम अहवालासाठी ३१ ऑक्टोबर २०२६पर्यंत मुदत दिली आहे.म्हणून आता संस्थांनी काही ठोस बदल करणे गरजेचे आहे. प्रत्येक उच्च शिक्षण संस्थेत नियमित विद्यार्थीकल्याण आणि मानसिक आरोग्य लेखापरीक्षण झाले पाहिजे.

समुपदेशन व्यवस्था स्वतंत्र, सहज उपलब्ध आणि गोपनीय असली पाहिजे. विद्यार्थ्याला मानसिक मदत घेतल्यामुळे त्याच्या शैक्षणिक किंवा करिअरच्या नोंदीवर विपरीत परणिाम होणार नाही, याबाबत स्पष्ट संस्थात्मक धोरण असले पाहिजे. मार्गदर्शक किंवा शिक्षकांशी संबंधित तक्रारींसाठी स्वतंत्र यंत्रणा, पीएच.डी. मार्गदर्शक बदलण्याची पारदर्शक प्रक्रिया आणि शैक्षणिक निर्णयांविरुद्ध दाद मागण्याची व्यवस्था असली पाहिजे. परीक्षा किंवा शिस्तभंगाच्या प्रसंगी नियमांची अंमलबजावणी आवश्यकच आहे; परंतु नियम आणि माणुसकी यांच्यात संघर्ष निर्माण होणार नाही, अशी संवेदनशील कार्यपद्धतीही तितकीच आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेणे हादेखील उपायाचा महत्त्वाचा भाग आहे. आयसर पुण्यातील विद्यार्थ्यांनी मानसिक आरोग्य सुविधा, शैक्षणिक सवलती आणि संस्थात्मक संवादाबाबत केलेल्या मागण्या ही केवळ आंदोलनाची बाब म्हणून पाहण्यापेक्षा विद्यार्थ्यांच्या अनुभवांकडे धोरणांवरील अभिप्राय म्हणून पाहणे आवश्यक आहे.

आपण देशासाठी उत्कृष्ट अभियंते, शास्त्रज्ञ, डॉक्टर, व्यवस्थापक आणि संशोधक घडवण्याची स्वप्ने पाहतो. त्यासाठी प्रयोगशाळा उभारतो, अत्याधुनिक सुविधा देतो, क्रमवारीच्या स्पर्धेत उतरतो. पण त्या सर्वांच्या केंद्रस्थानी असलेला विद्यार्थी जर सुरक्षित आणि मानसिकदृष्ट्या समर्थ नसेल, तर त्या भव्य व्यवस्थेच्या यशाचा अर्थ काय?

**डॉ. विवेक बी. कोरडे**

गुरूवार, दि. २४ सप्टेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# शेतकऱ्यांचा आक्रोश मोर्चा, सरकारविरोधात घोषणाबाजी..!

## हेक्टरी ५० हजारांची मदत जाहीर करा,उद्धव ठाकरे गटासह शेतकऱ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी





**यवतमाळ, दि. २३ :** पावसाने प्रदीर्घ काळ पाठ फिरवल्याने कपाशी, सोयाबीन सह खरीप पिके संकटात सापडली असताना शेतकऱ्यांना पीकविमा आणि नुकसानभरपाईची तातडीने मदत मिळावी, या मागणीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने बुधवारी यवतमाळात आक्रोश मोर्चा काढत सरकारला इशारा दिला. पीक कापणी प्रयोगांचे अहवाल तातडीने पूर्ण करून शेतकऱ्यांना पीकविम्याची भरीव मदत मिळवून द्यावी.

५ ऑक्टोबरपर्यंत मदत मिळाली नाही, तर हजारो शेतकऱ्यांना सोबत घेऊन राष्ट्रीय समृद्धी महामार्गावर रस्ता रोको आंदोलन करून महामार्ग बंद पाडू, अशी घोषणा आमदार नितीन देशमुख यांनी केली. स्थानिक आझाद मैदानातून मोर्चाला सुरुवात झाली. हातात भगवे झेंडे आणि विविध मागण्यांचे फलक घेतलेल्या शेतकऱ्यांनी पाच कंदील चौक, संविधान चौक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. यावेळी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर झालेल्या सभेत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारला धारेवर धरण्यात आले. पीक कापणीचे अहवाल वेळेत तयार झाले नाहीत तर पीकविमा नुकसान भरपाईच्या प्रक्रियेला विलंब होऊन शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी पीक कापणी अहवाल तातडीने पूर्ण करून शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काची मदत मिळवून द्यावी, अशी मागणी करण्यात आली. अहवाल वेळेत न झाल्यास शेतकऱ्यांचे होणारे नुकसान आणि त्याची जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशाराही देण्यात आला. शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत, पीकविमा भरपाईची तातडीने कार्यवाही, नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे, चारा डेपो सुरू करणे आणि शेतकऱ्यांना नियमित वीजपुरवठा देणे, अशा मागण्या आंदोलनातून करण्यात आल्या. विदर्भातील अनेक भागांत पावसाचा मोठा खंड पडल्याने कपाशी व सोयाबीन पिकांचे नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचा दावा आंदोलकांनी केला. सभेत सत्ताधाऱ्यांच्या शेतकरी धोरणावरही जोरदार टीका करण्यात आली. पक्षांतर करून सत्तेत गेलेल्या स्थानिक खासदारांनी आता शेतकऱ्यांचे प्रश्न केंद्र सरकारसमोर मांडावेत, असा टोला लगावत, जनतेच्या विकासासाठी पक्षांतर केले की स्वतःच्या विकासासाठी, असा सवाल उपस्थित करण्यात आला. एमबीबीएस महाविद्यालय आपल्या पदरात पाडून घेतले आहे या मुद्द्याचाही यावेळी राजकीय संदर्भ देण्यात आला. खासदार यांचा पंधरा वर्षांचा वनवास संपविणाऱ्या शेतकऱ्यांचे उपकार विसरू नका, असा इशाराही वक्त्यांनी दिला. शेतकरी आपल्या हक्कांसाठी सातत्याने रस्त्यावर उतरतो; त्यामुळे शासनाने आंदोलनाची वाट न पाहता तातडीने मदत जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली. मोर्चात शिवसेना उपनेते आमदार नितीन देशमुख, आमदार संजय दरेकर, लोकसभा संपर्कप्रमुख दिलीप जाधव, जिल्हा संपर्कप्रमुख राजेंद्र गायकवाड, जिल्हाप्रमुख प्रवीण शिंदे, किशोर इंगळे, संजय निखाडे, पश्चिम विदर्भ महिला आघाडी संघटिका सागरपुरी, महिला आघाडी जिल्हाप्रमुख कल्पना दरवई, जिल्हा सचिव तुषार देशमुख, उपजिल्हाप्रमुख चंद्रकांत उडाके, तालुकाप्रमुख निलेश लडके, शहरप्रमुख चेतन शिरसाट, राजेंद्र कोहरे, युवा सेना जिल्हाप्रमुख गिरीजानंद कळंबे, अनिकेत आडे, बाबू पाटील जैत आणि प्रवीण पवार यांच्यासह पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मागण्यांची तातडीने दखल न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करून हजारो शेतकऱ्यांसह समृद्धी महामार्गावर उतरू, असा स्पष्ट इशारा यावेळी देण्यात आला.

# कोंडझाई फाटा येथे ट्रॅक्टर दरीत कोसळून भीषण अपघात

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवमाळ, दि. २३ :** तालुक्यातील कोंडजई फाट्याजवळ ट्रॅक्टर दरीत कोसळून अपघात झाल्याची घटना घडली असून त्यात एका सत्तर वर्षीय इसमाचा ट्रालिखाली दबून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. सदर घटनेची माहिती माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते मुज्जूभाई पटेल आपल्या मित्रांना व ॲम्ब्युलन्स सोबत घेऊन पोलीस प्रशासनासह घटनास्थळी पोहचले असता एक ७० वर्षीय इसम नाव दत्ताजी लक्ष्मण बोट्रे हे टॅक्टर मध्ये दबून होते.

त्यावेळी घाटंजी पोलिस स्टेशनचे ठाणेदार केशव ठाकरे, राहुल खंडागळे सर्व पोलीस कर्मचारी उपस्थित होते त्यांच्या उपस्थितीत मुज्जू पटेल मित्रपरिवारानी JCB बोलावून त्या व्यक्तीला बाहेर काढले पण तेव्हा त्या व्यक्तींचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज होता.तरी पण त्याला उपलब्ध असलेल्या ॲम्ब्युलन्सनी घाटंजी ग्रामीण रुग्णालयात आणले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.कोंडझई येथील गणपती विसर्जनासाठी ट्रॉली घेऊन टॅक्टर घाटंजीवरून जात असतांना त्यात घरी जाण्यासाठी दत्ताजी लक्ष्मण बोट्रे हे ट्रॅक्टरच्या ट्रालीत बसले होते.पण दुर्दैवाने टॅक्टरचा अपघात होऊन खोल दरीत कोसळल्याने ट्रकरच्या ट्रालीखाली ते दबले गेले त्यांच्यासोबत असलेले बाकी काही लोकांनी टॅक्टरवरून उडी घेऊन आपला जीव वाचवला.दत्ता बोट्रे हे ट्रालिखाली दबल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. दत्ता बोट्रे हे अत्यंत गरीब असुन ते आणि त्यांची पत्नी यांना मुलगा नसल्याने ते दोघेच राहत होते त्यांना चार मुली असून त्यांचे लग्न झाले आहे.त्यांच्या पाठीमागे पत्नी आणि चार मुलींचा मोठा परिवार आहे.

## थोडक्यात



### क्रीडा मैदानात 'शि.प्र.मं.'चा दबदबा!

**कबड्डी, बुद्धिबळात विजेतेपद,विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड**

**घाटंजी :** तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत शिक्षण प्रसारक मंडळाच्या शाळांनी दमदार कामगिरी करत क्रीडा क्षेत्रातील आपली छाप उमटवली. कबड्डी व बुद्धिबळ स्पर्धेत संस्थेच्या विद्यार्थ्यांनी विजेतेपद पटकावत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळविली. घाटंजी येथील गिलानी कॉलेजच्या मैदानावर झालेल्या कबड्डीच्या अंतिम सामन्यात शि. प्र. मं. विद्यालयाच्या मुलांच्या संघाने विवेकानंद विद्यालय, पांढुर्णा संघाचा पराभव करून विजेतेपद पटकावले. तसेच बुद्धिबळ स्पर्धेत अर्णव अहिरकर, आदित्य नरगुरवार, प्रशित मालिकर, साहिल भुजाडे व शिवम् पेटेवार यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपद मिळविले. या यशाबद्दल अध्यक्ष जे. जे. गिलानी, उपाध्यक्ष अल्ताफ गिलानी, सचिव ॲड. अनिरुद्ध लोणकर, संचालक एम. ए. शहजाद, आलिया शहजाद, मुख्याध्यापक डी. के. सपकाळ यांच्यासह शिक्षकांनी विजेत्यांचे अभिनंदन केले.

### ई-पिक पाहणीची कोंडीवर उपाय,शेतकऱ्यांना स्वतः नोंदणीची मुभा..!

**तांत्रिक अडचणींमुळे सहाय्यकांवर वाढला ताण; दुष्काळसदृश स्थितीत नोंदणी वेळेत करण्याचे तहसीलदारांचे आवाहन**



**दारव्हा :** यंदा ई-पिक पाहणीच्या प्रक्रियेत शासनाने बदल करून शेतकरी स्तरावरील नोंदणी बंद केली होती. प्रत्येक गावासाठी शासन स्तरावरून ई-पिक पाहणी सहाय्यक नियुक्त करण्यात आले. मात्र, प्रत्यक्ष पाहणी करताना तांत्रिक अडचणी, वेळखाऊ प्रक्रिया आणि वाढता ताण यामुळे अनेक ठिकाणी शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने आता शेतकऱ्यांना पुन्हा स्वतःच्या स्तरावरून ई-पिक पाहणी करण्याचा पर्याय उपलब्ध करून दिला आहे. यवतमाळ जिल्ह्यासह दारव्हा तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने ई-पिक पाहणीची नोंद अधिक महत्त्वाची ठरणार आहे. शासनाच्या विविध मदत योजना, नुकसानभरपाई तसेच अन्य अनुषंगिक लाभांसाठी पिकांची अधिकृत नोंद आधारभूत ठरू शकते. शेतकऱ्यांनी DCS ॲप डाउनलोड करून आपल्या शेतातील पिकांची ई-पिक पाहणी स्वतः करून नोंद अद्ययावत करावी, असे आवाहन तहसीलदार राजेश पऊळ यांनी केले आहे. तांत्रिक अडचण आल्यास संबंधित तलाठी किंवा गावा साठी नियुक्त ई-पिक पाहणी सहाय्यकाशी संपर्क साधावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करताना नोंदणीअभावी शेतकरी शासकीय मदतीपासून वंचित राहू नये, यासाठी ही प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.




### आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर भारतीय स्टेट बँकेकडून बिटरगाव पोलिसांना १० बॅरिकेट्स.

**ढाणकी :** आगामी सण-उत्सवाच्या काळात शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच नाकाबंदीदरम्यान होणारी अडचण विचारात घेऊन भारतीय स्टेट बँक शाखा, ढाणकी यांच्या वतीने बिटरगाव पोलीस स्टेशनला १० बॅरिकेट्स देण्यात आले. सण-उत्सवांच्या काळात शहरात येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यासाठी व नाकाबंदीदरम्यान पोलीस कर्मचाऱ्यांना बॅरिकेट्स कमतरते मुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन बिटरगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार पांडुरंग शिंदे यांनी भारतीय स्टेट बँकेचे शाखा व्यवस्थापक विनोद कुमार यांच्याशी चर्चा केली आणि बँकेतर्फे बॅरिकेट्स देण्याची मागणी केली. ठाणेदार शिंदे यांच्या मागणीची तात्काळ दखल घेत शाखा व्यवस्थापक विनोद कुमार यांनी १० बॅरिकेट्स देण्याचे मान्य केले. त्यानुसार ऐन मिरवणुकीच्या एक दिवस आधी हे १० बॅरिकेट्स ढाणकी पोलीस चौकी येथे पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. बँकेच्या या सामाजिक दातृत्वामुळे पोलीस प्रशासनाला नाकाबंदी आणि वाहतूक नियंत्रणासाठी मोठी मदत होणार आहे. बॅरिकेट्स हस्तांतरण प्रसंगी ठाणेदार पांडुरंग शिंदे, पोलीस उपनिरीक्षक सागर अन्नमवार, बिट जमादार मोहन चाटे, रोशन सरनाईक, सुदर्शन जाधव, प्रवीण जाधव, राहुल कोकरे, शिवाजी शिंदे यांच्यासह इतर पोलीस कर्मचारी व बँकेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# निमोनियाने चिमुकली सिझा फातेमा सय्यदचा मृत्यू

## पत्रकार सय्यद मुदस्सीर यांच्या एक वर्षाच्या मुलीचा दुर्दैवी अंत; डोंगरगावच्या आरोग्य व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



### चिमुकलीच्या मृत्यूने अनेक प्रश्न ऐरणीवर

**सिझा फातेमा सय्यद या एक वर्षाच्या चिमुकलीचा निमोनियामुळे झालेला मृत्यू ही डोंगरगावसाठी वेदनादायी घटना ठरली आहे. या घटनेनंतर गावातील डासांचा प्रादुर्भाव, अस्वच्छता, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि आरोग्य सुविधांचा अभाव हे प्रश्न पुन्हा ऐरणीवर आले आहेत. प्रशासन आता तरी तातडीने दखल घेणार का?**

**महागाव, दि. २३ :** तालुक्यातील डोंगरगाव येथे निमोनियामुळे अवघ्या एक वर्षाच्या सिझा फातेमा सय्यद या चिमुकलीचा दि. २२ सप्टेंबर रोजी दुर्दैवी मृत्यू झाला. ही चिमुकली पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते सय्यद मुदस्सीर यांची मुलगी होती. या घटनेने सय्यद मुदस्सीर यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, संपूर्ण डोंगरगावात हळहळ व्यक्त होत आहे.

डोंगरगावमध्ये वाढता डासांचा प्रादुर्भाव, अस्वच्छता आणि आरोग्य सुविधांचा अभाव यामुळे नागरिकांमध्ये आधीपासूनच चिंता आहे. अशा परिस्थितीत चिमुकलीचा निमोनियामुळे मृत्यू झाल्याने गावातील प्रतिबंधात्मक आरोग्य उपाययोजनांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

**डासांचा प्रादुर्भाव; फॉगिंग-फवारणीचा अभाव**

गावात डासांचा वाढता प्रादुर्भाव असतानाही नियमित फॉगिंग, औषध फवारणी, साचलेल्या पाण्याचा निचरा व स्वच्छता मोहीम प्रभावीपणे राबविली जाते का, असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. आजारांचा फैलाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना वेळेत होणे आवश्यक असताना डोंगरगावकडे आरोग्य विभागाचे पुरेसे लक्ष आहे का, याचीही चर्चा सुरू झाली आहे.

**डोंगरगावला आरोग्य उपकेंद्र कधी**

महागाव तालुक्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या डोंगरगावला अद्याप स्वतंत्र आरोग्य उपकेंद्राची सुविधा नसल्याने नागरिकांना प्राथमिक उपचार व तपासणीसाठी इतर ठिकाणी धाव घ्यावी लागते. गावातील आरोग्यविषयक समस्या लक्षात घेता तातडीने आरोग्य उपकेंद्र सुरू करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

**मृत्यूची चौकशी करून प्रतिबंधात्मक उपाययोजना करा**

आपल्या चिमुकल्या मुलीच्या मृत्यूच्या पार्श्वभूमीवर पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते सय्यद मुदस्सीर यांनी शासनाने या घटनेची गांभीर्याने दखल घ्यावी, आजारांमुळे होणाऱ्या मृत्यूंच्या घटनांची योग्य ती चौकशी करावी आणि ग्रामीण भागात प्रभावी प्रतिबंधात्मक आरोग्य उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी केली आहे. डोंगरगावमध्ये तातडीने फॉगिंग, औषध फवारणी, स्वच्छता मोहीम व आरोग्य तपासणी शिबिर घेण्याबरोबरच कायमस्वरूपी आरोग्य उपकेंद्र सुरू करावे, अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

# पोलिसांचा रूट मार्च, हुल्लडबाजांना इशारा..!



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**फुलसावंगी, दि. २३ :** आगामी गणेशोत्सव शांततेत आणि उत्साहात पार पडावा, तसेच कायदा व सुव्यवस्था बिघडविणाऱ्या समाजकंटकांवर वचक निर्माण व्हावा, यासाठी महागाव पोलिसांनी फुलसावंगीत रूट मार्च काढला.

ठाणेदार सेवानंद वानखेडे यांच्या नेतृत्वाखाली सायंकाळी ५ वाजता पोलिसांनी मुख्य बाजारपेठ, प्रमुख चौक, संवेदनशील भाग आणि गर्दीच्या मार्गांवरून पथसंचलन केले. गणेशोत्सव काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी आणि उत्सवाला गालबोट लागू नये, हा या संचलनाचा उद्देश होता. यावेळी ठाणेदार वानखेडे यांनी गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांसह नागरिकांना शांतता व सामाजिक सलोखा राखण्याचे आवाहन केले. ध्वनिप्रदूषणासह शासनाच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. अफवा पसरविणारे, छेडछाड करणारे अथवा शांतता भंग करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर राहणार असून, कायदा हातात घेणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा पोलिसांनी दिला.

# सुकन्या लॉजमध्ये अवैध देहविक्रीचा पर्दाफाश

## महागाव पोलिसांची धडक कारवाई लॉज मालकाविरुद्ध गुन्हा दाखल

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**महागाव, दि. २३ :** शहरातील जुने बसस्थानकाजवळील हरी ओम भोजनालयावरील सुकन्या लॉजमध्ये अवैध देहविक्रीच्या व्यवसायावर सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली मिळालेल्या माहितीनुसार महागाव पोलिसांनी मंगळवारी (दि. २२) रोजी धडक कारवाई केली.

या कारवाईत एका महिला व पुरुषासह लॉज मालक सुनील भिकाजी गव्हाणे (वय ६०, रा. महागाव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महागाव पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सेवानंद वानखडे यांना शहरात काही दिवसांपासून अवैध देहविक्रीचा व्यवसाय सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे मंगळवारी दुपारी सुमारे ४ वाजता पोलिस पथक तयार करून सुकन्या लॉजवर छापा टाकण्यात आला. छाप्यादरम्यान लॉजमधील एका खोलीत एक महिला व एक पुरुष आढळून आले. पोलिसांनी लॉज मालक सुनील भिकाजी गव्हाणे यांची चौकशी केली असता, ग्राहकाकडून १ हजार रुपये घेऊन त्यापैकी ५०० रुपये स्वतःकडे ठेवून उर्वरित ५०० रुपये महिलेला देहविक्रीसाठी देत असल्याची माहिती समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी महागाव पोलिस ठाण्यात अप. क्र. ३२७/२०२६ अन्वये अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनियम १९५६ मधील कलम ३, ४, ५ तसेच BNS कलम १४३ (२), १४४ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात तसेच सहायक पोलिस अधीक्षक व उमरखेड उपविभागीय पोलिस अधिकारी गौरव कायंदे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक सेवानंद वानखडे, सपोनि. सुनील अंभोरे, सपोनि. प्रसेनजीत जाधव, पोउपनि. प्रदीप कांबळे, पोउपनि. किशोर मुरकुटे, पोहेकॉ. वसीम शेख, पोहेकॉ. केशव चव्हाण, पोहेकॉ. गजानन येडतकर, पोना. सुनील मातने, पोशी. सुनील जाधव, पोशी. दिपक माळी व मपोशी. मंगला धोती यांच्या पथकाने केली.

# जात वैधतेच्या त्रुटी दूर करण्यासाठी शिबिर

**यवतमाळ, दि. २३ :** आरक्षित प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या जात वैधता प्रमाणपत्राचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने विशेष शिबिराचे आयोजन केले आहे. राज्य शासनाच्या 'सेवा संकल्प अभियानांतर्गत' हे शिबिर २८ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत समितीच्या कार्यालयात होणार आहे. अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग, विशेष मागास प्रवर्ग तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गातील विद्यार्थ्यांना याचा लाभ घेता येणार आहे. विशेषतः शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमात आरक्षित प्रवर्गातून प्रवेश घेतलेल्या आणि जात वैधता प्रकरणात त्रुटी राहिल्याने प्रमाणपत्र प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांसाठी ही संधी महत्त्वाची आहे. कोणत्याही पूर्वसूचनेची आवश्यकता नसून विद्यार्थी किंवा पालक समितीसमोर उपस्थित राहून त्रुटींची पूर्तता करू शकतात. प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करून घेण्याचे आवाहन समितीने केले आहे.

# गणेशपूर येथे मोफत आरोग्य शिबिरात..!

## २५० ग्रामीणांची तपासणी,तज्ज्ञ डॉक्टरांकडून मार्गदर्शन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**झरी-जामणी, दि. २३ :** ग्रामीण भागातील नागरिकांना तज्ज्ञ वैद्यकीय सेवा सहज उपलब्ध व्हावी, या उद्देशाने गणेशपूर येथील ईशान गोल्डच्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत ५ सप्टेंबर रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात सुमारे २५० ग्रामीण नागरिकांची विविध आजारांसाठी तपासणी करण्यात आली.

सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत झालेल्या शिबिरात मधुमेह, रक्तदाब, नेत्र, दंत, हाडांचे विकार, स्त्रीरोग, बालरोग तसेच सर्वसाधारण आरोग्य तपासणी करण्यात आली. तज्ज्ञ डॉक्टरांनी तपासणी करून आवश्यक वैद्यकीय सल्ला दिला. गरजेनुसार रुग्णांना मोफत औषधांचे वितरणही करण्यात आले. आरोग्य तपासणीसोबतच संतुलित आहार, नियमित तपासणी व निरोगी जीवनशैलीबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. शिबिरासाठी सुमारे ५० हजार रुपये खर्च करण्यात आला. ईशान गोल्डचे संचालक राजकुमार अग्रवाल, ईशान अग्रवाल, आंचल अग्रवाल व संगीता अग्रवाल यांच्यासह सदस्यांनी आयोजनासाठी पुढाकार घेतला.

# एटीएम बदलून २८ हजारांवर डल्ला..!

## आंतरराज्यीय आरोपी मुंबईतून जेरबंद, चोरीची १०० टक्के रक्कम हस्तगत

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. २३ :** एटीएममध्ये मदतीचा बहाणा करून कार्डची अदलाबदल आणि त्यानंतर खात्यातील रक्कम लंपास करणाऱ्या आंतरराज्यीय सराईत आरोपीला उमरखेड पोलिसांच्या डी.बी. पथकाने मुंबईतून ताब्यात घेतले. आरोपीकडून फसवणुकीतील संपूर्ण २८ हजार रुपयांची रक्कम जप्त करण्यात आल्याने गुन्ह्याचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले आहे.

११ ऑगस्ट रोजी सायंकाळी मोहननगर येथील साईनाथ शेषराव शिंदे (५०) हे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेले होते. पैसे निघत नसल्याचे पाहून मागे उभ्या असलेल्या एका इसमाने मदतीचा बहाणा केला. त्याने शिंदे यांच्याकडील एटीएम कार्ड स्वतःकडे घेत दुसरे कार्ड त्यांच्या हातात दिले आणि पासवर्ड टाकण्यास सांगितले. त्यानंतर आरोपी तेथून पसार झाला. काही वेळातच शिंदे यांच्या खात्यातून तीन व्यवहारांतून २८ हजार रुपये काढून घेण्यात आले. याप्रकरणी उमरखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज, गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपीचा माग काढला. तपासात सय्यद कमालउद्दीन खान (३६), मूळ रा. प्रतापगड, उत्तर प्रदेश, सध्या साकीनाका, अंधेरी (मुंबई) हा आरोपी निष्पन्न झाला. डी.बी. पथकाने मुंबई गाठून त्याच्या घरातून गुन्ह्यातील संपूर्ण २८ हजार रुपयांची रोकड जप्त केली. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, सहायक पोलीस अधीक्षक गुरव कायंदेपाटील आणि ठाणेदार शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली डी.बी. प्रमुख पीएसआय शरद लोहकरे व पथकाने केली.

# मुकुटबन पोलिसांचा रूट मार्च..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**झरी, दि. २३ :** आगामी काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी आणि नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी, यासाठी मुकुटबन पोलिसांकडून रूट मार्च काढण्यात आला. पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शहरातील प्रमुख मार्गांवर संचलन करत उपस्थिती दर्शविली. यावेळी नागरिकांनीही पोलिसांच्या शिस्तबद्ध संचलनाची दखल घेतली. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज असून, नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन ठाणेदार सतीश जाधव यांनी केले आले.

# आश्वासनानंतर ठाकरे यांचे उपोषण मागे..!

**बोरगाव (क), दि. २३ :** गावातील विकासकामांच्या प्रश्नावरून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष अश्विन मुरलीधर ठाकरे यांनी सुरू केलेल्या बेमुदत उपोषणाची आमदार राजूभाऊ तोडसाम यांच्या हस्तक्षेपानंतर सांगता झाली.

ठाकरे यांच्या आंदोलनाची माहिती मिळताच आमदार तोडसाम यांनी भाजप युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आशिष चव्हाण यांना पाठवून उपोषण सोडविण्यासाठी पुढाकार घेतला. आशिष चव्हाण यांनी रात्री ठाकरे यांची भेट घेऊन चर्चा केली. त्यानंतर आमदार तोडसाम यांच्याशी ठाकरे यांचा दूरध्वनीवरून संवाद घडवून आणण्यात आला. यावेळी बोरगावच्या विकासकामांसाठी आणखी १५ लाख रुपयांचा निधी देण्याचे आश्वासन देण्यात आले. त्यानंतर आशिष चव्हाण यांच्या हस्ते ठाकरे यांनी उपोषण सोडले. दरम्यान, आश्वासन मिळाल्याने आंदोलनाची सांगता झाली असली तरी घोषित निधी प्रत्यक्षात कधी मिळणार, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. निधीची प्रत्यक्ष उपलब्धता झाल्यानंतरच आश्वासनाची पूर्तता झाल्याचे स्पष्ट होणार आहे.

# झाडांची छाटनी की लाकडाचा सौदा; नप च्या कारवाईवर प्रश्न

**चांदूर रेल्वे/ वार्ताहर**

शहरातील मुख्य बाजारपेठ बस स्थानक परिसर आणि अमरावती मार्गावरील मोठ्या झाडांची मागील आठवड्यापासून मोठ्या प्रमाणात झाडाच्या छटाईचे काम सुरू आहे आवश्यक झाडाच्या छाटणीच्या नावाखाली मोठ्या झाडांची तोडून अक्षरशा मुंडल करण्यात येत आहे असे असे प्रत्यक्ष दर्शनी दिसून येत आहे .

आतापर्यंत सुमारे २५ झाडाच्या वरती छाटणी झाल्याचे दावा नागरिकांनी कडून करण्यात आला येत असून त्यातून निघालेल्या लाकूड आणि फांद्याचे नेमके कुठे गेले हा प्रश्न उपस्थित झाला आहे.

मोठ्या मंडळाचे गणपतीचे उत्सव असल्याने झाडाची छाटणी करण्याचे निर्देश द देण्यात आले होते.

आणि छाटलेले लाकूड स्मशानभूमी ठेवण्यात येईल असा ठराव झाल्याचे नगरपरिषद मार्फत सांगण्यात आले.परंतु नागरिकांनी च्या म्हणण्यानुसार छाटण्यात आलेल्या फांद्यापैकी एकही फांदी स्मशानभूमीत पोहोचली नाही.



उलट हे लाखो रुपये लाकुड थेट व्यापाऱ्याच्या ठिकाणी नेण्याचे आल्याचे गंभीर आरोप करण्यात येत आहे.

यामधून जवळपास आठ ते दहा ट्रक लाकूड नेमके गेले कुठे त्याची नोंद ठेवण्यात आली का त्याचा विल्हेवाट कोणत्या आदेशाने लावण्यात आला असा प्रश्न उपस्थित झाला आहे झाडाची छाटणी करण्याचे नियम पर्यावरणीक निकश आणि आवश्यक परवानग्याचे पालन झाले का याची चौकशी करण्याची मागणी चांदुरवाशी करीत आहे.

संबंधित अधिकाऱ्यांनी झाडांची संख्या निघालेले लाकुडाचे प्रमाण वाहतुकी आणि विलेवाट यांची संपूर्ण हिशोब सार्वजनिक करावी अशी मागणी सुद्धा जोर करत आहे.

या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून दोषी आढळल्यास अधिकाऱ्यावर नियमानुसार कारवाई करण्यात यावी.



मोर्शी पोलीस ठाण्यात ठाणेदार आठवले यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या गणपती देखाव्यातून अनेक सूचना फलक लावलेले असून ते या माध्यमातून जनजागृती करीत आहे..

# मास स्टार्ट व टाईम ट्रायलमध्ये सीताबाई संगईच्या विद्यार्थिनींचे वर्चस्व



## अमरावतीच्या सायकलिंगमध्ये नवा विक्रम



जागृती गणेशोत्सव मंडळ हमालपुरा अमरावती

**अंजनगाव सुर्जी / वार्ताहर**

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागांतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने एमआयडीसी रोड, नांदगाव पेठ, अमरावती येथे जिल्हास्तरीय शालेय सायकलिंग क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध शाळांमधील विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.या स्पर्धेत सीताबाई संगई कन्या शाळेच्या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट कामगिरी करीत विविध मास स्टार्ट व रोड रेस टाईम ट्रायल प्रकारात यश संपादन केले.

शाळेच्या सहा विद्यार्थिनींची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली असून शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.विजेत्या विद्यार्थिनींनी मध्ये १४ वर्षे वयोगट – मास स्टार्ट स्पृहा विशाल भिलांडे – द्वितीय क्रमांक १७ वर्षे वयोगट – मास स्टार्ट,भाविका उमेश जाधव – द्वितीय क्रमांक १९ वर्षे वयोगट – मास स्टार्ट,दर्शना सुनील ताडे – प्रथम क्रमांक १४ वर्षे वयोगट – टाईम ट्रायल तन्वी अजय दातीर – प्रथम क्रमांक १७ वर्षे वयोगट – टाईम ट्रायल माही पुरुषोत्तम पांडे – द्वितीय क्रमांक १९ वर्षे वयोगट – टाईम ट्रायल योगिता जगदीश देवळे – प्रथम क्रमांक या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्व यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन करण्यात आले असून विभागीय स्पर्धेसाठी त्यांना हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल सीताबाई संगई एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. उल्हास संगई, उपाध्यक्ष भरत संगई व विवेक संगई, सचिव प्रसाद संगई, सहसचिव प्रसन्न संगई व अजय संगई, कार्यकारिणी सदस्य अविनाश संगई व आशिष संगई तसेच सर्व संचालकगण, शाळेच्या मुख्याध्यापिका नीलिमा सांगोळे व पर्यवेक्षक अमोल डहाळे यांनी विजेत्या खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन केले.यशस्वी विद्यार्थिनींना शाळेचे शारीरिक शिक्षण शिक्षक श्री. समाधान शेटफळकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# महावितरणच्या विविध सेवा, सौर योजनांचा लाभ तालुक्यात एकाच छताखाली उपलब्ध

**अमरावती/ क्रा.प्र.**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक व घटनात्मक पदावरील कार्यकाळास २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या औचित्याने वीजग्राहकांना अधिक वेगवान आणि सुलभ सेवा देण्यासाठी प्रत्येक तालुक्यात महावितरणकडून विशेष सेवा कक्ष उभारून येत्या १७ ऑक्टोबर २०२६ पर्यंत 'सेवा सेतू' आणि 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे.

मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणकडून या दोन्ही अभियानाला १७ सप्टेंबरपासून प्रारंभ झाला. संचालक धनंजय औंढेकर व राजेंद्र पवार यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे अभियानाच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला व हे अभियान आणखी गतीमान करण्याची सूचना केली.

### वीजग्राहकांसाठी 'सेवा सेतू' व 'सेवा संकल्प अभियानाला प्रारंभ

यावेळी कार्यकारी संचालक (मानव संसाधन) परेश भागवत यांनी अभियानाची सविस्तर माहिती दिली. या बैठकीला कार्यकारी संचालक श्री. भुजंग खंदारे, अंकुर कावळे, श्री. सुनील काकडे, संदीप पाटील, चंद्रमणी मिश्रा यांच्यासह राज्यातील मुख्य अभियंते व अधीक्षक अभियंते उपस्थित होते. या अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शहरी व ग्रामीण भागातील प्रत्येकी दोन उत्कृष्ट मंडलांचा विशेष गौरव करण्यात येणार आहे.

सेवा संकल्प अभियान अंतर्गत प्रत्येक तालुक्यात विशेष सेवा कक्ष सुरु करण्यात आले आहेत. पीएम सूर्यघर मोफत वीज योजना, स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर (स्मार्ट) योजना, मागेल त्याला सौर कृषी पंप योजना आणि मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या अंतर्गत जागेवरच ऑनलाईन अर्ज नोंदणी, योजनेचे आर्थिक फायदे व सौर संच बसविण्याची प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे, कर्जाची सुविधा, अंदाजित खर्च यासाठी स्थानिक बँक प्रतिनिधी आणि निवडसूचीवरील सौर कंत्राटदार प्रतिनिधींशी थेट संपर्क व समन्वय करण्यात येत आहे. कर्जाची देखील सुविधा उपलब्ध होत आहे.

यासह सौर योजनांची माहिती देण्यासाठी प्रत्येक तालुक्यात स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले आहे. तसेच त्रुटींची पुर्तता करून प्रलंबित अर्जांवर त्वरित कार्यवाही करण्यात येत आहे.

# जैविक निविष्ठा उत्पादनाचे शेतकऱ्यांना धडे

**आसेगाव पूर्णा/ वार्ताहर**

कृषी विज्ञान केंद्र, घातखेड, अमरावती येथे शेतकऱ्यांसाठी दोन दिवसीय 'जैविक निविष्ठा उत्पादन व तंत्रज्ञान' प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला. जिल्ह्यातील प्रगतिशील शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी, शेतकरी गट, कृषी सखी तसेच जैविक निविष्ठा केंद्रांच्या प्रतिनिधींनी प्रशिक्षणात सहभाग घेतला.

कार्यक्रमास प्रकल्प संचालक, आत्मा अमरावती अर्चना निस्ताने प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अतुल कळसकर होते. अमर तायडे यांनी प्रशिक्षणाची रूपरेषा मांडली. प्रमुख प्रशिक्षक पाचकवडे तसेच मार्गदर्शक शुभम लहाणे यांनी शेतकऱ्यांना जैविक निविष्ठा उत्पादन व तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन केले.



दोन दिवसांच्या प्रशिक्षणात जैविक निविष्ठांची निर्मिती, उत्पादन तंत्रज्ञान, योग्य वापर, गुणवत्ता तसेच पिकांमध्ये प्रभावी वापर याबाबत शास्त्रीय माहिती देण्यात आली. विविध बाबींचे प्रात्यक्षिकांद्वारे मार्गदर्शन करण्यात आल्याने सहभागी शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

प्रगतिशील शेतकरी मिलिंद गोदे, महेंद्र रोंदे, अमोल क्षिरसागर यांच्यासह जिल्ह्यातील अनेक शेतकरी व कृषी क्षेत्रातील प्रतिनिधी उपस्थित होते. मातीचे आरोग्य जपणे, निविष्ठा खर्च कमी करणे आणि शाश्वत शेतीला चालना देण्यासाठी जैविक निविष्ठांचे महत्त्व असून, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षणातून मिळालेली माहिती उपयुक्त ठरणार असल्याचे सहभागी शेतकऱ्यांनी सांगितले.

# ना मुसळधार पाऊस, ना भूकंप; तरीही रस्त्यावरील पूल खचला !

## ग्रामस्थांनी लावले बॅरिकेड्स; प्रशासनाविरोधात रोष, संस्थानने वारंवार निवेदने देऊनही दखल न घेतल्याचा आरोप

**चांदूर रेल्वे/ वार्ताहर**

तालुक्यातील श्रीक्षेत्र सावंगा विठोबा हे विदर्भातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असून, कापूराच्या यात्रेसाठी ओळखल्या जाणाऱ्या या ठिकाणी वर्षभर मोठ्या संख्येने भाविक येतात. मात्र, चांदूर रेल्वे येथून मांजरखेड मार्गे सावंगा विठोबा येथे जाणाऱ्या प्रमुख मार्गावरील संस्थानचे विश्वस्त लक्ष्मण राठोड यांच्या शेताजवळील पूल अचानक खचल्याने वाहतुकीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

विशेष म्हणजे, परिसरात ना मुसळधार पाऊस झाला, ना भूकंपासारखी नैसर्गिक घटना घडली, तरीही रस्त्यावरील पूल खचल्याने नागरिकांमध्ये आश्चर्य व्यक्त होत आहे. या मार्गावरून होणारी जड वाहतूक आणि पुलाची झालेली दुरवस्था यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली असावी, अशी चर्चा ग्रामस्थांमध्ये आहे. मात्र, पुलाच्या खचण्याचे नेमके कारण संबंधित प्रशासनाच्या तपासणीनंतरच स्पष्ट होणार आहे.

पूल खचल्यामुळे अपघाताची शक्यता लक्षात घेता पोलीस पाटील हिरासिंग राठोड आणि ग्रामस्थांनी घटनास्थळी बॅरिकेड्स लावून हा मार्ग वाहतुकीसाठी धोकादायक असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. विशेषतः दुचाकी, चारचाकी तसेच अवजड वाहनचालकांनी या



मार्गावरून जाताना खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

रात्रीच्या वेळी या मार्गावर प्रवास करणे जीवावर बेतू शकते असे संस्थान चे विश्वस्त लक्ष्मण राठोड यांचे म्हणणे आहे.

श्री विठोबा संस्थान, सावंगा विठोबा संस्थानच्या वतीने रस्त्याची व पुलाची दुरुस्ती करण्याबाबत संबंधित प्रशासनाकडे व लोकप्रतिनिधीकडे वारंवार निवेदने देण्यात आली होती, असे संस्थानच्या पदाधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. मात्र, वेळेत दखल न घेतल्याने आज ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप संस्थांनाचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे यांनी केला ग्रामस्थाकडून प्रशासनाविषयी रोष व्यक्त होत आहे.

पूल खचल्यामुळे श्रीक्षेत्र सावंगा विठोबा येथे येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने चांदूर रेल्वे–मांजरखेड मार्गाचा वापर सध्या टाळावा, असे आवाहन श्री विठोबा संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

भाविकांनी सावंगा विठोबा येथे येण्यासाठी मालखेड मार्गे, हातला मार्गे अथवा चिरोडी फाट्यावरून पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे संस्थानने सूचित केले आहे.

भाविकांची तसेच प्रवाशांची सुरक्षितता महत्त्वाची असून, खचलेल्या पुलाच्या मार्गाने प्रवास न करता प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी ग्रामस्थ व भाविकांकडून होत आहे.या रस्त्यावर सुरक्षेच्या दृष्टीने बॅरिकेड लावन्याचे काम पोलीस पाटील हिरासिंग राठोड, विश्वस्त गोविंद राठोड, लक्ष्मण राठोड, ग्रामस्थ आशिष कुकडकर, गजानन मंगळे, किशोर राठोड, शरद पाटील, कल्पेश मंगळे, दुर्गेश राठोड आणि ईतर ग्रामस्थ उपस्थित होते

# संक्षिप्त

## पर्यावरण पूरक गणपती विसर्जनास मिळणार संशोधित शेणखत

**दर्यापूर -** पर्यावरण व समाज सेवा उपक्रमांसाठी प्रसिद्ध असलेल्या दर्यापूर तालुक्यातील माहुली ( धांडे) येथील गाडगेबाबा गोरक्षण संस्थेच्या वतीने जे लोक आपल्या घरी स्थापित गणपतीरायाचे विसर्जन गोरक्षण स्थळावरील शेततळ्यामध्ये करतील त्या सर्व व्यक्ती अथवा गणेशमंडळांना या गोरक्षण स्थळावर संशोधनाद्वारे निर्मित गाईच्या शेणखताची पाच किलो वजनाची बॅग दिल्या जाणार आहे.गोरक्षण संस्थेच्या वतीने ही योजना पर्यावरण पूरक कार्याचा गौरव म्हणून करीत असल्याची माहिती संस्थेचे सचिव शेखर पाटील यांनी दिली.गणपती स्थापनेच्या कालावधीत सुद्धा ज्या ज्या व्यक्तिंनी दर्यापूर येथील कस्तूरी नर्सरी मधून मातीचा गणपती विकत घेतला त्या सर्वांना गौरवपर याच खताची दोन किलो वजनाची बॅग गोरक्षण संस्थेद्वारे देण्यात आलेली आहे.लोकांच्या मनात धार्मिक विधी पार पाडतांना पर्यावरण संतुलन राखण्याचे भान अबाधित राहण्यासाठी व या कार्यास्तव समाजाला प्रोत्साहीत करण्यासाठी वर्षभर अश्या प्रकारच्या योजना राबविण्यात येणार असल्याचे संस्थेचे संस्थापक - विश्वस्त प्रा गजानन भारसाकळे यांनी प्रतिपादीत केले आहे . मागील वर्षी नगर परिषद दर्यापूर द्वारे संपूर्ण दर्यापूर शहरातून गोळा करण्यात आलेल्या शेकडो श्री गणेश मूर्ती याच गोरक्षण परीसरातील शेततळ्यामध्ये विसर्जित करण्यात आलेल्या होत्या ही बाब इथे आठवणीतील ठरते . कस्तूरी नर्सरी येथून मातीचा गणपती विकत नेणाऱ्या प्रा . एस के देशमुख, शिल्पा होले, डॉ बोंडे, डॉ दिपक उफाळे, अश्विन होले, सुनिल भाऊ डिके, गणेशराव लाजूरकर, सचिन कोरडे, बबलू भाऊ शहा, पटेल परिवार, परिक्षीत चिकटे, अँड आनंद महाजन इत्यादी परिवारांनी गणेश स्थापना व विसर्जन या दोन्ही दिवसाला गाडगेबाबा गोरक्षण संस्थेने जाहीर केलेल्या पर्यावरण कार्याच्या या अभिनव उपक्रमा बद्दल मनस्वी आभार व्यक्त करून अभिनंदन केले आहे .



## कुऱ्हा येथील मुलांचा बॅडमिंटन संघ जिल्हास्तरावर



**कुऱ्हा -** स्थानिक अशोक शिक्षण संस्था अशोकनगर द्वारा संचालित कुऱ्हा हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालय कुऱ्हा येथील १७ वर्षे वयोगटातील मुलांचा बॅडमिंटन संघ क्रीडा व युवक संचालनालया अंतर्गत घेतल्या जाणाऱ्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये विजय होऊन हा संघ जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेकरिता पात्र ठरला आहे.या संघामध्ये वेदांग लाडेकर, सुवेध मोरे, क्रांती कुरळकर, भावेश कांबळी, समर्थ तिरमारे, इत्यादी खेळाडू सहभागी होते या यशाबद्दल अशोक शिक्षण संस्था, अध्यक्ष, एस. एन. शेंडे साहेब व संचालक मंडळ,व मा. मुख्याध्यपिका, कु. आर. जी. कुमरे मॅडम व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी विजयी संघांचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.

## 'आयुर्वेद फॉर हेल्दियर टुमॉरो' अंतर्गत सेवा संकल्प अभियान

**अमरावती -** पी. आर. पोटे पाटील एज्युकेशन अँड वेलफेअर ट्रस्ट द्वारा संचलित पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ मेडिकल सायन्सेस आयुर्वेद, येथे '११ व्या आयुर्वेद दिना'च्या उत्सवाचा एक भाग म्हणून भव्य निबंध स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. ही स्पर्धा महाविद्यालयातील 'कश्यप हॉल' येथे सकाळी १०:०० ते ११:०० या वेळेत पार पडली.विद्यार्थ्यांमध्ये आयुर्वेदाविषयीचे ज्ञान आणि संशोधनात्मक वृत्ती वाढीस लागावी, या उद्देशाने वेगवेगळ्या वर्षांतील विद्यार्थ्यांसाठी खालीलप्रमाणे विषय देण्यात आले होते.प्रथम वर्ष १) आयुर्वेदानुसार पचन आरोग्य आणि पोषण , द्वितीय वर्ष आयुर्वेदाच्या साहाय्याने जीवनशैलीशी संबंधित आजारांचा सामना , तृतीय वर्षआयुर्वेदातील अलीकडील संशोधन आणि नवकल्पना आहे.

गणेशोत्सवनिमित्य रोगनिदान व औषधोपचार शिबीर

खल्लार-नजिकच्या असदपूर येथे गणेशोत्सवानिमित्य दयासागर दवाखाना अमरावती व संत मेरीस ॲलोपॅथिक दवाखाना असदपूर यांच्या सहकार्याने हनुमान गणेश मंडळ, असदपूर तथा क्रांती गणेश उत्सव मंडळ असदपूर यांच्या वतीने मोफत रोगनिदान व औषध उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.शिबिरासाठी दयासागर दवाखान्याचे तज्ञ डॉक्टर व आरोग्य सेविका व असदपूर येथिल संत मेरीस ऑलोपॅथिक दवाखान्यातील डॉक्टर व कर्मचारी उपस्थित होते.हे शिबीर असदपूर येथिल सामाजिक कार्यकर्ते सचिन ढवळे यांच्या संकल्पनेतून पार पाडले. शिबिराला असदपूर व शहापूर ग्रामपंचायत सरपंच मोहन मुंदाने, अक्षय चऱ्हाटे यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबीर यशस्वी करण्यासाठी निलेश गिरी, डॉ.सोपान म्हाला, दिनेश बडवाईक, संदीप बारबुध्दे, देवानंद भुस्कट संतोष नितनवरे, अक्षय रामेकर, अतुल चिमोटे, भुषण लांडे, गजानन बडवाईक, मंगेश लांडे तथा दोन्ही मंडळांचे सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. शिबिरात १८० महीला व पुरुष रुग्णाची मोफत तपासणी व औषधोपचार केले.

## अजगराला सर्पमित्रांनी दिले जीवदान

**कुऱ्हा -** २३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी सुमारे ८.५० वाजता मौजा जगदीशपूर शेत शिवारातील पवार फार्म येथे कोंबड्यांच्या शेडचे दार उघडण्यासाठी गेलेल्या प्रविण पवार यांना तारेमध्ये अडकलेला सुमारे ५ ते ६ फूट लांबीचा साप आढळून आला.साप अडकल्याचे लक्षात येताच त्यांनी तातडीने कुऱ्हा येथील सर्पमित्र विशाल मालवीय यांच्याशी संपर्क साधला. माहिती मिळताच सर्पमित्र विशाल मालवीय आणि त्यांचे सहकारी अक्षय कुऱ्हेकर यांनी घटनास्थळी धाव घेतली. सर्पमित्रांनी कौशल्याने आणि काळजीपूर्वक प्रयत्न करून अजगराला अडकलेल्या तारांमधून सुखरूप बाहेर काढले. त्यानंतर त्याला सुरक्षित ठिकाणी निसर्गाच्या अधिवासात सोडण्यात आले.



# अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात निवडणुकीचे बिगुल

## प्रमुख राजकीय पक्षांसह शिक्षक संघाटनाही मैदानात, २३ ऑक्टोबरला मतदान

**अमरावती/प्रतिनिधी**

अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात निवडणुकीचे रणशिंग फुंकले आहे. २३ ऑक्टोबरला मतदान होणार असल्याने पाचही जिल्ह्यांत राजकीय मोर्चेबांधणीला वेग आला आहे.अमरावती, अकोला, बुलडाणा, वाशिम आणि यवतमाळ या पाच जिल्ह्यांचा समावेश असलेल्या या प्रतिष्ठेच्या मतदारसंघासाठी काँग्रेस, भाजपा, शिवसेना आणि ठाकरे गटासह शिक्षक संघटनांनीही कंबर कसली आहे. इच्छुकांच्या नावांची चाचपणी सुरू झाली असून विद्यमान आमदारांची भूमिका आणि संघटनांची ताकद निर्णायक ठरणार आहे.

**काँग्रेसच्या गोटात आदिती पोहरे यांचे नाव आघाडीवर**

काँग्रेसकडून प्रा. आदिती पोहरे यांचे नाव सध्या सर्वाधिक चर्चेत आहे. त्यांच्या उमेदवारीवर जवळपास शिक्कामोर्तब झाल्याचे सांगितले जात असले तरी अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही. त्यामुळे प्रा. पोहरे यांच्याकडे काँग्रेसच्या संभाव्य उमेदवार म्हणून पाहिले जात आहे.प्रा. आदिती पोहरे या माजी मंत्री हर्षवर्धन देशमुख यांच्या कन्या आहेत. विद्यमान आमदार किरण सरनाईक यांचे नाव यापूर्वी काँग्रेसच्या संभाव्य दावेदारांमध्ये होतं. मात्र, त्यांनी नंतर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे सहयोगी सदस्यत्व स्वीकारल्यानं काँग्रेसच्या संभाव्य उमेदवारीची समीकरणे बदलली आहेत.

**भाजपामध्ये दोन नावांची चर्चा**

भाजपाकडून अद्याप अंतिम उमेदवाराची घोषणा झालेली नाही. मात्र पक्षाच्या वर्तुळात डॉ. संगीता शिंदे आणि डॉ. सुमित पवार या दोन नावांची चर्चा सुरू आहे. डॉ. संगीता शिंदे या भाजपा शिक्षक आघाडीच्या विभाग संयोजक म्हणून काम करत असून, त्या खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या भगिनी आहेत. भाजपाच्या संभाव्य उमेदवारांमध्ये त्यांचे नाव आघाडीवर असल्याचे बोलले जात आहे.डॉ. सुमित पवार यांचे नावही भाजपाच्या संभाव्य उमेदवारांमध्ये आहे. भाजपाचे जिल्हा सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे विभाग कार्यवाह आणि राज्यशास्त्र परिषदेचे संस्थापक अध्यक्ष अशी त्यांची संघटनात्मक पार्श्वभूमी आहे.

**महायुतीत शिवसेनेची भूमिका लक्षवेधी**

महायुतीतील जागावाटपाच्या पार्श्वभूमीवर अमरावती मतदारसंघात शिवसेनेची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. माजी आमदार श्रीकांत देशपांडे यांनी ५ सप्टेंबर रोजी शिवसेनेकडून निवडणूक लढण्याची इच्छा जाहीर केली. पक्षाची उमेदवारी मिळाली नाही, तरी पक्ष म्हणून निवडणूक लढविण्याची तयारी असल्याचं त्यांनी स्पष्ट केले.

दुसरीकडे, विद्यमान आमदार किरण सरनाईक यांनी शिवसेनेचे सहयोगी सदस्यत्व स्वीकारले आहे. त्यामुळे उमेदवारीचा निर्णय घेताना सेनेकडून सरनाईक आणि देशपांडे या दोन्ही नावांचा विचार होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शिवसेनेची अंतिम भूमिका या निवडणुकीतील महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

**ठाकरेंच्या शिवसेनेकडून दत्तात्रय लहाने उमेदवार**

इतर पक्षांच्या तुलनेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे चित्र अधिक स्पष्ट आहे. पक्षाने प्रा. दत्तात्रय लहाने यांना अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातून उमेदवारी जाहीर केली आहे. काही दिवसांपूर्वीच दत्तात्रय लहाने यांनी अमरावती शिक्षक सेना आणि शिवसैनिकांचा संकल्प मेळावाही घेतला होता.



**शिक्षक परिषद स्वतंत्र मैदानात**

या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे राजकीय पक्षांसोबतच शिक्षक संघटनाही स्वतंत्र भूमिका घेण्याच्या तयारीत आहेत. महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने अमरावती विभागाची निवडणूक स्वतंत्रपणे लढविण्याचा निर्णय यापूर्वीच जाहीर केला आहे. डिसेंबर २०२५ मध्ये झालेल्या बैठकीत पाचही जिल्ह्यांतील पदाधिकाऱ्यांनी स्वतंत्र उमेदवार देण्याचा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, अद्याप संघटनेकडून अंतिम उमेदवाराचे नाव जाहीर करण्यात आलेले नाही.डॉ. सुमित पवार हे शिक्षक परिषदेच्या विभागीय जबाबदारीसोबतच भाजपाशीही संबंधित आहेत. त्यामुळे त्यांची पुढील भूमिका कोणत्या दिशेने जाते, याकडे लक्ष लागले आहे.

**विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाकडून दिलीप कडू :-** विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाकडून दिलीप कडू यांचे नाव पुढे आहे. गेल्या दीड ते दोन वर्षांपासून दिलीप कडू निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत.

**पाचही जिल्ह्यांतील गणित महत्त्वाचे**

अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाचे क्षेत्र पाच जिल्ह्यांत विस्तारलेले असल्याने निवडणुकीचे गणित एका जिल्ह्यापुरते मर्यादित राहणार नाही. अमरावतीसह अकोला, बुलडाणा, वाशिम आणि यवतमाळ या सर्व जिल्ह्यांतील शिक्षक मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी पक्ष आणि संघटनांना स्वतंत्र रणनीती आखावी लागणार आहे.

**यांनी केले नेतृत्व**

अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात १९९० ते १९९६ दरम्यान वसंतराव मालधुरे यांनी नेतृत्व केले. त्यानंतर १९९६ ते २००२ या कालावधीत दिवाकरराव पांडे, २००२ ते २०१४ या काळात सलग दोन वेळा वसंतराव खोटरे, २०१४ ते २०२० दरम्यान प्रा. श्रीकांत देशपांडे आणि २०२० ते २०२६ या कालावधीत किरण सरनाईक निवडून आले.

**२०२० मध्ये किरण सरनाईक यांचा विजय**

२०२० च्या निवडणुकीत किरण सरनाईक यांनी प्रा. श्रीकांत देशपांडे यांचा पराभव केला होता. या निवडणुकीत प्रा. श्रीकांत देशपांडे यांना ६ हजार ४५२ मते मिळाली, तर किरण सरनाईक यांनी १५ हजार ६०६ मते मिळवत विजय मिळवला.

# गौरी-गणपतीच्या अंगणात रिल्सचा गाजावाजा : परंपरेला ट्रेंडचा तडका!

**पू**र्वी गौरी-गणपती आला की घरात भजन, आरत्या, झिम्मा-फुगडी आणि पारंपरिक गाण्यांचा नाद घुमायचा. पण यंदाच्या उत्सवाचे चित्र थोडे वेगळे आहे. अंगणात गौरींचे आगमन होताच हातातला मोबाईल वर येतो, रिंग लाईट लागते आणि सुरू होते एकच धमाल - रिल्सची! गेल्या १५ दिवसांपासून इंस्टाग्राम, फेसबुक आणि युट्यूब शॉट्र्सवर फक्त एकच ट्रेंड दिसतोय - गौरींसोबत डान्स रिल्स. आणि या ट्रेंडचे दोन अनभिषिक्त सम्राट आहेत - 'गाजावाजा' आणि 'पिरी पिरी नाच पोरा' ही गाणी.हजारो महिलांनी, कुटुंबांनी या गाण्यांवर रिल्स बनवून व्हायरल केल्या आहेत. हा केवळ टाईमपास राहिला नसून, तो आता उत्सवाचाच एक भाग बनला आहे.

**हीच दोन गाणी का गाजत आहेत?**

**१. गाजावाजा - उत्सवाचा हाच तर बाजा!**

हे गाणे ऐकताच आपोआप पाय थिरकतात. यात ढोल-ताशाचा पारंपरिक ठेका आहे, पण त्याला आधुनिक डीजे बीटची जोड दिली आहे. गाण्याचे शब्द - माहेरवाशीण आली, घराला गौरीच्या पावलांनी शोभा आली, सडा-सारवण, आरास - हे सगळे प्रत्येक घरात घडत असते. त्यामुळे महिला वर्गाला हे गाणे आपलेसे वाटते. साडी नेसून, नथ घालून, गौरीसमोर चार सोप्या स्टेप्स करणे एकदम सोपे आणि सुंदर दिसतं.





**२. पिरी पिरी नाच पोरा - धमाल मस्ती!** - हे गाणे थोडे अधिक एनर्जेटिक, मस्तीखोर आहे. यात लहान मुलांपासून ते तरुण मुलींपर्यंत सगळ्यांना नाचण्याची संधी मिळते. याच्या स्टेप्स तर इतक्या सोप्या आहेत की दोन वेळा पाहिले की कुणालाही येतात. त्यामुळे 'भावजय-नणंद चॅलेंज', 'आई-मुलगी डान्स', 'सासू-सून जुगलबंदी' या सगळ्या प्रकारच्या रिल्ससाठी हे गाणे परफेक्ट आहे.

### 'गाजावाजा' आणि 'पिरी पिरी नाच पोरा' गाण्यांनी जिंकली तरुणाईची मने

**रिल्समुळे उत्सव कसा बदलला?**

**अ) एकत्र येण्याचे नवे कारण** : पूर्वी गौरीपुढे फक्त गप्पा व्हायच्या. आता रिल्स बनवण्यासाठी सगळ्या महिला, मुली एकत्र येतात, एकाच रंगाची साडी ठरवतात, प्रॅक्टिस करतात. या निमित्ताने एकत्र येणे वाढलं आहे.

**ब) पारंपरिक वेशभूषेचे पुनरागमन** : रिल्समध्ये सुंदर दिसण्यासाठी तरुण मुली मुद्दामहून आईच्या कपाटातली पैठणी, नऊवारी साडी, ठुशी, नथ काढून घालतात. जे पारंपरिक दागिने विस्मरणात गेले होते, ते रिल्समुळे पुन्हा ट्रेंडमध्ये आले आहेत.

**क) गाव ते परदेश - एकच ट्रेंड** : पुण्यातील एका सोसायटीतली गौरी असो की अमेरिकेत राहणाऱ्या मराठी कुटुंबाची गौरी, सगळीकडे हाच ट्रेंड आहे. त्यामुळे आपला सण जागतिक झाला आहे.

**यावर टीकाही होत आहे...**

काही ज्येष्ठ मंडळी म्हणतात, 'गौरी हा भक्तीचा आणि माहेरपणाचा सण आहे, त्याचा इव्हेंट करू नका. रिल्सच्या नादात गौरीकडे लक्षच नाही.' त्यांचे म्हणणेही काही अंशी खरे आहे. काही ठिकाणी रात्रभर रिल्स शूट करून गोंधळ घातला जातो, मोठ्या आवाजात एकच गाणे ५० वेळा वाजवले जाते,यामुळे शेजाऱ्यांना त्रास होतो.पण दुसरी बाजू अशी आहे की, याच रिल्समुळे जी तरुण पिढी गणपतीत फक्त मोबाईलमध्ये असायची, ती आता आवर्जून गौरीच्या सजावटीत, नाचात सहभागी होत आहे.

परंपरा टिकवायची असेल तर ती काळानुसार थोडी बदलली पाहिजे, असे तरुणांचे मत आहे.

शेवटी तंत्रज्ञान कितीही आले तरी उत्सवाचा गाभा तोच राहतो - आनंद, एकोपा आणि आठवणी. पूर्वी त्या आठवणी फोटो अल्बममध्ये बंद व्हायच्या, आता त्या रिल्सच्या माध्यमातून हजारो लोकांपर्यंत पोहोचतात. 'गाजावाजा' आणि 'पिरी पिरी' ही गाणी पुढच्या वर्षी कदाचित विसरली जातील, पण यंदा त्यांनी गौरी-गणपतीच्या अंगणात जो उत्साह आणि नवा रंग भरला आहे, तो मात्र नक्कीच लक्षात राहील.

# श्री सिद्धिविनायक सूर्यमुखी गणपती मंदिर निंभा

**अ**मरावती जिल्ह्यातील भातकुली तालुक्यात पेढी नदीकाठी वसलेले निंभा गाव, आणि याच गावच्या पश्चिम दिशेला पेढीनदीच्या काठावर एक अतिप्राचीन आणि स्वयंभू जागृत असे गणेश मंदिर आहे. हे गणेश मंदिर नक्की कुठल्या कालखंडातील आहे. हे निश्चित सांगता येत नाही. याबाबत ठोस पुरावे सुद्धा उपलब्ध नाही. निंभा येथील गणपती मंदिर हे सूर्यमुखी आहे. गणेशाच्या मूर्तीचे तोंड हे उगवत्या सूर्याच्या दिशेने असल्याने याला धार्मिक महत्व प्राप्त झाले आहे.आध्यात्मिक दृष्टीने या गणेशाला अत्यंत शुभ आणि फलदायी मानले जाते. त्यामुळेच याला सिद्धिविनायक म्हणूनही संबोधले जाते.

निंभा येथील सूर्यमुखी गणपती मंदिरातील वैशिष्ट्य म्हणजे ही मूर्ती पूर्णपणे काळ्या पाषाणापासून बनलेली असून, चतुर्भूज स्वरूपाची आहे. शेंदूर लेपाटण केलेली असून, भूमीवर ठाण मांडून बसलेली आहे. ही स्वयंभू चतुर्भुज गणेश मूर्ती शिवलिंगाची पूजा करत आहे




अशा स्वरूपात दाखवलेली आहे.या गणेशाची सोंड नेमकी कुठल्या हातावर आहे हे सेंदूर लेपाटणामुळे स्पष्टपणे दिसत नाही. परंतु बहुतांश सूर्यमुखी गणपतींची सोंड ही उजव्या हातावर राहते. त्यामुळे त्यांची पुजा विधी ही थोडी कठीण असतात.

सूर्यमुखी गणपतीला गणेशाचे एक दुर्मिळ आणि पवित्र असे रूप मानले जाते.सूर्याकडे तोंड असल्यामुळे सकाळची पहिली तांबूस कोवळी सूर्यकिरणे थेट मंदिरातील गणेशाच्या मूर्तीवर पडतात. सूर्य हा ऊर्जा, तेज आणि आरोग्याचा कारक मानला जातो.अश्या सूर्यमुखी गणेशाची पुजा अर्चना केल्याने भक्तांना सकारात्मक ऊर्जेसोबत उत्तम आरोग्य, ज्ञान, तेज, सदविवेक बुद्धी, आणि यश प्राप्त होते.सूर्याच्या प्रकाशाप्रमाणे भक्तांच्या जीवनातील अंधार आणि सर्व प्रकारची विघ्ने हा सिद्धिविनायक नष्ट करतो. अशी भाविकांची गाढ श्रद्धा आहे.

निंभा येथील सिद्धिविनायक गणेश मंदिर सूर्यमुखी असल्याबरोबर पेढी नदीच्या काठावर असल्याने विशेष महत्व प्राप्त झाले आहे.या गणेश मूर्तीने कित्येकदा नदीला आलेल्या महापुरात स्नान केले आहे.या गणेश मंदिरात प्रत्येक संकष्ट चतुर्थी तसेच श्रावण, पौष आणि अधिक मासातील चतुर्थीला भाविकांची गर्दी बघायला मिळते.जो कुणी भक्त मनापासून या सिद्धिविनायकाची श्रद्धेने उपासना करेल, त्याच्या जीवनातील दुःख,अंधार दूर होऊन त्याचे जीवन सुखी समृद्धी होईल.

**वैभव कन्हेरकर**
निंभा ता. भातकुली
मो. ९६७३१६२३७३

## सामाजिक उत्सव संहीता...

समाज हीताचे ठेवूनी भान
उपक्रम सर्वांनी राबवावे
पण आपल्या उपक्रमाचे
कोणतेही उपद्रव मुल्य नसावे..!

वर्गणी असो की देणगी
स्वखुशीने स्विकारावे
टेंशन येईल दात्याला
असे कार्यकर्तांचे वर्तन नसावे..!


डीजेच्या स्फोटक आवाजाने
कान बधीर तर छाती धडधडते
हार्ट पेशंटच्या जिवालाच
धोका नाही का गडे?..!

लेजरच्या प्रखर कीरणांनी
दृष्टीवर होतो दुष्परीणाम
मंडळांनो सदविचार करा
सामाजिक आरोग्याची ठेवा
जाण..!

**प्रा.अशोक सारडा,**
मेहकर
मो.९४२१३९४३३९

# संत 'नीम करोली बाबा...'

**व**र्ष १९०० ते वर्ष १९७३ कार्यकाल असणारे उत्तर प्रदेशातील एक उच्च अध्यात्मिक अधिकारी 'संत नीम करोली बाबा'यांच्या आत्मचरित्रावर आधारित 'हनुमान अंश' चित्रपटाचा सध्या बोलबाला आहे. हनुमान भक्त आणि दैनंदिन प्रसंगातून अत्यंत सोप्या भाषेत अध्यात्माची शिकवण देणारे संत नीम करोली बाबा यांनी केलेले चमत्कार आणि त्यांच्याविषयीच्या अनुभूती सांगणारे अनेक भक्त उत्तर भारतात अनेक ठिकाणी आहेत. रेल्वे कर्मचाऱ्यांनी अपमान करून रेल्वेतून बाहेर काढल्यावर पूर्ण गाडी जागी थांबवण्याची क्षमता असणारे, शत्रूने पूर्णता घेरलेल्या भक्ताच्या सैनिक मुलाचे प्राण वाचवणे,अनेक लिटर पाण्याचे तुपात रूपांतर करणे, शिष्याजवळील मोठ्या प्रमाणात असलेल्या अमली पदार्थाच्या सर्व गोळ्या एकाच वेळी स्वतः खाऊन




त्याला व्यसनमुक्त करणे आदी चमत्कार त्यांनी केले आहे. एकाच वेळी स्थलांतून अनेक ठिकाणी दिसल्याच्या, केवळ स्पर्श किंवा संकल्प यांनी गंभीर आजारातून बरे केल्याच्या अनेक अनुभूती असलेले त्यांचे भक्त अनेक ठिकाणी आहे. क्रिकेट खेळाडू 'विराट कोहली', फेसबुकचे संस्थापक 'झुकरबर्ग', 'ॲपल' आस्थापनाचे सहसंस्थापक 'स्टीव्ह जॉब्स', हॉलीवुड अभिनेत्री 'ज्युलिया रॉबर्ट्स' आदींनी त्यांना भेटून प्रभावित झाल्याचे आणि त्यांच्या जीवनावर त्यांचा प्रभाव असल्याचे सांगितले आहे.

सात ऑगस्टला प्रदर्शित झालेला 'हनुमान अंश' हा चित्रपट खरं तर आपटलाच होता.पहिले पंधरा दिवस पंधरा ते वीस लाख रुपयांची कमाई करणारा हा चित्रपट आता तीनशे कोटींची कमाई करून सर्वाधिक लाभांश कमावणाऱ्या 'टॉक्सिक' सारख्या प्रचंड हाणामारीच्या चित्रपटाला ही या चित्रपटाने ठेंगा दाखवला आहे. प्रारंभी या चित्रपटाचे प्रमोशन जवळपास नाहीच म्हटले तरी चालेल एवढे कमी होते. विज्ञापनासाठी पैसे नसल्याने निर्मात्याने आठ ठिकाणी भंडाऱ्यांचे आयोजन केले आणि त्या माध्यमातून चित्रपटाचा प्रसार केला. चित्रपट गृहातून चित्रपट काढण्याचा दबाव येऊनही त्याचा परिणाम झाला नाही.

एखाद्या संतांच्या जीवनावर आधारित अध्यात्मिक विषयाच्या चित्रपटाने एवढे पैसे कमावणे ही जगाच्या चित्रपट विश्वातील पहिलीच घटना म्हणावी लागेल. सर्वात विशेष म्हणजे अत्यंत अल्प दोन कोटी रुपयांच्या बजेटमध्ये या चित्रपटाची निर्मिती झाली आणि यात कुणीही स्टार किंवा स्टारडम नाही. विशाल चतुर्वेदी दिग्दर्शित या चित्रपटात शोभिनो सत्य यांनी संत नीम करोली बाबा यांची भूमिका केली आहे. उत्तर भारतात संत नीम करोली बाबा यांचे अनेक भक्त आहेत आणि परस्परांच्या संपर्कातून चित्रपटाचे दर्शक वाढले आहे. 'टॉक्सिक' या सध्या मोठ्या प्रमाणात चाललेल्या चित्रपटात प्रचंड प्रमाणात हिंसाचार दाखवल्या गेल्याने त्याला नकारात्मक प्रतिसाद मिळत आहे पण त्या तुलनेत 'हनुमान अंश' पाहून चांगले वाटते अशा लोकांच्या प्रतिक्रिया आहेत. सत्य घटनेवर आधारित, दैवी अनुभूती सांगणारा चित्रपट जनतेला भावत आहे. रसिक तेच आहेत पण 'हनुमान अंश' अधिक भाववत आहे याचाच अर्थ सध्याच्या तमप्रधान वातावरणातही तमोगुणी प्रक्षेपणापेक्षा सत्वगुणी प्रक्षेपण हे जीवाला शांती आणि आनंद देणारे आहे हे यामागील कारण आहे. संगीत आणि काव्य यांचा सुरेख संगम झाल्याने भाविकांना नवीन अध्यात्मिक गाणी मिळू शकतात. यातील 'मै तेरे ही भरोसे हनुमान..सागर में नाव डेरी है' हे सध्याच्या धकाधकीच्या जीवनात भगवंतावर सर्व ताण सोपवणाऱ्या गीताचा अर्थ आणि संगीत दोन्हीही सामान्यांच्या मनाला दिलासा देणार आहे. त्यामुळे हे गाणे सध्या लोकप्रिय होत आहे आणि त्याची लोकप्रियता वाढत जाण्याची शक्यता आहे. उत्तर प्रदेश शी बुंदेली गावरान आवाज असलेले पंचवीस वर्षाचे नेत्रहीन सुनील लोधी यांनी यातील गाणी गायली आहेत चित्रपट तज्ञ हा चित्रपट चालणे हे अभ्यासासाठी उदाहरण म्हणून घ्यावे असे सांगत आहे.

'हनुमान अंश' चित्रपटातील कलाकारांनी जेवढ्या श्रद्धेने, एकरूप होऊन आणि अन्य संबंधित कलाकारांनाही धार्मिक काम म्हणून कामे केली. भारतात सहस्त्र संत होऊन गेले, नव्हे ही साक्षात देवभूमीच आहे. त्यामुळे चित्रपट माध्यमाचा उपयोगही भक्ती वृद्धिंगत करण्यासाठी झाला तर संबंधित सर्वांची साधना होईल. केवळ मनोरंजनासाठी कला आणि भोगवादी समाज निर्माण करणारी कला या सध्याच्या परिस्थितीत 'हनुमान अंश' हा चित्रपट पुष्कळच काही शिकवून जात आहे. संपूर्ण जग युद्धासह नैसर्गिक संकटाच्या आपत्कालातून जात असताना 'भक्तिविना तरणोपाय' नाही ही संतांची शिकवण समाजाला भावत आहे हेच या चित्रपटाच्या यशातून लक्षात येते.


**लीना गाडगीळ,**
न्यू पनवेल

## दिवाळी विशेषांक - २०२६

दरवर्षी प्रमाणे यंदाही आम्ही 'जनमाध्यम' दिवाळी विशेष अंक प्रकाशित करणार आहोत. या अंकाच्या माध्यमातून आम्ही नवसाहित्यीकांना व्यासपीठ मिळवून देणार आहोत. साहित्यीकांचे राजकीय, सामजिक, वैचारिक लेख, कविता, व्यंगचित्र, चारोळ्या, संवाद, प्रतिक्रिया आदी साहित्य प्रसिद्ध करण्यात येणार आहे. हा अंक आमच्या ऑनलाईन पोर्टलवर सुद्धा उपलब्ध राहणार आहे. सदर दिवाळी अंक हा फक्त दिवाळीच्या पाच दिवसात वाचून संपावावा असा नसून एक संग्राह्य असा आहे. तरी या दिवाळी अंकाकरिता आपल्या बोलीभाषेतून दर्जेदार साहित्याचा समावेश करावा अशी दैनिक 'जनमाध्यम' तर्फ विनंती...आपले साहित्य atimadhyam@gmail.com या ई-मेल वर किंवा ९८२२६६४०६७ या व्हाट्सअॅप नंबर वर पाठवावे. तसेच कागदावर लिहिलेले साहित्य हे जनमाध्यम कार्यालय, तिसरा माळा अनगळ कॉम्प्लेक्स, राजकमल चौक येथे पाठवू शकता. येणारे साहित्य अंकामध्ये वापरण्याचा अधिकार 'जनमाध्यम'कडे राखीव राहील.इच्छुक लेखकांनी आपले साहित्य दि.२० ऑक्टो.२०२६ पर्यंत जनमाध्यम कार्यालयात पोहचतील या बेताने पाठवावे.

# गणेश मूर्तीमुळेच जलप्रदूषण होते का ?

**न**दीपात्रात किंवा समुद्रात श्री गणेश मूर्तीचे विसर्जन केल्यामुळे जलप्रदूषण होत असल्याचा कांगावा काही तथाकथित पर्यावरणप्रेमींकडून केवळ गणेशोत्सवाच्या काळातच केला जातो आणि त्यासाठी मूर्तीदान करण्याचे किंवा मूर्तीचे कृत्रिम हौदात विसर्जन करण्याचे आवाहन गणेशभक्तांना केले जाते. श्री गणेशमूर्तीचे विसर्जन वाहत्या पाण्यात किंवा नैसर्गिक स्त्रोत असलेल्या ठिकाणी करावे असा धर्मशास्त्रीय सिद्धांत असून त्यामागील शास्त्रीय कारणही तितकेच महत्वाचे आहे. गणेशोत्सव काळात किती जलप्रदूषण होते याचे कोणतेही परीक्षण आजतागायत करण्यात आलेले नाही किंवा तसा अहवालही कुठे सादर करण्यात आलेला नाही, मग ही नुसतीच आधारहीन बोंब दरवर्षी कशासाठी? यंदा दीड आणि ५ दिवसांच्या गणेशमूर्ती विसर्जनाच्या वेळी अनेक नद्यांच्या आणि नैसर्गिक तळ्यांच्या ठिकाणी कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. हे पोलीस गणेशभक्तांना नद्यांमध्ये आणि तळ्यांमध्ये मूर्ती विसर्जन करू देत नव्हते. अशा प्रकारे गणेशभक्तांवर बळाचा वापर करून त्यांना वाहत्या पाण्यात मूर्तीविसर्जन करण्यास मज्जाव करायचा आणि 'यंदा गणेश भक्तांची कृत्रिम हौदांना पसंती' अशा मथळ्याच्या बातम्या प्रसारित करायच्या हा कुठला न्याय आहे? नद्या आणि समुद्रामध्ये कारखान्यांचे रसायनमिश्रित पाणी आणि सांडपाणी प्रतिदिन मोठ्या प्रमाणात सोडले जाते याविषयी पर्यावरणप्रेमी वर्षभर काहीच बोलताना



आढळत नाहीत. कत्तलखान्यातील रक्त मिश्रित पाणी आणि प्राण्यांचे अवयव नद्यांमध्ये सोडले जातात याकडेही ही मंडळी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात. त्यामुळे पर्यावरण प्रेमाचे डोस केवळ गणेशभक्तांनाच पाजण्याऐवजी वर्षभर पाणी प्रदूषित करणाऱ्या मंडळींना आणि त्यांना अनिर्बंध सोडणाऱ्या प्रशासनालाही पाजावेत जेणेकरून खऱ्या अर्थाने पर्यावरणाचे रक्षण होईल.

**मोक्षदा घाणेकर**

# हातगाड्या तोडण्याचा अधिकार मनपाला कुणी दिला ?

## नो हॉकर्स झोनमधील कारवाईवर आ. साजिद खान पठाण आक्रमक ; आयुक्तांकडे जाब

■ प्रतिनिधी | अकोला ■

नो हॉकर्स झोनमध्ये अतिक्रमण करणाऱ्या फेरीवाल्यांवर कारवाई करण्यास विरोध नाही; मात्र कारवाईच्या नावाखाली गोरगरिबांच्या हातगाड्या जेसीबीच्या सहाय्याने तोडून त्यांचे आर्थिक नुकसान करण्याचा प्रकार खपवून घेतला जाणार नाही, अशी आक्रमक भूमिका अकोला पश्चिमचे आमदार साजिद खान पठाण यांनी बुधवारी घेतली. गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मनपाच्या अतिक्रमणविरोधी मोहिमेत हातगाड्यांची तोडफोड आणि साहित्याचे नुकसान झाल्याच्या तक्रारीनंतर आमदार पठाण यांनी काँग्रेसच्या नगरसेवकांसह मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांची भेट घेतली.

नो हॉकर्स झोनमध्ये अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करणे हा प्रशासनाचा अधिकार आहे. मात्र, एखाद्या फेरीवाल्याने नियम मोडला म्हणून त्याची उपजीविकेचे साधन असलेली हातगाडीच तोडून टाकणे, साहित्याची नासधूस करणे हा कारवाईचा योग्य मार्ग नाही, असा मुद्दा आमदार पठाण यांनी आयुक्तांसमोर उपस्थित केला.

यावेळी मनपा विरोधी पक्षनेते डॉ. जिशान हुसैन, महानगर अध्यक्ष महेंद्र गवई, नगरसेवक अब्दुल सलाम, आकाश कवडे, अफसर कुरैशी, गुड्डू पठाण, मो. इलियास आझाद खान, मो. इरफान, मोईन खान, फजलू पहलवान, आर्किटेक्ट सोहेल खान, शेख अब्दुल्ला, पराग कांबळे, लाला पठाण, मो. युसुफ, मो. नवेद, तशवर पटेल, सोहेल पठाण, मंजूर अहमद, सोनू खान व काँग्रेसचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, फेरीवाले मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**१२ फेरीवाल्यांच्या हातगाड्या उद्ध्वस्त : काँग्रेसचा मदतीचा हात**

गेल्या दोन दिवसांत झालेल्या कारवाईदरम्यान तब्बल १२ फेरीवाल्यांच्या वाहनांचे किंवा हातगाड्यांचे नुकसान झाल्याचे यावेळी समोर आले. कारवाईत नुकसान झालेल्या या फेरीवाल्यांच्या पाठीशी उभे राहत आमदार साजिद खान पठाण यांच्याकडून पाच हजार आणि काँग्रेसच्या सर्व नगरसेवकांनी एकत्रितपणे मिळून पाच हजार असे प्रत्येक नुकसानग्रस्त फेरीवाल्याला एकूण १० हजार रुपये रोख मदत दिली. मनपाच्या कारवाईने हातातील रोजगाराचे साधन हिरावले गेलेल्या फेरीवाल्यांना या मदतीमुळे काहीसा दिलासा मिळाला.

**'अतिक्रमणाला समर्थन नाही; पण अतिरेकही नको'**

फेरीवाल्यांच्या प्रश्नावर काँग्रेस अतिक्रमणाचे समर्थन करीत नाही, हे स्पष्ट करत आमदार पठाण यांनी प्रशासनाच्या कारवाईतील पद्धतीवर आक्षेप घेतला. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या फेरीवाल्यांवर दंड आकारावा, त्यांचे साहित्य किंवा वाहन जप्त करावे आणि नियमानुसार पुढील कारवाई करावी. मात्र, जेसीबी लावून हातगाड्या तोडण्याची कारवाई करू नये, अशी स्पष्ट मागणी त्यांनी केली. गोरगरिबांसाठी हातगाडी हा केवळ व्यवसाय नसून त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविण्याचे साधन आहे. अशा परिस्थितीत कारवाई करताना प्रशासनाने नियमांसोबतच मानवी दृष्टिकोनही ठेवणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

**आयुक्तांचा सकारात्मक पवित्रा**

आमदार पठाण आणि काँग्रेस नगरसेवकांनी मांडलेल्या मुद्द्यांवर मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी सकारात्मक भूमिका घेतली. यापुढे फेरीवाल्यांच्या हातगाड्यांची अशा प्रकारे तोडफोड करण्यात येणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. नो हॉकर्स झोनमध्ये नियमांचे उल्लंघन करणाऱ्या फेरीवाल्यांवर वाहन जप्त करणे आणि दंड आकारणे, अशी कारवाई करण्यात येईल. त्याचवेळी फेरीवाल्यांनीही मनपा प्रशासनाच्या नियमांचे पालन करून कारवाईस सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्तांनी केले.

# गणेश विसर्जन मिरवणुकीत डीजे-डॉल्बीवर बंदी

■ नियमांचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई
■ शांतता समितीच्या बैठकीत पोलीस अधीक्षकांचा इशारा

■ प्रतिनिधी | अकोट ■



गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुकीत डीजे, डॉल्बी साऊंड तसेच मॉडिफाइड साऊंड सिस्टीमच्या वापरावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या आदेशासह जिल्हाधिकारी, अकोला यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात येणार असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी दिला.

आगामी गणेश विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर अकोट येथे शांतता समितीची बैठक घेण्यात आली. यावेळी गणेश मंडळांचे पदाधिकारी, शांतता समितीचे सदस्य तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. विसर्जन मिरवणुकीदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी प्रशासनाच्या निर्देशांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन करण्यात आले. विसर्जन मिरवणुकीत डीजे अथवा डॉल्बी साऊंडचा वापर करू नये. ध्वनि प्रदूषणासंदर्भातील नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधित मंडळ व जबाबदार व्यक्तींवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले. गणेशोत्सव उत्साहात साजरा करताना सामाजिक सलोखा, शांतता आणि शिस्त कायम ठेवण्याची जबाबदारी सर्वांची असल्याचेही बैठकीत सांगण्यात आले.

बैठकीला पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा अकोट उपविभागीय पोलीस अधिकारी निखिल पाटील, उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर, तहसीलदार सुनील चव्हाण, मुख्याधिकारी शशिकांत बाबर, अकोट शहरचे ठाणेदार किशोर जुनघरे, अकोट ग्रामीणचे ठाणेदार श्रीधर गुट्टे यांच्यासह गणेश मंडळांचे पदाधिकारी व शांतता समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महिला शेतकऱ्यांना आता मिळणार अधिकृत ओळख !

**अकोला :** राज्यातील महिला शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ, कृषी कर्ज, विमा, कृषी निविष्ठा, विस्तार सेवा तसेच विविध कल्याणकारी कार्यक्रमांचा लाभ अधिक सुलभतेने मिळावा, यासाठी २२ जुलै रोजी महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ लागू करण्यात आला आहे. या अधिनियमांतर्गत महिला शेतकऱ्यांना मान्यता देणे, महिला शेतकरी प्रमाणपत्र देणे आणि महिला शेतकऱ्यांचा अधिकृत डेटाबेस तयार करणे आदी कार्य होणार असून याव्दारे महिला शेतकऱ्यांना अधिकृत ओळख मिळवून देण्यात आली आहे. या अधिनियमांतर्गत महिला शेतकऱ्यांना अधिकृत मान्यता व प्रमाणपत्र देण्यासाठी ऑनलाईन पोर्टल सुरु करण्यात आले आहे.

**जाहीर नोटीस**

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी योगेश ज्ञानेश्वरसा पवार वय अं. ३७ वर्ष, धंदा व्यापार, रा. ज्ञानेश्वर नगर, डाबकी रोड, अकोला, ता.जि. अकोला यांच्या सोबत दि. ०४.१०.२०२१ रोजी दस्त क. अ.क.ग. ४७३० / २०२१ अन्वये रजि. खरेदीखतान्वये विकत घेतलेला तुमच्या मालकीचे व ताब्यातील पुढील वर्णनाचे दुकान क. ११ आमचे पक्षकारांने मुंद्राक रु. ५००/- वर मुद्रांक क. डीएल-०१९०१९ वर दि. २५.०३.२०२५ रोजी नोटरी सिरियल नं. ६३३ / २०२५ नुसार नोटरीकृत केलेला स्थावर दुकानाची ईसार पावतीनुसार सौदा रु. २५,००,०००/- (पंचवीस लाख रुपये) व ईसार रक्कम रु.११,००,०००/- (अकरा लाख रुपये) विकत घेण्याचा सौदा कायम केला आहे. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे :

कसबे अकोला, प्र. ता. जि. अकोला येथील र. डी. र. स. डी. म. न. पा. अकोलाचे कक्षेतील मंगलदास मार्केट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विभागातील अकोला शहर नझुल शीट क. ३८-बी, नझुल प्लॉट क्र. ५२/३ ची जागेवर 'श्री वल्लभ कॉम्प्लेक्स' या नावाने बांधलेल्या इमारत मधील तुमच्या मालकीची व ताब्यातील तळमजला (ग्राउंड फ्लोअर) वरील दुकान क्र. ११ चे दुकान गाळा विक्री पध्दतीचे अटी व नियमानुसार स्लॅब पर्यंत मालकी हक्काने तुम्ही विकत घेतलेला. दुकान नं. ११ त्याचा तपशील फ्लोअर :- तळमजला (ग्रॉऊंड फ्लोअर) दुकान नं. ११, बाधंकाम क्षेत्रफळ :- १० x १५ = १५०.०० चौ. फुट (१३.९४ चौ.मी.), कार्पेट एरिया, दर्शनी भाग पश्चिमेस, बांधकामाचे स्वरुप : आर. सी. सी. बांधकाम वर्ष : १९८८-८९ परिसराचे नाव मंगलदास मार्केट इमारतीचे नांव : 'श्री वल्लभ कॉम्प्लेक्स' दुकान नं. ११ ची चर्तु:सिमा पुर्वेस : दुकान न १८, पश्चिमेस : दुकानाला लागून ३.५ फुटाचा ओटा व नंतर रस्ता, उत्तरेस दुकान नं. १२, दक्षिणेस येण्या-जाण्याचा जिना,

तरी कोणीही योगेश ज्ञानेश्वरसा पवार यांच्यासोबत वरील मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारचा सौदा करु नये तो आमचे पक्षकारास बंधनकारक राहणार नाही. वरील स्थावर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, बोजा, गहाण, ताबा व ईसार व इतर कोणत्याही प्रकारचा अधिकार असल्यास त्याने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन तीन दिवसाच्या आंत आमच्याकडे लेखी कागदपत्रासंह प्रत्यक्ष भेटून, कागदोपत्री पुराव्यासह हरकत नोंदवावी जर कोणाचीही कसल्याच प्रकारची हरकत वेळेत आली नाही तर, माझे पक्षकार वरील स्थावरचे मिळकतीबाबतचे रजि. खरेदीखत नोंदवून घेतील व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा उजर किंवा हरकत व कुठल्याही प्रकारचा वाद किंवा न्यायालयीन प्रकरण चालणार नाही, आमच्यावर बंधनकारक राहणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

अकोला
दि. २४.०९.२०२६

(पक्षकारांतर्फे अधिवक्ता)
(ॲड. वैष्णवी भा. गिरी)

**जाहीर नोटीस**

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १४९३/२०२६ — प्रोसेस नं.१११७८/२०२६
चौ.ता. २१/१०/२०२६ — दिनांक : ०१/०९/२०२६

**अर्जदार :** १. अश्विनी मंगेश भाकरे २. चिरस्वी मंगेश भाकरे ३. मंदा लक्ष्मण भाकरे ४. लक्ष्मण महादेवराव भाकरे सर्व रा. फ्लॅट नं. ५, अभिनव अपार्टमेंट, गोकुळ कॉलनी, जवाहर चौक, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : मंगेश लक्ष्मण भाकरे
**पत्ता :-** रा.व्दारा अश्विनी मंगेश भाकरे रा. फ्लॅट नं. ५, अभिनव अपार्टमेंट, गोकुळ कॉलनी, जवाहर चौक, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मंगेश लक्ष्मण भाकरे यांचे दि. २७/०५/२०२६ रोजी फ्लॅट नं. ५, अभिनव अपार्टमेंट, गोकुळ कॉलनी, जवाहर चौक, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २१/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २८४**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# अमानकर यांच्या पाठीशी संपूर्ण विदर्भाचा कास्तकार

■ प्रतिनिधी | अकोला ■

गेल्या आठ दिवसापासून राज्यातील भीषण अवर्षणग्रस्त परिस्थितीच्या संदर्भात शासनाने दुष्काळ घोषित करावा व सोयाबीन उत्पादक कास्तकारांना ५० हजार रुपये प्रति हेक्टर अनुदान द्यावे या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर उपोषणास बसलेले काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष अशोक अमानकर यांच्या पाठीशी संपूर्ण विदर्भातील कास्तकार असून शासनाने जर त्वरित दुष्काळ जाहीर केला नाही व मागण्या मान्य केल्या नाहीत तर तीव्र आंदोलन छेडण्यात येणार असल्याचा इशारा आ साजिद खान पठाण यांनी दिला. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात आमरण उपोषण करीत असणारे अशोक अमानकर यांच्या आयोजित पत्रकार परिषदेत आ साजिद खान यांनी हा निर्वाणीचा इशारा दिला.राज्यात भीषण अवर्षणग्रस्त परिस्थिती निर्माण झाली असताना व पिके नष्ट झाली असतानाही अद्यापही शासनाने दुष्काळ जाहीर केला नाही.

# मूर्तिजापुरात डीजेचा कर्कश आवाज न्यायालयीन आदेशाच्या कसोटीवर

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

कावड यात्रेदरम्यान डीजेच्या मोठ्या आवाजावरून चर्चेत आलेल्या मूर्तिजापूर शहरात आता गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर ध्वनीप्रदूषणाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. ध्वनीप्रदूषणाचे नियम व न्यायालयीन निर्देशांची काटेकोर अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी मूर्तिजापूर वकील संघाने शहर पोलिसांना निवेदन दिले आहे.

**गणेश विसर्जनापूर्वी वकील संघ आक्रमक**
**नियमबाह्य ध्वनीप्रदूषणावर कारवाईची मागणी**



मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठातील ध्वनीप्रदूषणासंदर्भातील विविध जनहित याचिका व रिट याचिकांचा दाखला देत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या डीजे, ध्वनिक्षेपक तसेच ध्वनीप्रदूषण करणाऱ्या वाहनांवर प्रतिबंधात्मक व कायदेशीर कारवाई करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

गणेश विसर्जनाच्या दिवशी नियमबाह्य आवाजाचा वापर झाल्यास केवळ सूचना देऊन प्रशासनाने थांबू नये, तर कायद्यानुसार कारवाई करावी, अशी भूमिका वकील संघाने घेतली आहे. तक्रारींकडे दुर्लक्ष झाल्यास पुढील कायदेशीर मार्गाचा अवलंब करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

गणेशोत्सव उत्साहात साजरा करताना ध्वनीप्रदूषणाच्या मर्यादांचे पालन होणे गरजेचे आहे. त्यामुळे यंदाच्या विसर्जन मिरवणुकीत पोलिस प्रशासन न्यायालयीन निर्देशांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कशी करते, याकडे मूर्तिजापूरकरांचे लक्ष लागले आहे.

# मुंडगाव येथे २५० रुग्णांची नेत्र तपासणी

## ८५ जण मोतीबिंदू शस्त्रक्रियेस पात्र

■ प्रतिनिधी | मुंडगाव ■

मुंडगाव येथील श्री गजानन महाराज पादुका संस्थानच्या वतीने दम्मानी नेत्र रुग्णालय, अकोला, रोटरी क्लब ऑफ अकोला आणि राजीव मालीवाल परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले. संस्थानचे अध्यक्ष गणेश ढोले यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या शिबिराला पंचक्रोशीतील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिबिरात सुमारे २५० रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर ८५ रुग्ण मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेस पात्र ठरले असून, या रुग्णांवर दम्मानी नेत्र रुग्णालय, अकोला येथे शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. तसेच ३९ रुग्णांना अल्पदरात चष्म्यांचे वाटप करण्यात आले. शिबिराचा प्रारंभ दीपप्रज्वलन व श्रींच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आला. यावेळी संस्थानच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्ष गणेश ढोले यांचा वाढदिवसानिमित्त विशेष सत्कार करून उपस्थितांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. दरम्यान, संस्थानच्या मरणोत्तर देहदान व नेत्रदान अभियानांतर्गत अकोट येथील सौ. राजकन्या रवींद्र शेगोकार यांनी मरणोत्तर नेत्रदान केले. त्यांच्या सामाजिक योगदानाबद्दल त्यांचे कुटुंबीय सचिन रवींद्र शेगोकार यांचा संस्थानच्या वतीने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दम्मानी नेत्र रुग्णालयाचे संचालक सभापतीजी शुक्ल होते, तर उद्घाटक म्हणून शासकीय कंत्राटदार अमोलदादा गडम उपस्थित होते.



संवेदना ग्रुपचे संस्थापक शामराव आपोतीकर, दिनेश देशमुख बोर्डी, डॉ. सौरभ इंगोले, अजयजी देशमुख, राजू मुदलियार, मोनाली जोगदंड, सत्य साई सेवा संघटनेचे सुशील सरोदे आदी उपस्थित होते. ग्रामीण भागातील गरजू नागरिकांना मोफत नेत्र उपचार मिळावेत, या उद्देशाने संस्थानकडून दरवर्षी हा उपक्रम राबविला जातो. दरवर्षी सुमारे ५०० ते ६०० गरजू रुग्णांवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन संस्थानचे व्यवस्थापक विजय ढोरे यांनी केले. यावेळी उपाध्यक्ष महेश गाढे, कोषाध्यक्ष शरद सोनटक्के, सहसचिव विलास बहादुरे यांच्यासह संस्थानचे पदाधिकारी, कर्मचारी व सेवाधारी उपस्थित होते.

# कुबा शाळेतील विद्यार्थ्यांना घनकचरा व्यवस्थापनाचे धडे



■ प्रतिनिधी | अकोला ■

'स्वच्छता में सहभाग, स्वच्छ भारत, विकसित भारत' या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या 'स्वच्छता ही सेवा-२०२६' अभियानांतर्गत मनपा उत्तर झोनमधील आकोट फैल, हाजी नगर येथील कुबा शाळेत विद्यार्थ्यांना घनकचरा व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांच्या निर्देशानुसार १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान हे अभियान राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत १७ सप्टेंबर रोजी आयोजित जनजागृती कार्यक्रमात नगरसेवक शरद तुरकर, सै. रहीम सै. हाशम, सामाजिक कार्यकर्ते शेख अनीस आणि मोहम्मद मुजम्मील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

घर व आस्थापनांमधून निर्माण होणारा ओला आणि सुका कचरा स्वतंत्रपणे संकलित करावा, कचरा रस्त्यावर किंवा परिसरात न टाकता केवळ महापालिकेच्या कचरा घंटागाडीतच द्यावा, तसेच शासनाने बंदी घातलेल्या प्लास्टिकचा वापर पूर्णपणे टाळावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# अकोला दुष्काळाच्या उंबरठ्यावर ; शेतक-यांना सरसकट मदत द्या

## आमदार साजिद खान पठाण यांची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मागणी


■ प्रतिनिधी | अकोला ■

पावसाने पाठ फिरवल्याने अकोला जिल्ह्यातील खरीप हंगाम संकटात सापडला आहे. गेल्या दोन महिन्यांपासून पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने अनेक भागांतील पिकांची वाढ खुंटली असून काही ठिकाणी पिके वाळण्याच्या अवस्थेत आहेत. या पार्श्वभूमीवर अकोला जिल्हा दुष्काळग्रस्त अथवा दुष्काळसदृश जाहीर करून बाधित शेतकऱ्यांना सरसकट दुष्काळी मदत व पीक नुकसानभरपाई द्यावी, अशी जोरदार मागणी आमदार साजिद खान पठाण यांनी केली आहे. यासंदर्भात पठाण यांनी मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. अकोला जिल्ह्यातील शेतकऱ्यांची बिकट परिस्थिती निवेदनातून उपमुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली.

**तातडीने पंचनामे, सर्वेक्षणाचे निर्देश देण्याची मागणी**

**पावसाच्या खंडाने खरीप धोक्यात**

खरीप हंगामातील पिकांना सध्या पावसाची नितांत गरज असताना पावसाने मोठी ओढ दिली आहे. सततच्या पावसाच्या खंडामुळे पिकांची वाढ खुंटली असून उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आधीच शेतीच्या वाढत्या खर्चाने त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांसमोर आता उत्पादन घटण्याचे नवे संकट उभे ठाकले आहे.पावसाअभावी पिकांची झालेली अवस्था प्रत्यक्ष शेतशिवारात जाऊन तपासणे आवश्यक असल्याचे पठाण यांनी निवेदनातून स्पष्ट केले आहे.



**कागदोपत्री नव्हे, प्रत्यक्ष पंचनामे करा!**

जिल्ह्यातील सद्यस्थितीची तातडीने पाहणी करून वस्तुनिष्ठ पंचनामे आणि आवश्यक सर्वेक्षण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. पावसाच्या खंडामुळे नेमके किती क्षेत्र बाधित झाले, कोणत्या पिकांचे किती नुकसान झाले, याची प्रत्यक्ष पाहणी करून नोंद घेण्याची मागणी आहे. दुष्काळ अथवा दुष्काळसदृश परिस्थितीचे निकष लागू होत असल्यास अकोला जिल्हा तातडीने दुष्काळग्रस्त जाहीर करावा. त्यानंतर शासनाच्या नियमानुसार बाधित शेतकऱ्यांना दुष्काळी मदत, पीक नुकसानभरपाई तसेच आवश्यक सवलती उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी पठाण यांनी केली.

**शेतकऱ्यांच्या नजरा शासनाच्या निर्णयाकडे**

पावसाच्या लांबलेल्या खंडामुळे खरीप हंगामाचे भवितव्य अधांतरी आले आहे. पिकांचे उत्पादन घटल्यास शेतीचा खर्च, कर्जाची परतफेड आणि कुटुंबाचा आर्थिक भार कसा पेलायचा, हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर आहे. त्यामुळे शासनाने विलंब न करता परिस्थितीची गंभीर दखल घेऊन शेतकऱ्यांना दिलासा देणारा निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. अकोला जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून तातडीने आवश्यक कार्यवाही करावी आणि बाधित शेतकऱ्यांना मदत मिळवून द्यावी, अशी मागणी आमदार साजिद खान मन्नानखान पठाण यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

## संक्षिप्त

### सोन्याची अंगठी हिसकावली

**वर्धा-** दुचाकीने जात असलेल्या दोन युवकांना अडवून अंधाराचा फायदा घेत चौघांनी मारहाण केली. त्यानंतर एका युवकाच्या बोटातील ४५ हजार रुपये किमतीची सोन्याची अंगठी हिसकावून आरोपी पसार झाले. ही घटना जी.एस. कॉमर्स कॉलेज परिसरात घडली. सावंगी मेघे येथे नर्सिंगचे शिक्षण घेणारा गौरव मुडे हा मित्र चौतन हरि याच्यासह दुचाकीने सेवाग्राम रोडकडे जात होता. त्यावेळी मागून दुचाकीने आलेल्या दोघांनी त्यांना अडविले. एका दुचाकीवर आधीच दोघे बसले होते. गौरवने मित्राला पोलिसांना कळविण्यास सांगितले असता त्याला मारहाण करण्यात आली. वाद सोडविण्यास गेलेल्या गौरवलाही चौघांनी मारहाण केली. त्याच्या बोटातील सोन्याची अंगठी हिसकावून आरोपी पळून गेले. दरम्यान ऑटोचालक घटनास्थळी थांबल्याने आरोपी पसार झाले. चौतनने एका दुचाकीचा फोटो काढला असून त्यावर एमएच ३२ ५८९३ क्रमांक दिसत आहे. वर्धा शहर पोलीस तपास करीत आहेत.

### मजुरीच्या वादातून युवकाला मारहाण

**वर्धा-** शेतात काम करणाऱ्या मजुरांना दुसऱ्या शेतात कामावर का नेतो, या कारणावरून झालेल्या वादात पती पत्नीने युवकाला काठीने मारहाण करून जखमी केले. ही घटना समुद्रपूर तालुक्यातील जेजुरी येथे घडली. अभिजीत चाफले असे जखमी युवकाचे नाव आहे. अभिजीत शेतीची कामे करतो. गावातील रवींद्र जांभुळकर व त्याची पत्नी यांच्या शेतात काम करणारे मजूर अभिजीतच्या शेतात कामावर येत असल्यावरून दोघांमध्ये यापूर्वीही वाद होत असल्याचे तक्रारीत नमूद आहे. याच कारणावरून अभिजीत घरी असताना रवींद्र व त्याच्या पत्नीने त्याच्याशी वाद घातला. त्यानंतर दोघांनी काठीने मारहाण केल्याने अभिजीत जखमी झाला. या प्रकरणी प्रज्वल चाफले यांनी सिंदी रेल्वे पोलिसांत तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी रवींद्र जांभुळकर व त्याच्या पत्नीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### कुलूप तोडून लाखोंचा ऐवज लंपास

**वर्धा-** बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी रोख रक्कम आणि सोन्या चांदीचे दागिने असा १ लाख ४६ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. ही घटना नालवाडीतील धुनिवाले चौक परिसरात घडली. वसंत गावंडे वय ७३ हे कुटुंबीयांसह बाहेरगावी गेले होते. ते परत घरी आल्यानंतर चॅनल गेट आणि मुख्य दरवाजाचे कुलूप तुटलेले आढळले. घरात प्रवेश केल्यानंतर साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसून आले. लोखंडी कपाटाची पाहणी केली असता त्यातील ९० हजार रुपये तसेच सोन्या चांदीचे दागिने गायब असल्याचे निदर्शनास आले. चोरी झालेल्या ऐवजाची एकूण किंमत १ लाख ४६ हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. गावंडे यांनी रामनगर पोलिसांत तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा तपास पोलिस उपनिरीक्षक जांभुळकर करीत आहेत.

### युवकाला विळ्याने मारहाण

**वर्धा-** शेतीच्या धुऱ्यावरून सुरू असलेल्या वादाचे पर्यवसान मारहाणीत झाले. दोन जणांनी मिळून युवकाला विळ्याने मारहाण केल्याने तो जखमी झाला. ही घटना पुजई गावात घडली. प्रशांत राऊत वय ४४ असे जखमी युवकाचे नाव आहे. पुजई येथील प्रशांत राऊत यांचे नातेवाईक प्रमोद राऊत आणि अनिकेत राऊत यांच्यात शेतीच्या धुऱ्यावरून वाद सुरू आहे. या मारहाणीत प्रशांत जखमी झाले. घटनेनंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली. तक्रारीवरून सेवाग्राम पोलिसांनी प्रमोद राऊत आणि अनिकेत राऊत यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. शेतीच्या धुऱ्याच्या वादातून झालेल्या या मारहाणीचा पुढील तपास सेवाग्राम पोलिस करीत आहेत.

### दुचाकीच्या धडकेत सायकलस्वार जखमी

**सेलू-** सायकलने जात असलेल्या वृद्धाला दुचाकीस्वाराने धडक दिल्याने ते जखमी झाले. ही घटना मेडिकल चौक ते बाजार रोड परिसरात घडली. सुरेश जंगले वय ६७ असे जखमी वृद्धाचे नाव आहे. जोशी नगर येथील सुरेश जंगले हे सायकलने जात होते. त्याचवेळी रेहकी येथील आकाश सोनटक्के दुचाकीने जात होता.

# अर्धे सत्र संपले, गणवेशाचा पत्ता नाही

## 'गुरुजी, गणवेश कधी मिळणार, चिमुरड्यांचा प्रश्न

**सेलू/ जनमाध्यम**
शाळा सुरू होऊन अर्धे सत्र संपत आले तरी जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या अंगावर शासनाचा दोन जोड गणवेश अद्याप चढलेला नाही. गुरुजी सांगा ना आम्हाला गणवेश कधी मिळणार असा प्रश्न चिमुरड्यांकडून विचारला जात असून पालकांमध्येही संतापाची भावना निर्माण झाली आहे. दोन जोड गणवेश तसेच बूट आणि पायमोज्यांसाठीची रक्कम अद्याप पूर्णपणे उपलब्ध झालेली नसल्याने विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

शासनाच्या नियमानुसार गणवेश आणि शैक्षणिक साहित्याची रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यात किंवा शाळा व्यवस्थापन समितीने निवडलेल्या दुकानदाराच्या खात्यात जमा होणे अपेक्षित आहे. मात्र प्रत्यक्षात अनेक ठिकाणी केवळ एका गणवेशाची किंवा अपुरी रक्कम उपलब्ध झाल्याची स्थिती असल्याचे पालकांचे म्हणणे आहे.

**एकाच गणवेशावर शाळा कशी चालणार**

शाळेत खेळताना आणि विविध उपक्रमांत सहभागी होताना विद्यार्थ्यांचे कपडे मळणे स्वाभाविक आहे. मात्र दुसरा



गणवेश वेळेवर उपलब्ध नसल्याने अनेक विद्यार्थ्यांना तोच गणवेश पुन्हा वापरावा लागत आहे. त्यामुळे स्वच्छता आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये ग्रामीण भागातील शेतकरी शेतमजूर आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थी मोठ्या संख्येने शिक्षण घेतात. रोजच्या उदरनिर्वाहाचा संघर्ष करणाऱ्या पालकांना मुलांसाठी वारंवार नवीन कपडे घेणे शक्य होत नाही. शासनाची योजना अशा विद्यार्थ्यांसाठी आधार ठरण्याऐवजी विलंबामुळे अडचणींचे कारण ठरत असल्याची भावना पालकांत आहे.

योजना जाहीर करणे आणि निधीची तरतूद करणे पुरेसे नाही. विद्यार्थ्यांपर्यंत त्याचा लाभ वेळेत पोहोचणे आवश्यक आहे. अर्धे सत्र संपत आले तरी गणवेशाचा प्रश्न कायम राहणे म्हणजे शिक्षण विभागाच्या अंमलबजावणीवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारी बाब असल्याची चर्चा आहे.शासन आणि शिक्षण विभागाने तातडीने लक्ष घालून उर्वरित गणवेश तसेच बूट आणि पायमोज्यांची रक्कम उपलब्ध करून द्यावी. विद्यार्थ्यांना त्यांच्या हक्काच्या सुविधांसाठी आणखी प्रतीक्षा करायला लावू नये. अन्यथा पालकांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

# ओबीसींच्या लोकसंख्येचा आकडा दडवू नका; स्वतंत्र रकाना द्या

## जातनिहाय जनगणनेत प्रमाणित नोंदणीची कॉंग्रेसची मागणी,अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा

**वर्धा/जनमाध्यम**
आगामी जनगणनेत इतर मागासवर्गीय समाजाची स्वतंत्र आणि अचूक नोंद व्हावी, यासाठी कॉंग्रेसच्या ओबीसी विभागाने आक्रमक भूमिका घेतली आहे. ओबीसी समाजासाठी जनगणनेत स्वतंत्र रकाना ठेवावा आणि जातनिहाय सामाजिक शैक्षणिक व आर्थिक स्थितीची अधिकृत माहिती संकलित करावी, अशी मागणी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली.




महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. यशपाल भिंगे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाराष्ट्र सचिव मोरेश्वर भादे यांच्या आदेशानुसार बाळकृष्ण माउस्कर यांच्या नेतृत्वात हे निवेदन देण्यात आले. निवासी जिल्हाधिकारी यांना निवेदन देताना जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष सुनील कोल्हे, राजेश राजूरकर, महेश तेलरांधे, धर्मपाल ताकसांडे, नंदू कांबळे, रवी भुजाडे, विलास जवादे, ऋतुजा भोयर, सागर सबाने यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

एकाच जातीची प्रादेशिक नावे, उपनावे, उच्चार आणि शब्दलेखनातील फरकामुळे स्वतंत्र नोंदी झाल्यास संबंधित समाजाची वास्तविक लोकसंख्या विभागली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रमाणित जात कोडिंग आणि वैज्ञानिक जात वर्गीकरणाची पद्धत स्वीकारावी, अशी मागणी करण्यात आली अचूक लोकसंख्येचा अधिकृत आधार नसल्याने आरक्षण, शिक्षण, रोजगार आणि सामाजिक न्यायाच्या योजनांच्या नियोजनावर परिणाम होऊ शकतो, असा दावा निवेदनातून करण्यात आला. मागणी मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ओबीसी विभागाने दिला.

## पाऊस गायब, शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू

# दुष्काळ जाहीर करून बळीराजाला तातडीने मदत द्या

## अमर काळेंचे मुख्यमंत्र्यांकडे १३ मागण्यांचे निवेदन

**वर्धा/जनमाध्यम**
अपुऱ्या पावसाने खरीप पिके करपली असून उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर वर्धा लोकसभा मतदारसंघातील सर्व तालुके दुष्काळग्रस्त घोषित करून शेतकऱ्यांना सरसकट ५० हजार रुपये प्रति एकर नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी खासदार अमर काळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

२२ सप्टेंबर रोजी दिलेल्या पत्रातून काळे यांनी शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण भागातील नागरिकांसाठी १३ मागण्या मांडल्या. पिकांचे उत्पादन घटले असताना खर्चाचा बोजा वाढला आहे. त्यामुळे कर्जबाजारी शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे, असे त्यांनी नमूद केले.दुष्काळ निवारणासाठी शक्तिपीठ महामार्ग आणि नदीजोड प्रकल्पाचा निधी वळवावा. अनावश्यक विकासकामांना स्थगिती देऊन उपलब्ध निधी मदतीसाठी वापरावा. शेतमजुरांना दरमहा दोन हजार रुपये आर्थिक मदत आणि स्वस्त धान्य दुकानातून शेतकरी व शेतमजुरांना सरसकट धान्य द्यावे, अशी मागणी आहे. शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना बारावीपर्यंत मोफत शिक्षण व परीक्षा शुल्कमाफी द्यावी. महाविद्यालयीन शिक्षणाच्या खर्चातील ५० टक्के भार शासनाने उचलावा. पुढील हंगामासाठी बियाणे, खते व कीटकनाशके ५० टक्के अनुदानावर द्यावीत. दुष्काळी काळात शेतकऱ्यांवर शासकीय करांचा भार टाकू नये, अशीही मागणी काळे यांनी केली आहे. दरम्यान, राज्य सरकारने दुष्काळसदृश परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन केली असून



प्राथमिक अधिसूचना लवकरच जारी करण्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले आहे.




# पाण्यातील लाटांवर ३०० तरणबाजांची विजयी झेप

## वर्धा स्विम गाला २०२६ मध्ये विदर्भातील खेळाडूंचा उत्स्फूर्त सहभाग

**वर्धा/जनमाध्यम**
धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज स्विमिंग पूल येथे द ब्लूज स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वर्धा स्विम गाला २०२६ च्या तिसऱ्या पर्वाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विदर्भातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या सुमारे ३०० तरणबाजांनी जलतरण तलावात आपल्या कौशल्याची चमक दाखवत उपस्थितांची दाद मिळवली. स्पर्धेचे उद्घाटन राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते झाले. यावेळी निमिष मुळे यांनी त्यांचे स्वागत केले. डॉ. भोयर यांनी खेळाडूंशी संवाद साधत त्यांचा उत्साह वाढविला. वर्ध्यात लहान मुलांसह महिलांसाठी नवीन स्विमिंग पूल उभारण्यात येत असून तो लवकरच उपयोगात येईल अशी माहिती त्यांनी दिली.विविध वयोगटातील स्पर्धांमध्ये वैभवी घाघरे, पार्थ इंगोले, श्रावणी इंगोले, सारंग राऊत, सम्यक राऊत, समव कटोले, मंदर सिंह कुसीम, चाक्षवी प्रमोद खडकाले, भावी अभय राजगीजे आणि रावी सुरेश बोलकर यांनी चॅम्पियनशिप पटकावली. विजेत्यांना रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. विशेष म्हणजे अवघ्या चार वर्षांच्या राम इंगोलेने सहा वर्षांच्या गटातील ५० मीटर फ्रीस्टाइल पूर्ण करत कौशल्याला वयाची मर्यादा नसते हे दाखवून दिले. तसेच वैष्णवी, टूनाय, शौर्य आणि आद्या या चार ऑटिझम खेळाडूंनी सहभाग नोंदवत स्पर्धेला सामाजिक समावेशकतेचा सुंदर संदेश दिला.

# आष्टीकरांच्या रस्त्यालाही आता सत्तेची अट

## मुख्य रस्त्याच्या दुरवस्थेवरून आमदारांच्या भूमिकेवर संताप

**आष्टी शहीद/ जनमाध्यम**
आष्टी शहरातील मुख्य रस्त्यांची दुरवस्था दिवसेंदिवस गंभीर होत असताना रस्त्याचा प्रश्न आता थेट राजकीय संघर्षाच्या केंद्रस्थानी आला आहे. रस्त्याच्या कामाची मागणी घेऊन गेलेल्या काही भाजप कार्यकर्त्यांना आधी नगरपंचायतीवर सत्ता आणा मग रस्ता पाहू असे आमदारांकडून सांगितल्याची चर्चा आहे. हे कथित वक्तव्य खरे असेल तर आष्टीकरांच्या मूलभूत प्रश्नांपेक्षा पक्षीय सत्ता अधिक महत्त्वाची मानली जात आहे का असा थेट प्रश्न नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

**आष्टीकरांनी आमदारांना मतदान केले नाही का**

सत्ता आहे याचा विचार न करता मतदारसंघातील प्रत्येक नागरिकाला मूलभूत सुविधा मिळणे ही लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे. मात्र सत्ता आपल्या हातात नसेल तर रस्ता नाही विकास नाही आणि निधीही नाही असा काही अलिखित नियमच आमदारांच्या भूमिकेतून निर्माण झाला आहे का असा प्रश्न आता विचारला जात आहे.

**विकासासाठी सत्ता की सत्तेसाठी विकास**

रस्ते नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी जोडलेले आहेत. खड्ड्यांतून नागरिकांना मार्ग काढावा लागत असताना विकासकामांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थेवर आपल्याच पक्षाची सत्ता असावी अशी अट घातली जात असेल तर लोकशाहीचा अर्थ नेमका काय असा प्रश्न निर्माण होतो. शासनाचा निधी हा जनतेचा पैसा आहे. तो पक्षीय कार्यकर्त्यांना खूश करण्यासाठी नव्हे तर गरज असलेल्या भागाच्या विकासासाठी वापरला जाणे अपेक्षित आहे.

**नंदीचे दर्शन आधी मग महादेव**

आमदारांना भेटण्यासाठी काही कार्यकर्त्यांना गावोगावच्या नेते कार्यकर्त्यांच्या माध्यमातून आधी आमदारांच्या निकटवर्तीयांचे दर्शन घ्यावे लागते अशीही चर्चा स्थानिक पातळीवर रंगली आहे. महादेवाचे दर्शन घेण्यापूर्वी नंदीचे दर्शन आवश्यक



असल्याची उपमा देत या पद्धतीवरून कार्यकर्त्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. लोक प्रतिनिधींपर्यंत पोहोचण्यासाठी सामान्य कार्यकर्त्यांना मध्यस्थांची गरज पडत असेल तर ही व्यवस्था जनतेच्या सेवेसाठी आहे की सत्तेच्या वर्तुळासाठी असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**निधीवाटपावरही प्रश्नचिन्ह**

आर्वी विधानसभा मतदारसंघात विकासाच्या नावाखाली प्रत्यक्ष गरज असलेल्या ठिकाणी निधी देण्याऐवजी राजकीय कार्यकर्त्यांना खूश करण्यासाठी निधी वाटप होत असल्याचे आरोप विरोधकांकडून केले जात आहेत. कोणत्या कामाला प्राधान्य दिले जाते आणि कोणत्या कामासाठी निधी मंजूर होतो याबाबतही नागरिकांमध्ये चर्चा आहे.

**संरक्षण भिंतीच्या कामाची चौकशी करा**

थार ग्रामपंचायत हद्दीत संरक्षण भिंतीच्या कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी मंजूर झाल्याच्या मुद्द्यावरूनही प्रश्न उपस्थित झाले आहेत. ज्या ठिकाणी संरक्षण भिंतीची गरज नव्हती असा दावा होत असताना तेथे मोठ्या निधीची आवश्यकता काय होती याची चर्चा सुरू आहे. या कामासाठी निधी मंजूर करताना प्रत्यक्ष गरज तांत्रिक अहवाल आणि प्रशासकीय निकष तपासले गेले का याची चौकशी करण्याची मागणी पुढे येत आहे.

**भाजपमध्येही नाराजीची कुजबुज**

या आरोपांची चर्चा केवळ विरोधकांमध्येच नाही तर भाजपच्या स्थानिक कार्यकर्त्यांमध्येही नाराजीची कुजबुज असल्याचे बोलले जात आहे. रस्त्यासारख्या मूलभूत प्रश्नासाठी कार्यकर्त्यांनाच सत्तेचे गणित समजावून सांगितले जात असेल तर सामान्य नागरिकांनी कोणाकडे दाद मागायची असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**माझ्याजवळ मुख्यमंत्री आहेत**

आमदारांच्या जवळ मुख्यमंत्री असल्याचा राजकीय प्रभाव दाखविण्याची चर्चा होत असली तरी मतदारसंघातील नागरिकांना प्रभावाचे प्रदर्शन नको आहे. त्यांना चांगले रस्ते पाणी आरोग्य शिक्षण आणि मूलभूत सुविधा हव्या आहेत. मुख्यमंत्री जवळ आहेत की सत्ता हातात आहे यापेक्षा जनतेचा प्रश्न किती वेगाने सुटतो हे महत्त्वाचे आहे.

**सत्तेची मस्ती की विकासाची जबाबदारी**

आष्टीचा मुख्य रस्ता आज नागरिकांच्या संयमाची परीक्षा घेत आहे. सत्ता मिळाल्याशिवाय विकासकामे होणार नसतील तर लोकप्रतिनिधित्वाचा अर्थच बदलून जाईल. आमदारांच्या कथित भूमिकेने जर नागरिकांमध्ये सत्ता नसेल तर रस्ता नाही अशी भावना निर्माण झाली असेल तर ही बाब गांभीर्याने घेण्याची वेळ आली आहे. पुढील विधानसभा निवडणूक अजून दूर असली तरी जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्याचा ठपका राजकीयदृष्ट्या कोणत्याही लोकप्रतिनिधीसाठी धोक्याची घंटा ठरू शकतो. आष्टीकरांना पक्षीय राजकारण नको आहे. त्यांना रस्ता हवा आहे. आता प्रश्न एवढाच आहे. नगरपंचायतीवर कोणाची सत्ता येते याची वाट पाहून आष्टीचा रस्ता दुरुस्त होणार की सत्ता कोणाचीही असो जनतेच्या हक्काचा विकास निधी तत्काळ उपलब्ध होणार. आष्टीकर या प्रश्नाच्या उत्तराकडे डोळे लावून बसले आहेत.

### गोदावरी नाईक यांचे निधन

**वर्धा:** गजानन चौक, रामनगर येथील रहिवासी श्रीमती गोदावरी गजानन नाईक यांचे वयाच्या ८२ व्या वर्षी बुधवारी पहाटे निधन झाले. श्रीमती गोदावरी नाईक या पाराशर ब्राह्मण समाजाचे माजी अध्यक्ष स्व. गजानन नाईक यांच्या पत्नी होत. त्यांच्या पश्चात मोठा परिवार असून त्यांच्या पार्थिवावर वर्धा येथील हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २९८
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
मुख्य कार्यालय- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# वडनगर ते वाराणसी सेवा यात्रा

## -भाजपा युवा मोर्चाचे आयोजन



**अमरावती/प्रतिनिधीः-** भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या २५ वर्षांच्या अखंड जनसेवेतून प्रेरणा घेऊन 'वडनगर ते वाराणसी सेवा यात्रा' या देशव्यापी अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. ही यात्रा युवा शक्तीला सेवाभाव आणि राष्ट्रनिर्माणाशी जोडणारा ऐतिहासिक उपक्रम ठरणार असल्याची माहिती आज मंगळवार २२ सप्टेंबर रोजी पत्रकार परिषदेमध्ये भाजपा शहराध्यक्ष नितीन धांडे यांनी दिली आहे.

त्यांनी सांगितले की, भाजयुमोचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार हेमांग जोशी यांच्या संकल्पनेतून आणि महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली या यात्रेचे नियोजन करण्यात आले आहे. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रीय अध्यक्ष खा. हेमांग जोशी यांचा अमरावती जिल्ह्यात तीन दिवसीय दौरा आयोजित करण्यात आला असून ते विविध सेवा उपक्रमात सहभागी होणार आहेत. १७ सप्टेंबर ते ७ ऑक्टोबर दरम्यान वडनगर ते वाराणसी आणि वाराणसी ते वडनगर अशा दोन्ही दिशांनी यात्रा निघणार आहे.देशभरातील सुमारे २० प्रमुख मार्ग, १९३ जिल्हे, ७७३ तहसील आणि १,१५९ गावांमध्ये ही यात्रा जाणार असून हजारो युवा कार्यकर्ते सहभागी होणार आहेत.या अभियानात केवळ यात्रा नसून ठिकठिकाणी सामाजिक कार्य केले जाणार आहे. वडनगर कडून वाराणसी कडे जाणारे यात्री गुजरातच्या पवित्र नद्यांचे जल काशी विश्वनाथ धाम येथे अर्पण करतील. वाराणसी कडून वडनगरकडे येणारे यात्री उत्तर प्रदेशातील पवित्र नद्यांचे जल हाटकेश्वर महादेव मंदिर, वडनगर येथे अर्पण करतील. धारणी येथून या यात्रेचा महाराष्ट्रात प्रवेश होणार आहे.

सेमाडोह जनजाती समुदाय संवाद व लाभार्थी संवाद, युवा संवाद व वृक्षारोपण, मोझरी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाधीचे दर्शन व सामाजिक बांधिलकीचा संदेश, तिवसा, वर्धा जिल्ह्यातील कारंजा मार्गे नागपूर, भंडारा, गोंदिया जिल्ह्यातून यात्रा मध्य प्रदेशकडे रवाना होणार आहे.सेवा हीच शक्ती आणि सेवा हाच राष्ट्रनिर्माणाचा मार्ग' हा संदेश घेऊन यात्रा निघणार आहे. यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेमध्ये आमदार प्रवीण तायडे, दिनेश सूर्यवंशी, जयंत डेहनकर, ललितसंदुरकर, विकी शर्मा, तुषार खेरडे, सचिन इंगळे आदी उपस्थित होते.

# नापिकीला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी तालुक्यातील काटपुर धामणगाव येथे एका कर्जबाजारी शेतकऱ्याने नापिकीला कंटाळून आत्महत्या केल्याची घटना नुकतीच घडली. मोर्शीचे तहसीलदार सागर ढवळे यांनी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना सांत्वनापर भेट देऊन दिलासा दिला. तालुक्यातील शिरखेड पोलीस स्टेशनच्या हद्दीतील धामणगाव काटपुर येथील अजय पंडित बरघट (वय ३२) या शेतकऱ्यांने बँकेचे व खाजगी कर्ज घेऊन शेतात पेरणी केली होती मात्र यावेळी पाऊस कमी प्रमाणात कोसळल्यामुळे कपाशी सोयाबीन हे हातात येणारे नगदी पीक पूर्णतः खराब झाले. त्यामुळे आपण कर्ज कसे फेडायचे या विचारात अजय वरघट हा नेहमी राहत असे. त्यातच त्याने आत्महत्या केली.या घटनेची माहिती मिळताच तहसीलदार सागर ढवळे यांनी धामणगाव येथे जाऊन वरघट कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली व कुटुंबीयांशी संवाद साधून अजय वरघट यांच्या पत्नी,आई-वडील यांच्या आर्थिक परिस्थितीची माहिती घेतली.

शेतकरी अजय वरघट यांच्याकडे वडिलोपार्जित ३ एकर शेती असून गेल्या २-३ वर्षांपासून अतिवृष्टी व नापिकीमुळे शेतीत मोठे नुकसान झाले होते. त्यामुळे आलेल्या कर्जबाजारीपणामुळे त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. यावेळी तहसीलदार सागर ढवळे म्हणाले की'ही घटना अतिशय दुर्दैवी आहे.या कुटुंबाला शासनाच्या सर्व योजनांचा लाभ मिळवून दिला जाईल. आत्महत्याग्रस्त व्यक्तीस ३ महिन्याचा मुलगा व २ वर्षाची मुलगी असा परिवार आहे.


## फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.
**संपर्क : ९४२२८५७१६९ ९४२२१२०४०६**


---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. **144/19/2026**
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री संत गजानन महाराज महापारायण समिती हरदेव मोर्शी रोड, राधा नगर, ता.जि.अमरावती**
बाबत अर्जदार - **श्री सागर प्रकाश यादव**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३ अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत :- निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) :- निरंक**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल तर पुरावरा देणे असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०१.०९.२०२६ रोजी दिली.

**सही/-**
**अधीक्षक, न्याय शाखा**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती**

---

**E-TENDER NOTICE** — MAHAVITARAN (Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.)

Separate digitally sealed and signed in two bid system e-Tenders are invited from Registered and experienced Licensed Electrical contractors, for Work contract for providing skilled operators for operating DSS CONTROL ROOM, under O&M Circle Amravati towards E-tender No. SE/AMT/T/DSS/2026-27/T-09. On line sale of Tender Documents on MSEDCL's website www.mahadiscom.in or https://etender.mahadiscom.in from Dt. 17.09.2026 to Dt. 25.09.2026 upto 23.55 hrs. Last date for EMD payment is **Dt. 25.09.2026 up to 18.00 hrs.**

Contact person Executive Engineer (Adm) Tel.No.0721-2663640

**PRO No .189** **Superintending Engineer, M.S.E.D.C.Ltd. O&M Circle Office, Amravati**

---

**E-Tender Notice** — MAHAVITARAN

The e-tender dully filled in and digitally signed are invited from eligible/Registered and authorized reputed firm/contractor for the following works as per specification given below for MSEDCL, Rural Dn. Amravati. For Monthly Meter Reading of LT consumers up to 20kW (Excluding AG consumers), Bill printing & Bill Distribution work to be done using Mahavitaran Mobile App IR/RF HHUs ,Bill Printing and Bill distribution up to consumer premises, Tender T-08 for Badnera sub division( 33 lakh) , T-09 for Amravati Rural sub division (61.20 Lakhs) , T-10 for Bhatkuli sub division (45.5 lakhs) .,T-11 for Tiwasa sub division (48.40 Lakhs)

The tender documents are available at our website https://etender.mahadiscom.in/eatApp/ and is downloaded from our website from Dt. 24.09.2026. No hard copy of tender will be provided. Any change in e-tender schedule, corrigendum etc shall also be put up on website. Prospective bidders are therefore requested to regularly check the website for updates. Submit the Tender through e-tendering process only latest by dt. 30.09.2026 up to 17.00 hrs. While submitting the Tender, please attach the Tender fee stated above and EMD in the form of Cash / demand draft in favour of Executive Engineer, MSEDCL, Rural Division, Amravati. Technical will opened on Dt 01.10.2026 Contact Person: - Dy. Executive Engineer (O), Amravati. Tel. No. 7875763743.

**(PRO-192)**

**Executive Engineer, O&M Division MSEDCL, Amravati Rural**

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. **134/19/2026**
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री संत अंबादास महाराज सेवा ट्रस्ट वडुरा पो.शिराळा ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**
बाबत अर्जदार - **श्री प्रकाश नामदेवराव काकडे**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३ अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत :- निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) :- निरंक**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल तर पुरावरा देणे असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक २४.०८.२०२६ रोजी दिली.

**सही/-**
**अधीक्षक, न्याय शाखा**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती**

---

## जाहिरनामा

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**
**वि. श्री. आर. आर. सामतकर, ५वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज-१८३८/२०२६ गो सलीम ६ वि निरंक नेे.ता. ०१.१०.२०२६**

अर्जदार-**1-Mohammad Salim** S/o Shaikh Taj Age 55 years, Occu: Business R/o Near Majid A Ibrahim, Usman Nagar, Lalkhadi Road, Amravati Tq. Distt. Amravati
**2-Shaikh Kalim S/o Shaikh** Taj Age 44 years, Occu: Business R/o Kabarstan Gate, Haidar Pura, Amravati
**3-Shaikh Wasin** S/o Shaikh Taj Age 42 years, Occu: Business R/o Quarter No. 25, Walgaon Road Haidar Pura, Amravati
**4-Sau. Shahina Bano**w/o Abdul Hamid Age -44 years, Occu: Housewife R/o, C/o Abdul Hamid, Ward no. 12, Dhani, Dayamiyan, Rajgarh, Post- Sadulpur, Distt- Churu, Rajasthan
**5-Shama Bana** W/o Israr Khan Age-47 years, Occu: Housewife R/o C/o Israr Khan, Katan Bavadi, Andar Kot, Ajmer, Distt- Ajmer
**6-Sau. Shahista** W/o Sagir Khan Age -46 years, Occu: Housewife R/o C/o Sagir Khan Ward No. 12 Dayamiyan Ki Dhani, Post- Sadulpur Distt. Charu Rajgarh Charu Rajashtan 331023
**7-Sau. Shamim Bano** W/o Rahemat Kha Age -47 years, Occu: Housewife R/o- C/o Rahemat Kha, Near Majit Madrasi Baba Nagar, Amravati

**-विरुध्द- गैरअर्जदार-Nil**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत **Shaikh Taj Shaikh** हे दि. २२.०९.२०२१ रोजी अमरावती येथे मयत झाले Rahima Bano Shaikh Taj हर २५.०७.२०२४ रोजी अमरावती येथे मयत झाल्या. अर्जदार **Mohammad Salim S/Shaikh Taj + 6** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा **Mohammad Salim S/o Shaikh Taj + 6** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदई कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांन सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.आज दि. ११.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती**

---

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्र.१५२१/२०२६**
**श्री राजु अधिक एक विरुध्द निरंक**
**पुढील ता.०३.०९.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :-**
१. **राजु बापुराव मडावी,** वय ६३ वर्षे, व्यवसाय- मजुरी रा.समाधान नगर कॅम्प रोड, अमरावती ता.जि.अमरावती
२. **कृष्णा बापुराव मडावी,** वय ५० वर्षे, व्यवसाय- मजुरी रा.समाधान नगर कॅम्प रोड, अमरावती ता.जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत हे बापुराव धन्नुजी मडावी** हे दिनांक **१२.१२.२०१६** रोजी अमरावती,ता.जि.अमरावती येथे व **मयत गिरीजाबाई बापुराव मडावी** हया **दि.०६/१०/२०२४** रोजी अमरावती,ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार राजु अधिक एक विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्री राजु अधिक एक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. २८.०७.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांस माहितीकरिता जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यांत येते की, मौजा- रसुलापुर येरला, ता.मोर्शी, जि.अमरावती येथील नगर परिषद मोर्शी कक्षेतील शेत सर्वे नंबर २/१ ई नुसार लेआउट कन्व्हर्टेड झालेला प्लॉट नं.८ (आठ) पुर्ण खुला असलेला याची लांबी-रुंदी पूर्व-पश्चिम उत्तर बाजू १५ मीटर २४ से.मि., पुर्व-पश्चिम दक्षिण बाजू १५ मीटर २४ से.मी., उत्तर-दक्षिण पुर्व बाजू १४ मीटर १७ से.मी., उत्तर-दक्षिण बाजु १७ मिटर २४ से.मी. याचे एकुण क्षेत्रफळ २३९.३१ चौ.मिटर, २५७५.०० चौरस फुट असलेली सदरची मालमत्ता ही श्री उमेश अशोकराव खवले यांचे मालकी व ताब्यात असुन यांचे व्यतिरिक्त सदर मालमत्तेवर कोणाचीही मालकी व ताबा नसुन कसलेही कोर्ट प्रकरण दाखल नाही. तेव्हा या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, जर कोणालाही यावर आक्षेप असेल तर त्यांनी जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आंत आपला आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

**मोर्शी (रसुलपुर येरला)**
**दिनांक २२.०९.२०२६**

**उपरोक्त जाहीर नोटीस देणार तर्फे**
**सही /-**
**ॲड.श्री नरेंद्र इंगळे**
**जवाहर कॉलनी, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती**
**मो.नं.- ९५०३९०५७२८**

---

## जाहीर नोटीस

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-३ यांचे न्यायालय**
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२६९/२०२६ ने.ता. १५.१०.२०२६

**Applicant :-** **1. Dhanraj Sukhdeo Sonone**
Age 53 years, Occ.- Agriculturiest,
**2. Parth Dhanraj Sonone**
Age 10 yrs, Occ.- Education
(Applicant No.1 for himself and through his legal Guardian for Minor Applicant No.2 )
**---------V/s----------**
**Non-applicant :- Nill**

**APPLICATION UNDER SECTION 8 OF HINDU MINORITY AND GUARDIANSHIP ACT 1956 FOR PERMISSION TO SELL AGRICULTURIEST FIELD.**

ज्याअर्थी वरील **अर्जदार यांनी अज्ञान पाल्याच्या नावे असलेली खालील वर्णनाची मालमत्ता विकण्याची परवानगी मिळण्याकरिता** वि.जिल्हा न्यायाधीश-३, अमरावती यांच्या न्यायालयात रितसर अर्ज सादर केला आहे.

**Description of the Property**

Within the Jurisdiction of Sub Registrar Rural Amravati Mouje Asara, Part 1, Tq. Bhatkuli, Dist. Amravati, Survey No. 392/2 agriculturiest field, Class 1, admeasuring area 0.81 H.R. which is bounded as under :-
**Four Boundaries** :-
Towards East : Road, Towards West : Plot No.7
Towards North : Plot No. 5-B Towards South : Remaining portion of this plot

त्याअर्थी सदर अर्जाविरुध्द कारण दाखविण्यास अगर काही हरकती घ्यावयाचे असल्यास अर्जदाराचे सर्व नातलग व हितसंबंधी यांना जाहीर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, त्यांनी दिनांक **१५.१०.२०२६** रोजी सकाळी **१०.३०** वाजता **वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-३ ,अमरावती** यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदर्हू अर्जाची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज **दिनांक २२/०९/२०२६** रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला असे.

**अमरावती**
**दिनांक २२/०९/२०२६**

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक (न्यायीक विभाग)**
**जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती**

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**
आर.एम.जे.सी.क्र.४३२/२०२६ ने.ता.२३.१०.२०२६

**अर्जदार :**
१. **सुभाष श्रीराम सुने,** वय ५० वर्षे, व्यवसाय- मजुरी
२. **दुर्गा श्रीराम सुने,** वय ६७ वर्षे, व्यवसाय- घरकाम
३. **पंचफुला ज्ञानेश्वर दाभाडे,** वय ६० वर्षे, व्यवसाय- घरकाम
४. **लता श्रीराम सुने,** वय ५३ वर्षे, व्यवसाय- घरकाम
५. **किसान शामजी सुने,** वय ८८ वर्षे, व्यवसाय- घरकाम
६. **चंद्रकला रामचंद्र सुने,** वय ७५ वर्षे, व्यवसाय- घरकाम
७. **अनिल विष्णुपंत सुने,** वय ५७ वर्षे, व्यवसाय- मजुरी
८. **लीला श्रीकृष्ण अस्वार,** वय ७४ वर्षे, व्यवसाय- घरकाम

अर्जदार क्र.१,२,६,७ व ८ रा.शिरजगाव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
अर्जदार क्र.५ रा.कु-हा, ता.तिवसा, जि.अमरावती
अर्जदार क्र.३ रा.बडनेरा, ता.जि.अमरावती
अर्जदार क्र.४ रा.साईनगर, अमरावती, ता.जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात.**मृतक शामजी जनाजी सुने** यांचा **मृत्यू दि.२१/०२/१९६८ रोजी, मृतक बनाबाई शामजी सुने** हिचा **मृत्यू दि.१०/०१/१९६७, मृतक रामचंद्र शामजी सुने** यांचा **मृत्यू दि.१०/०८/२००७, मृतक अंजनाबाई रामचंद्र सुने** हिचा **मृत्यू दि.०७/११/२००७, विष्णूपंत शामजी सुने** यांचा **मृत्यू दि.१३/१२/२०१४,मृतक पार्वताबाई विष्णू सुने** हिचा **मृत्यू दि.१०/०५/१९९३, मृतक श्रीराम शामजी सुने** यांचा **मृत्यू दि.२०/११/२०१०** रोजी रा.शिरजगाव कसबा, ता.चांदूर बाजार.जि.अमरावती येथे झालेला आहे.

यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.४३२/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.०७.०९.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार

---

### जाहिर नोटिस

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधिश-०३, यांचे न्यायालय**
**किरकोळ दिवाणी अर्ज क. २०३/२०२६ ने.ता. १३/१०/२०२६**

**Applicant :-1) Asiya Parveen w/o Salim Khan**
Age about 44 years, Occu. Housewife applicant through minor natural guardian Mother Ku Tanzilla Parveen D/o. Salim Kha, Age about 17 years, Occu. Education R/o. At Post- Jalka Hirapur Tq. Bhatkuli, Dist. Amravati 444 801

**Non-applicant :- Nill**

**APLICATION UNDER SECTION 8 OF GUARDIANS AND WARD ACT 1980 FOR GRANT PERMISSION TO SELL, OUT THE IMMOVEABLE PROPERTY OF MINOR.**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी अज्ञान पाल्याच्या नावे असलेली खालील वर्णनाची मालमत्ता विकण्याची परवानगी मिळण्याकरीता वि. जिल्हा व सत्र न्यायाधिश ०३, अमरावती यांच्या न्यायालयात रितसर अर्ज सादर केला आहे.

**DESCRIPTION OF PROPERTY**

That the property situated at Mouje - Sirala Part II, Tq. Bhatkuli, Dist. Amravati vide bhumapan no/Upvibhag-1418/2 total admeasuring 0 H 83 r, class I Aakar-Rs 4.80 out of undivided 1/8th share having the four corners of agriculture land as under-
Four Boundaries :- Towards East :-Agricultural land of Raju Bhandel
Towards West :-Agricultural land of Promo Vinchurkar
Towards North :-Agricultural land Vijayrao Deshmukh
Towards South Agricultural land other person Agricultural

त्या अर्थी सदर अर्जाविरुध्द कारण दाखविण्यास अगर काही हरकती घ्यावयाची असल्यास अर्जदाराचे सर्व नातलग व हितसंबंधी यांना जाहिर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, त्यांनी दिनांक १३-१०-२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता वि. जिल्हा व सत्र न्यायाधिश ०३, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलांमार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदहू अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.आज दिनांक १५.०९.२०२६, रोजी भाने सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दिसाठी दिला.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहा. अधिक्षक (न्यायीक विभाग) जिल्हा व सत्र न्यायालय अमरावती**

---

## जाहीरनामा

या जाहिरनामाद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नाव श्री /श्रीमती /कु.श्री राजेंद्र प्रतापराव पखाले पत्ता-**सरमसपुरा अचलपूर** यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.**२६** संगणक मालमत्ता क्र.**ACH A000024533** जुना मालमत्ता क्र.**२६०००२४१** नझुल शीट नं. **१४ बी** प्लॉट नं. **२२४** श्री /श्रीमती /कु. **श्री. प्रल्हाद रखुजी पखाले** या नावाने असुन वरील अर्जदार यांनी यांनी श्री /श्रीमती /कु. **श्री हरिसिंग जगराम बघेल** या नावाने फेरफार घेण्याकरिता / नाव बदलण्याम / नाव लावण्यास / नावामध्ये /क्षेत्रामध्ये / दुरुस्ती करण्याकरिता ( खरेदी, मृत्युपत्र, बक्षिसपन, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यालावाद्वारे ) कार्यालयामध्ये दिनांक ३१/८/२०२६ रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत लेखी स्वरूपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करून हजर राहावे. अन्यथा या मुदती नंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**टीप / लक्षवेध :-**
**उपरोक्त मालमत्तेची चतुसिमा :-**
**पूर्व-** रस्ता
**पश्चिम** :-रस्ता
**उत्तर** -बळीराम तांदुले यांचे घर
**दक्षिण** :नागोजी बळीराम राईकरवार यांचे घर

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अचलपूर**

---

## जाहीरनामा

या जाहिरनामाद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नाव श्री /श्रीमती /कु.श्री राजेंद्र प्रतापराव पखाले पत्ता-**सरमसपुरा अचलपूर** यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.**२६** संगणक मालमत्ता क्र.**ACH A000024532** जुना मालमत्ता क्र.**२६०००२४०** नझुल शीट नं. **१४ बी** प्लॉट नं. **२२५** श्री /श्रीमती /कु. **श्री. प्रल्हाद रखुजी पखाले** या नावाने असुन वरील अर्जदार यांनी यांनी श्री /श्रीमती /कु. **श्री हरिसिंग जगराम बघेल** या नावाने फेरफार घेण्याकरिता / नाव बदलण्याम / नाव लावण्यास / नावामध्ये /क्षेत्रामध्ये / दुरुस्ती करण्याकरिता ( खरेदी, मृत्युपत्र, बक्षिसपन, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यालावाद्वारे ) कार्यालयामध्ये दिनांक ३१/८/२०२६ रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत लेखी स्वरूपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करून हजर राहावे. अन्यथा या मुदती नंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**टीप / लक्षवेध :-**
**उपरोक्त मालमत्तेची चतुसिमा :-**
**पूर्व-** रस्ता
**पश्चिम** :-रस्ता
**उत्तर -प्रल्हाद रखुजी पखाले यांचे घर**
**दक्षिण** :रस्ता

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अचलपूर**

---

## सायटेशन / जाहिरनामा

**विद्यमान व्यवहार न्यायाधिश साहेब (कनिष्ठ स्तर) मोर्शी. यांचे न्यायालयांत**

आर.एम.जे.सी.क. ४११/२०२६ ने.ता.१८/०८/२०२६
१८

**अर्जदार-बेबी भगवान माने, वय-५४ वर्ष, धंदा-घरकाम**
रा. मोर्शी, ता. मोर्शी, जि. अमरावती.

**// विरूध्द //कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदारांप्रमाणे अर्जदाराचे वडील नामे **गंगाराम भोगुजी जाधव** हे दिनांक **२३/०७/२००७** रोजी **Morshi, Tq. Morshi, Dist-Amravati** येथे मय्यत झालेले आहे. तसेच अर्जदाराची आई नामे **सरस्वती गंगाराम जाधव** ही दिनांक १७/११/२०१८ रोजी Morshi, Tq.Morshi, Dist-Amravati येथे मय्यत झालेली आहे. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आंत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

शिक्का

**'आदेशान्वये**
**सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय, मोर्शी.**

---

## सायटेशन / जाहिरनामा

**विद्यमान व्यवहार न्यायाधिश साहेब (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क. ५२४/२०२६ ने.ता. २४/९/२०२६

**अर्जदार- १) ताराबाई अशोक बोथे,** वय ६० वर्ष, धंदा-घरकाम रा. आंबेडकर नगर भोपाल, ता. जि. भोपाल (मध्यप्रदेश)
**२) नलु उर्फ मिना वसंत वाहने,** वय-५५ वर्ष, धंदा-घरकाम रा.पंचशिल नगर भोपाल, ता.जि. भोपाल (मध्यप्रदेश)
**३) अनिता प्रेमदास नारनवरे,** वय-५१ वर्ष, धंदा-घरकाम रा. चिंचोलीगवळी, ता. मोर्शी, जि. अमरावती.
**४) मायाबाई शाम परब,** वय ४८ वर्ष, धंदा-घरकाम रा. देवास, ता.जि. भोपाल (मध्यप्रदेश)
**५) श्रावण धनपाल पाटील मयताचे वारस**
**५अ) श्रीमती कंचन श्रावण पाटील,** वय-४९ वर्ष, धंदा-घरकाम
**५ब) अंकिता श्रावण पाटील,** वय-१९ वर्ष, धंदा- शिक्षण
दोघेही रा.घर नं.१२/१४ गितांजली कॉम्प्लेक्स पी ॲन्ड टी चौराहा साउथ टि.टी. नगर हुजुर भोपाल, ता. जि. भोपाल (मध्यप्रदेश)
**गैरअर्जदार-१) श्री. शुध्दोधन धनपाल पाटील,** वय-४२ वर्ष, धंदा खाजगी नौकरी
**२) श्री. जिवक धनपाल पाटील,** वय-३६ वर्ष, धंदा-खाजगी नौकरी
**३) श्रीमती कांता धनपाल पाटील,** वय-७० वर्ष, धंदा घरकाम तिघेही रा.पंचशिल नगर भोपाल, ता.जि. भोपाल (मध्यप्रदेश)

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ ते ४ तसेच गैरअर्जदार नं.१ व २ चे वडील तर गैरअर्जदार नं.३ चे पती तर अर्जदार नं.५ (अ) चे सासरे तर अर्जदार नं.५ (ब) चे आजोबा नामे धनपाल व्यंकटराव पाटील हे दिनांक ०७/०३/२०२४ रोजा **Bhopal, Tq. Dist-Bhopal (M.P.)** येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस अर्जदार व गैरअर्जदार आहे तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. मयताला वरील अर्जदार व गैरअर्जदारांशिवाय ईतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे या प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आंत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादरकरावा अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

शिक्का

**आदेशान्वये**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, मोर्शी**

---

## - सायटेशन / जाहिरनामा -

**विद्यमान व्यवहार न्यायाधिश साहेब (कनिष्ठ स्तर) मोर्शी. यांचे न्यायालयांत**

आर.एम.जे.सी.क.५७०/२०२६ ने.ता.२२/१०/२०२६

**अर्जदार- १) शेख कदीर शेख जंगलु,** वय-७८ वर्ष, धंदा-मजुरी
**२) शेख ताज शेख जंगलु,** वय-५६ वर्ष, धंदा-मजुरी
दोघेही रा.मोर्शी, ता. मोर्शी, जि. अमरावती.

**// विरूध्द // कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदारांप्रमाणे अर्जदारांचे वडील शेख जंगलु शेख गुलाब हे दिनांक १७/१०/१९९४ रोजी Morshi, Tq.Morshi, Dist-Amravati येथे मय्यत झालेले आहे.. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे.. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आंत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

शिक्का

**आदेशान्वये**
**सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय, मोर्शी**

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.
संपादक- प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक - ११
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन्स क्र. ATI/RNP/47/2023-2025
मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०९६३००,९८२२९७६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# पावसाने पाठ फिरवल्याने
# अमरावती विभाग शेती आणि जलसंकटाच्या कात्रीत

**अमरावती/का.प्र.**

यंदाच्या पावसाळ्यात पश्चिम विदर्भाकडे पावसाने पाठ फिरवल्याने संपूर्ण अमरावती विभाग एकाच वेळी शेती आणि जलसंकटाच्या दुहेरी कात्रीत सापडला आहे. ऐन फुलोऱ्यात आणि शेंगा भरण्याच्या टप्प्यावर पावसाने मारलेल्या सुमारे महिनाभराच्या प्रदीर्घ दडीमुळे सोयाबीनचे उत्पादन ३० ते ४० टक्क्यांनी घटण्याची भीती निर्माण झाली आहे. दुसरीकडे, विभागातील मोठ्या प्रकल्पांमध्ये अवघा ६० टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे आगामी रब्बी हंगाम आणि उन्हाळ्यातील पिण्याच्या पाण्याचे नियोजन पूर्णपणे कोलमडण्याची चिन्हे आहेत.

१ जून ते १८ सप्टेंबर या कालावधीत अमरावती विभागात सरासरीच्या केवळ ७३ टक्के पावसाची नोंद झाली आहे. अपेक्षित पावसाने पाठ फिरवलेली पाठ, मोठ्या जलाशयांमध्ये अल्प साठा, सरासरी उत्पादन घटण्याची भीती अशा कात्रीत पश्चिम विदर्भातील शेतकरी सापडला आहे. त्यामुळे रब्बी सिंचनासह पिण्याच्या पाण्याचे नियोजन कोलमडण्याची चिन्हे आहेत.





**सोयाबीनचे अतोनात नुकसान**

विभागात लागवडीखालील २९.९४ लाख हेक्टरपैकी सर्वाधिक १३.६८ लाख हेक्टर क्षेत्र सोयाबीनखाली आहे. सोयाबीन, कापूस आणि तूर या प्रमुख पिकांनी तब्बल ९६ टक्के क्षेत्र व्यापले आहे.

शेतीतज्ज्ञांच्या निरीक्षणानुसार, सोयाबीनमध्ये फुलोऱ्याचे रूपांतर शेंगांमध्ये होण्याच्या अत्यंत संवेदनशील टप्प्यावर जमिनीत ओलावा न राहिल्याने मोठ्या प्रमाणावर फुलगळ झाली असून सरासरी उत्पादनात किमान ३५ टक्क्यांची तूट अटळ आहे.

जिल्ह्याची स्थिती सर्वाधिक चिंताजनक असून येथे सरासरीच्या अवघा ५९ टक्के (४७२.७ मिमी) पाऊस झाला आहे. अचलपूर (४६.४ टक्के), चिखलदरा (५२.१ टक्के) आणि भातकुलीसारख्या तालुक्यांत पावसाने सरासरीची पन्नाशीही ओलांडलेली नाही अकोल्यात ६३.५ टक्के, तर वाशीममध्ये ६४.६ टक्के पाऊस झाला आहे.

**परतीचा पाऊस मानल्या जाणाऱ्या**

सप्टेंबरमध्येही अत्यल्प पाऊस झाल्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे यवतमाळ (८३.१) आणि बुलढाणा (७८) टक्के) या जिल्ह्यांनी विभागाची सरासरी कशीबशी सावरली असली, तरी अवघा ६० टक्के साठा अमरावती विभागातील नऊ मोठ्या प्रकल्पांमध्ये सध्या केवळ ६०.२२ टक्के साठा शिल्लक आहे, गेल्या वर्षी हाच साठा तब्बल ९३.९९ टक्के इतका होता. म्हणजेच वर्षभरात धरणांतील पाणीसाठ्यात ३४ टक्क्यांची घट झाली आहे.

अमरावतीसह अनेक गावांना पाणी पुरवणाऱ्या अप्पर वर्धा धरणात सध्या ५८.६६ टक्के साठा आहे, जो गेल्या वर्षी ९७.२३ टक्के होता. काटेपूर्णा धरणात २१.८३, तर बुलढाण्यातील खडकपूर्णा प्रकल्पात ९.०९ टक्के पाणी शिल्लक आहे.तरी एकूण चित्र अत्यंत विदारक आहे गेल्या वर्षीच्या अतिवृष्टीची भरपाई न मिळाल्याने आधीच कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांची यंदाची दिवाळी अंधारात जाण्याची भीती आहे.

> ६९७.४ मिमीच्या तुलनेत प्रत्यक्षात अवघा ५०८.८ मिमी पाऊस पडला गेल्या वर्षी याच काळात विभागात १११.८ टक्के (७७९.४ मिमी) समाधानकारक पाऊस झाला होता. पाचही जिल्ह्यांत अमरावती सोयाबीन आणि कापसाचे पीक पूर्णपणे उद्ध्वस्त झाले असून, राज्य सरकारने केवळ पोकळ घोषणा न करता बाधित शेतकऱ्यांना तातडीने एकरी किमान २० हजार रुपयांची रोख मदत जाहीर करावी. सुरक्षिततेची हमी देणारी सक्षम पीक विमा योजना लागू करण्याची नितांत गरज आहे.
>
> **विजय जावंधिया,**
> ज्येष्ठ शेतकरी नेते

## कमी पर्जन्यमानामुळे मोर्शी-वरुडचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करा

**मोर्शी/वार्ताहर**

कमी पर्जन्यमानामुळे मोर्शी तालुक्यात ३७ टक्के तर वरुड तालुक्यात ४० टक्के पावसाची तूट झाली आहे.तसेच ३० ते ४० दिवसांचा पर्जन्यखंड निर्माण झाल्याने संत्रा, सोयाबीन,तूर यासह सर्वच पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.या पार्श्वभूमीवर मोर्शी-वरुड तालुक्याचा दुष्काळग्रस्त भागात समावेश करून शेतकरी व शेतमजुरांना न्याय व मदत मिळवून देण्यासाठी आमदार उमेश यावलकर यांनी शासनाकडे पाठपुरावा केला आहे.


उमेश यावलकर यांचा पाठपुरावा

या संदर्भात आमदार यावलकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे दुष्काळ जाहीर करण्याबाबत निवेदन देऊन सातत्याने पाठपुरावा केला.त्यांच्या पाठपुराव्याला यश मिळाले असून, डीआरएफ-१च्या यादीत मोर्शी व वरुड तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे अशी माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे.कमी पाऊस,दीर्घ पर्जन्यखंड आणि पिकांचे नुकसान यामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी व शेतमजुरांना शासनाच्या माध्यमातून मदत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.संत्रा उत्पादकांसह सोयाबीन, तूर व अन्य पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.मोर्शी-वरुडच्या शेतकऱ्यांच्या हक्कासाठी पाठपुरावा करून शासनाकडून मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे आमदार उमेश ऊर्फ चंदू यावलकर यांनी सांगितले.

## पावसाअभावी कापूस व सोयाबीन पिकावर किडींचा प्रादुर्भाव

**कावली वसाड**-मान्सूनच्या सुरुवातीच्या पावसामुळे खरीप पिके उभी राहिली असली तरी गेल्या एक ते दीड महिनापासून पावसाने दडी मार्गाने कावली वसाड परिसरासह धामणगाव तालुक्यात चिंतेचे वातावरण दिसून येत आहे. जुलैमध्ये काही भागांमध्ये थोड्या प्रमाणात पाऊस पडला. त्यामुळे शेतकऱ्यांनी परिसरातील सोयाबीनपेक्षा कपाशी या पिकाला अधिक पसंती दिली असली तरी काही शेतकऱ्यांनी सोयाबीनसुद्धा आपल्या शेतामध्ये पेरले. काहींना पावसाचा खंड पडल्यामुळे दुबार पेरणी सोयाबीनची करावी लागली; मात्र उगवण चांगली असल्याने व काही प्रमाणात पावसाळा बऱ्यापैकी असल्यामुळे ती पिके टिकली व हिरवीगार शेती झाली. किळीचा प्रादुर्भाव असल्याचे त्यामुळे शेतकरी चिंतेत सापडला आहे. एकीकडे तब्बल एक महिन्याच्या वर पावसाने दडी मारली, परंतु अनेक शेतकऱ्यांनी आपल्या शेतामध्ये बोरवेल विहिरीमधून सिंचन केले असले तरी उन्हाचा तडाखा म्हणजेच तापमानामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे सोयाबीनचे पीक या परिसरात पूर्णतः सुकण्याच्या अवस्थेत आहे आणि शेतकऱ्यांच्या शेतामधील सोयाबीन पिवळी पडली. कारण अपुरे पाणी मिळाल्यामुळे शेंगा भरण अवस्थेत असतानाच ती शेंगदाण्याने भरली गेली नसल्याचेही शेतकरी बोलत होते, तीच परिस्थिती कपाशीची आहे. ज्या शेतकऱ्याकडे पाण्याची व्यवस्था आहे, शेतकऱ्याने आपल्या कपाशी पिकाला पाणी देण्याचे काम केले असले तरी कपाशीचे पीक हे पिवळे पडले आहे.

## मोर्शी तालुका कोरडा दुष्काळग्रस्त घोषित करावा
### भाजपने तहसीलदार, एसडीओ व कृषी अधिकाऱ्यांना निवेदन

**लेहगाव/वार्ताहर**

भारतीय लोक पार्टी मोर्शी तालुका (तिवसा विधानसभा) च्यावतीने तहसील कार्यालय, उपविभागीय अधिकारी तथा कृषी अधिकारी मोर्शी यांना गेल्या ४५ दिवसांपासून पावसाने दडी मारल्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचे सोयाबीन, कपाशी, तूर पीक सुकून जाऊन या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. त्यामुळे आपल्या कुटुंबाचा पुढील उदरनिर्वाह कसा भागवायचा, याची चिंता शेतकऱ्यांना लागली आहे.तरी शासनाने त्वरित पंचनामे करून मोर्शी तालुका कोरडा दुष्काळग्रस्त घोषित करावा आणि शेतकऱ्यांना आर्थिक मदत करून दिलासा द्यावा, याकरिता भारतीय जनता पार्टीच्यावतीने तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, कृषी अधिकारी मोर्शी यांना सोयाबीनची सुकलेली झाडे व पंचनामा करीत असताना अधिकाऱ्यांना ऊन लागू नये म्हणून डोक्याला बांधण्याकरिता दुपट्टा देऊन निवेदन देण्यात आले.



यावेळी भाजपचे सर्व पदाधिकारी विकास तट्टे, शरद मोहोड, विजय गाडगे, मंगेश बोंडे, कथीलकर, मंगेश इकबालभाई हुसैन, विजय टेकाडे, संजय टेकाडे, नारायण तवर, सचिन कोकाटे, वर्षा गाडगे, प्रिया कोकाटे, विद्या बेहरे, नितीन जाणे, सुनील ठाकरे, निखिल टेकाडे, श्रीधर सोलव, विनय ठाकूर, गौरव मडके, सागर माहोरे, सूरज कोंडे, सागर भागवत, स्वप्नील भोपळे, प्रवीण झोटिंग तथा भाजपचे कार्यकर्ते आणि शेतकरी उपस्थित होते.

## नांदगाव खंडेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीत नवीन सोयाबीनची आवक



**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समिती, नांदगाव खंडेश्वर येथे चालू हंगामातील नवीन सोयाबीनची पहिली आवक २३ सप्टेंबर रोजी दाखल झाली असून, अत्यंत उत्साही वातावरणात पार पडलेल्या मुहूर्ताच्या लिलावात सोयाबीनला ५७११ रुपये प्रति क्विंटल एवढा दर मिळाला आहे.

नांदगाव खंडेश्वर येथील शेतकरी शेख सोहेल यांनी आपल्या शेतातील हंगामातील नवीन सोयाबीन बाजार समितीत विक्रीसाठी आणले होते. या प्रसंगी बाजार समितीचे संचालक पंकज ठाकरे यांच्या हस्ते काटा पूजन करण्यात आले. तसेच पहिली आवक आणल्याबद्दल शेतकरी शेख सोहेल यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला व आगामी हंगामासाठी शुभेच्छा दिल्या श्रेयश ठाकरे यांच्या अडत मध्ये आलेले हंगामातील मुहूर्ताचे नवीन सोयाबीन.

व्यापारी संयोग ट्रेडर्स व नंदगोपाल दालमिल यांनी खरेदी केले,.याप्रसंगी बाजार समितीचे संचालक विवेक वैष्णव, जितेश जांगडा, मो. जावेद भाई, अडते सतीश गिड्डे, ओंकार ठाकरे, संजय खंडारे, व्यापारी सतीश शिरभाते, जावेद भाई तसेच समितीचे कर्मचारी अविनाश कथकर, आकाश शिंदे, ऋषिकेश चोपडे,आशिष शेळके , सागर उईके, व इतर शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सरकारला काजू-बदाम पाठवून किसान सभेचा अनोखा निषेध
### तहसीलदार यांचे मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

राज्यभरात एल -निनोच्या प्रभावामुळे निर्माण झालेल्या तीव्र दुष्काळी परिस्थितीकडे आणि नियमित कर्जदार शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी अखिल भारतीय किसान सभेने आज राज्यव्यापी आंदोलनाची हाक दिली होती.

त्याचाच एक भाग म्हणून अखिल भारतीय किसान सभा, नांदगाव खंडेश्वर तालुका कमिटीच्या वतीने आज तहसीलदार नांदगाव खंडेश्वर यांच्या मार्फत शासनाला निवेदन देण्यात आले. शेतकऱ्यांच्या संतापाचे प्रतीक म्हणून मंत्र्यांना काजू-बदाम पाठवून या आंदोलनात निषेध व्यक्त करण्यात आला. सोयाबीन, कापूस व संपूर्ण खरीप पिके दुष्काळामुळे उद्ध्वस्त झाली असून शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यामुळे सरकारने कोणत्याही जाचक निकषांची अट न घालता संपूर्ण महाराष्ट्रात तातडीने दुष्काळ जाहीर करावा,



अशी प्रमुख मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

केवळ बियाणे-खताचा खर्च नव्हे, तर पिकाची संपूर्ण नुकसान भरपाई द्यावी- नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना किमान २ लाख रुपयांचे प्रोत्साहन अनुदान द्यावे,विविध तांत्रिक कारणांमुळे कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या सर्व शेतकऱ्यांना कर्जमाफी लागू करावी,थकीत उपसा सिंचन योजनेतील कर्ज तातडीने माफ करावे,पीक विम्यातून काढून टाकलेले ट्रिगर पुन्हा लागू करावेत,, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतमजुरांनाही आर्थिक मदत द्यावी. या राज्यव्यापी आंदोलनानंतरही सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे गांभीर्याने न पाहिल्यास, मुख्यमंत्री व कृषीमंत्र्यांच्या वर्षा बंगल्यावर काजू आणि बदाम ओतून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा किसान सभेने या निवेदनाद्वारे दिला आहे.यावेळी किसान सभेचे जिल्हा सचिव कॉम्रेड श्याम शिंदे, तालुका सचिव अशोक केसरखाने, तालुका उपाध्यक्ष विजय पाटील, शत्रुघ्न मगर, तुळशीराम जेठे, राजू ढोके, दिनेश बावणे, लक्ष्मण झिमटे, शैलेश कटाने, शहेनशहा, किशोर शिंदे, आदी संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते.

## शेतकरी महिलांना शेतकरी प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती**-महाराष्ट्र राज्याने महिला सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम २०२६' लागू केला आहे. त्याअंतर्गत पात्र महिलांना शेतकरी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार असुन त्याद्वारे त्यांना अधिकृतपणे महिला शेतकरी म्हणून मान्यता मिळेल, तसेच शासनाच्या विविध कृषि योजना, कर्ज, विमा, अनुदाने, प्रशिक्षणे, तांत्रिक मार्गदर्शनाचा लाभ सुलभपणे मिळू शकेल.शेतीमध्ये काम करणाऱ्या महिला, दुग्धव्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन, रेशीम उद्योग, मधुमक्षिकापालन, भाजीपाला फळबाग लागवड व इतर शेतीपूरक व्यवसाय करणाऱ्या महिलांना लाभ घेता येईल. अशा पात्र महिलांनी त्वरीत महिला शेतकरी पोर्टलवर https://uat-mahakrishi.mahaitgov.in/mahila-shetkari-service आवश्यक माहिती भरुन ऑनलाईन अर्ज सादर करावा.

## 'वंदे मातरम'ला नकार शिक्षेस पात्र नाही!
### सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्वाळा

**नवी दिल्ली**-सद्सद्विवेकबुद्धीने 'वंदे मातरम' गाण्यास नकार देणाऱ्या व्यक्तीला शिक्षा करता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी स्पष्ट केले. यावेळी सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. व्ही मोहना यांच्या खंडपीठाने १९८६मध्ये सदसद्विवेकबुद्धीच्या आधारावर राष्ट्रगीतास नकार देण्यास परवानगी देण्यात आल्याच्या प्रकरणाची आठवण करून देत केंद्र सरकारला याबाबत भूमिका मांडण्याचे निर्देश दिले आहेत.

'वंदे मातरम'मधील सहा कडवी गाण्याचे बंधन घालणाऱ्या नव्या कायद्याला कर्नाटकी शास्त्रीय गायक टी. एम. कृष्णा यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. यातील शेवटची चार कडवी ही भारताच्या धर्मनिरपेक्ष भूमिकेचे उल्लंघन करत असल्याचा दावा त्यांनी याचिकेत केला होता. १९८६ मध्ये 'बिजू इमॅन्युअल विरुद्ध केरळ सरकार' खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने मुलांच्या राष्ट्रगीत गाण्यास आदरपूर्वक नकार देण्याच्या अधिकारावर शिक्कोमार्तब केले होते.

राष्ट्रीय गीत काय आहे, हा वादाचा मुद्दाच नाही. मात्र १९८६ प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर अजूनही प्रश्नचिन्ह उपस्थित झालले नाही, याकडे न्यायमूर्ती बागची यांनी लक्ष वेधले. यावेळी सरकारच्या वतीने भूमिका मांडताना महान्यायअभिकर्ता तुषार मेहता यांनी याबाबत कोणत्याही प्रकारची नोटीस जारी करू नये, अशी विनंती सर्वोच्च न्यायालयाला केली. नोटीस बजावल्यास खळबळ उडू शकते, असा दावा त्यांनी केला. सुधारित कलम ३ अन्वये, जे कोणी मुद्दाम राष्ट्रगीत वा राष्ट्रगीत-सदृश गीताचे गायन रोखतात किंवा अशा समूह गायनात व्यत्यय आणतात, त्यांना तीन वर्षापर्यंतचा कारावास वा दंड किंवा दोन्ही होऊ शकतात.



> **सरकाराला राष्ट्रीय गीत ठरवण्याचा, त्यातील दान कडवी गायची की चार कडवी, हेहै ठरवण्याचा अधिकार आहे, पण कलम २५ आणि २६ अन्वये असे गीत गायल्याने धार्मिक स्वातंत्र्याचा मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होण्याचा विचार करणाऱ्या, तसेच त्यास सद्सद्विवेकबुद्धीने विरोध करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला शिक्षात्मक परिणामांना सामोरे जावे लागू नये.**
>
> **न्या.जॉयमाल्या बागची,**
> **सर्वोच्च न्यायालय**

**अधिकारांचे संरक्षण ही न्यायालयाची जबाबदारी**

'वंदे मातरम'शी निगडित राष्ट्रीय भावना किंवा आकांक्षा काय आहेत, याचे मूल्यमापन करणे हे न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात येत नाही; तो निर्णय घेण्याचे काम राज्याचे आहे. मात्र कायद्यांतर्गत 'सदसद्विवेकबुद्धीनुसार आक्षेप व्यक्तीचे, विशेषतः घेणाऱ्या' व्यक्तीचे, धार्मिक कारणास्तव गायनास नकार देणाऱ्या व्यक्तीचे अधिकार संरक्षित आहेत की नाही, याचीच तपासणी करू, असे खंडपीठाने सांगितले.

## राजकीय पक्षांनी आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे-नयना गुंडे

**अमरावती/का.प्र.**

अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. यादरम्यान, राजकीय पक्षांनी प्रचार सभा व रॅली घेताना आदर्श आचार संहितेच्या नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी नयना गुंडे यांनी आज येथे केले.

अमरावती विभाग शिक्षक मतदार संघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विभागीय आयुक्त श्रीमती गुंडे यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालयात राजकीय पक्षांची



बैठक पार पडली. त्यावेळी त्या बोलत होत्या. भारत निवडणूक आयोगाने अमरावतीसह राज्यातील चार विभागांतील महाराष्ट्र विधान परिषदेच्या रिक्त होणाऱ्या जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. कार्यक्रम जाहीर झाल्यापासूनच विभागात आदर्श आचार संहिता लागू झाली असून त्यात विहित सूचना व नियमांचे राजकीय पक्षांनी काटेकोरपणे पालन करावे, विभागातील पाचही जिल्ह्यांमध्ये प्रचारसभा व रॅली घेण्याकरिता विभागीय आयुक्त कार्यालयात परवानगी मिळेल तसेच एकच प्रचार सभा असेल तर संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयातून परवानगी देण्यात येईल, या कालावधीत वाहन वापरण्याबाबत निश्चित करण्यात आलेल्या नियमानुसार कार्यवाही व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या निवडणूक कालावधी दरम्यान विभागातील ५ जिल्हाधिकारी हे सहायक मतदार नोंदणी अधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळतील. विभागातील २७ उपविभागीय अधिकारी सहायक मतदार नोंदणी अधिकारी म्हणून कार्य करतील तर ५६ तहसीलदार हे पदानिर्देशित अधिकारी म्हणून जबाबदारी पाहतील अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. येत्या २९ सप्टेंबर रोजी निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. प्रचारसभा आयोजनासाठी शाळा व महाविद्यालय परिसर टाळावा, सामाजिक तेढ निर्माण होणार नाही याची काळजी घेवून सभा व रॅली आयोजन व्हावे, असेही त्यांनी सांगितले. निवडणूक कार्यक्रम तसेच आचार संहिता काळात 'काय करावे व काय करू नये!' आदींबाबत त्यांनी उपस्थित राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना माहिती दिली. सामान्य प्रशासन अपर आयुक्त संजय जाधव, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) शिवाजी शिंदे यावेळी उपस्थित होते.

# ३३ हजार ९६४ मतदार निवडणार शिक्षक आमदार

## -२३ ऑक्टोबरला मतदान, २७ ऑक्टोबरला मतमोजणी

## -निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज

**अमरावती/प्रतिनिधीः-**
महाराष्ट्र विधान परिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्याने जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणा निवडणूक प्रक्रियेसाठी सज्ज झाली आहे.२९ सप्टेंबर रोजी अधिसूचना प्रसिद्ध होणार असून २३ ऑक्टोबरला मतदान आणि २७ ऑक्टोबरला मतमोजणी होणार आहे. ३३ हजार ९६४ मतदार या निवडणुकीमध्ये आपला हक्क बजावणार असल्याची माहिती विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी आज बुधवार २३ सप्टेंबर रोजी पत्रकार परिषद मध्ये दिली आहे.

त्यांनी सांगितले की, अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात

**मतदारांची स्थिती**

| | |
|---|---|
| अमरावती | - ९५९२ |
| अकोला | -५६२१ |
| यवतमाळ | -६५४७ |
| वाशिम. | -३५१४ |
| बुलढाणा | -८६९० |
| एकूण | -३३,९६४ |

अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम आणि यवतमाळ या पाच जिल्ह्यांचा समावेश आहे. नव्याने तयार करण्यात आलेल्या मतदार यादीत ३३ हजार ९६४ शिक्षकांनी नोंदणी केलेली आहे. दरम्यान, निवडणूक कार्यक्रमानुसार २९ सप्टेंबरला अधिसूचना, ६ ऑक्टोबरला उमेदवारी अर्ज दाखल



करण्याची अंतिम मुदत, ७ ऑक्टोबरला अर्जाची छाननी आणि ९ ऑक्टोबरला अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत आहे. २३ ऑक्टोबरला सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत

मतदान होणार असून २७ ऑक्टोबरला मतमोजणी होणार आहे. निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाल्याने आचारसंहितेमुळे जिल्ह्यातील सर्वच विकास कामांना तब्बल एक महिना ब्रेक लागणार आहे.मंगळवारी शिक्षक मतदारसंघाची निवडणूक जाहीर होताच एकीकडे राजकीय हालचालींना वेग आला असून दुसरीकडे प्रशासन निवडणूक प्रक्रियेकरिता सज्ज झाले आहे. ५६ अधिकारी-कर्मचाऱ्यांवर निवडणुकीची जबाबदारी देण्यात आलेली आहे. निवडणुकीची ☞(पान २ वर)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेच्या लाभासाठी

# प्रलंबित ई-केवायसी तात्काळ पूर्ण करा : जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

### -जिल्ह्यात ५६ हजार ९०५ शेतकऱ्यांना कर्जमाफी

### -केवळ ४ हजार ७०३ शेतकऱ्यांना नवीन पीककर्ज वाटप

**अमरावती/प्रतिनिधीः-**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेत ई-केवायसीअभावी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांची तात्काळ ई-केवायसी करावी, तसेच कर्जमुक्तीचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांना येत्या दहा दिवसात पीक कर्ज वाटप करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर



यांनी दिले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी अग्रणी जिल्हा व्यवस्थापक नरेश हेडाऊ, जिल्हा उपनिबंधक राजेश भुयार, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे विभागीय व्यवस्थापक सुनील पाण्डेय, स्टेट बँक ऑफ इंडियाचे विभागीय व्यवस्थापक आशिष सिंह उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर यांनी कर्जमाफी योजनेंतर्गत प्रलंबित असलेली ई-केवायसी प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित बँकर्स, तसेच सहकार विभागाला दिले. पात्र लाभार्थ्यांची ई-केवायसी प्रक्रिया प्रलंबित राहणार नाही, यासाठी आवश्यक ती कार्यवाही करून त्याचा नियमित आढावा घेण्याच्या सूचनाही देण्यात आली.

पात्र शेतकऱ्यांना पीक कर्ज उपलब्ध करून देताना ना देय प्रमाणपत्राची अनावश्यक अट लागू करू नये, ☞(पान २ वर)

# तीन ज्वेलर्स दुकाने फोडणारी आंतरराज्यीय टोळी गजाआड

## - १६.१५ लाखांचा मुद्देमाल जप्त





**अमरावती/प्रतिनिधीः-**
शहरातील ज्वेलर्सची दुकाने फोडून सोने-चांदी लंपास करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा अमरावती शहर गुन्हे शाखेने छडा लावला. बुलढाणा जिल्ह्यातील रेकॉर्डवरील तीन सराईत आरोपींना अकोला-अमरावती मार्गावर सापळा रचून ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून ४ किलो चांदी, ३५ ग्रॅम सोन्याचे दागिने व लगड, रोख रक्कम, मोटारसायकल आणि घरफोडीसाठी वापरले जाणारे साहित्य असा सुमारे १६ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

रोशनसिंग बबलुसिंग टाक (वय २४, रा. संजयनगर, देऊळगाव ☞(पान २ वर)

# अन्न व औषध प्रशासन कार्यालयासमोरच मुदतबाह्य चिली सॉसचा खच!

## दोनशेपेक्षा अधिक बॉटल्स कचऱ्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-**
अन्न व औषध प्रशासनाच्या कार्यालयासमोरच चिली सॉसच्या मुदत संपलेल्या बॉटल्सचा मोठा साठा कचऱ्याच्या ढिगाऱ्यात आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. एसटी स्टॅण्डच्या बाजूला असलेल्या अन्न व औषध प्रशासन कार्यालयासमोरील कचऱ्याच्या ढिगाऱ्यात तब्बल दोनशेपेक्षा अधिक मुदतबाह्य झालेल्या चिली सॉसच्या बॉटल्स आढळून आल्या. विशेष म्हणजे





या बॉटल्सची मुदत मे महिन्यातच संपलेली ☞(पान २ वर)

# बगीया टी-पॉइंट लूटप्रकरणी मुख्य आरोपीस अटक

### -३.४१ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अंजनगाव बारी/प्रतिनिधीः-** जुना बायपासवरील बगीया टी-पॉइंटजवळ चाकूचा धाक दाखवून चालकाकडून मोबाईल व पल्सर दुचाकी असा सुमारे १ लाख ९९ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याच्या प्रकरणात बडनेरा पोलिसांनी एका आरोपीस अटक केली आहे. अमन संतोष सोनोने (वय २२, रा. कांडलकर प्लॉट,



अमरावती) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

२७ ऑगस्ट रोजी घडलेल्या या घटनेत तीन अनोळखी इसमांनी तेजस पुनसे यांना अडवून चाकूचा धाक दाखवत विव्हो मोबाईल, आयफोन व पल्सर दुचाकी जबरीने नेली होती. याप्रकरणी बडनेरा पोलिस ठाण्यात गुन्हा क्र. ५६४/२०२६ दाखल करण्यात आला होता.घटनेनंतर☞(पान २ वर)

# नांदगाव खंडेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीत नवीन सोयाबीनची आवक

## ५७११ रुपये प्रति क्विंटल मुहूर्ताचा भाव



**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समिती, नांदगाव खंडेश्वर येथे चालू हंगामातील नवीन सोयाबीनची पहिली आवक २३ सप्टेंबर रोजी दाखल झाली. अत्यंत उत्साही वातावरणात पार पडलेल्या मुहूर्ताच्या लिलावात सोयाबीनला ५७११ रुपये प्रति क्विंटल एवढा दर मिळाला आहे.

नांदगाव खंडेश्वर येथील शेतकरी ☞(पान २ वर)

# अल्पवयीन मुलीला ब्लॅकमेल करून अत्याचाराचा आरोप

### अश्लील फोटो-व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी

**वणी/प्रतिनिधीः-**
इंस्टाग्रामवरून झालेल्या ओळखीचा गैरफायदा घेत १५ वर्षीय अल्पवयीन मुलीला ब्लॅकमेल करून अश्लील फोटो व व्हिडिओ मागविल्याचा तसेच



ते व्हायरल करण्याची धमकी देत तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप समोर आला आहे.या प्रकरणी वणी पोलिसांनी रक्षण पोनलावार (वय १९, रा. छोरीया लेआउट, वणी) याला अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,आरोपीची पीडित मुलीशी इंस्टाग्रामच्या माध्यमातून ओळख झाली होती. मुलीच्या एका संबंधाची माहिती तिच्या आई-☞(पान २ वर)

# विद्यापीठ अधिसभेत आता संपूर्ण वंदे मातरम्

### सिनेट सदस्य गिरीश शेरेकर यांची सूचना मान्य

**अमरावती/प्रतिनिधीः-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अधिसभेच्या बुधवारच्या सभेत वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताचे फक्त दोनच पद गायिल्या गेले. त्यावर आक्षेप घेताच पुढच्या सभेपासून संपूर्ण सहा कडव्यांचे वंदे मातरम् गायिले जाईल, असा निर्णय कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी आज जाहीर केला.



विद्यापीठ अधिसभेच्या सुरूवातीला राष्ट्रगीत, वंदे मातरम्, महाराष्ट्र गीत, विद्यापीठ गीत गायिले जाते. आजच्या सभेतही हे चार गीते गायिल्या गेली. पण, वंदे मातरम् या गीताचे नेहमी प्रमाणे दोनच पदे गायिल्या गेली. संसदेने जुलै ☞(पान २ वर)

# अमरावती जिल्हा दुष्काळग्रस्त यादीत समाविष्ट करा

### दर्यापूर तहसीलदारांना शिवसेनेचे निवेदन

**दर्यापूर/प्रतिनिधीः-**
अमरावती जिल्ह्यात यंदा पावसाचे असमान व अपुरे प्रमाण राहिल्याने शेती व्यवसायावर मोठा परिणाम झाला असून अनेक भागांमध्ये पिकांची परिस्थिती चिंताजनक बनली आहे. या पार्श्वभूमीवर अमरावती जिल्ह्याचा दुष्काळग्रस्त यादीमध्ये समावेश करून शेतकऱ्यांना शासनाच्या विविध सवलती व मदतीचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी



शिवसेनेच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भात शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी दर्यापूर तहसीलदार ☞(पान २ वर)

# अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत अमरावतीत ८ महिन्यांत ६९ गुन्हे दाखल

### प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करा: जिल्हाधिकारी आशिष येरेकर



### -५४ प्रकरणांत दोषारोपपत्र सादर

**अमरावती/प्रतिनिधीः-**
अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यांतर्गत दाखल असलेल्या प्रकरणांवर संबंधित यंत्रणांनी समन्वयाने तातडीने कार्यवाही करावी. पोलीस तपासावरील तसेच न्यायालयीन प्रलंबित प्रकरणे विहित कालावधीत निकाली काढावीत, असे स्पष्ट निर्देश अमरावती जिल्हाधिकारी☞(पान २ वर)



अमरावती : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे अमरावती विमानतळ येथे आगमन झाले. त्यानंतर नियोजित कार्यक्रमासाठी ते रवाना झाले. विमानतळावर यावेळी विभागीय आयुक्त नयना गुंडे,जिल्हाधिकारी आशिष येरेकर,एसपी निकेतन कदम आदि उपस्थित होते.

# गुन्हेगार जयेश गायकवाड दोन वर्षांसाठी हद्दपार

**अमरावती/प्रतिनिधीः-**
शहरातील महात्मा फुलेनगर, नवसारी परिसरातील सराईत गुन्हेगार जयेश उर्फ तात्या राजेंद्र गायकवाड (वय २२) याला अमरावती शहर व जिल्ह्याच्या हद्दीतून दोन वर्षांसाठी हद्दपार करण्यात आले आहे. पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या आदेशानुसार ही प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. पोलीस नोंदीनुसार, गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत जयेश गायकवाड याच्याविरुद्ध दुखापत करणे, जिवे मारण्याची धमकी




देणे, अश्लील शिवीगाळ करणे तसेच मारहाणीशी संबंधित गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. त्याच्याविरुद्ध यापूर्वीही वेळोवेळी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. मात्र, त्याच्या गुन्हेगारी अभिलेखाचा आढावा घेतल्यानंतर त्याच्यावर हद्दपारीची कारवाई ☞(पान २ वर)

# कांतानगरात तडीपार इसमाला अटक

**अमरावती/प्रतिनिधीः-**
तडीपारीचा आदेश असतानाही शहरात प्रवेश करून फिरणाऱ्या तडीपार इसमाला गुन्हे शाखा युनिट क्रमांक-१च्या पथकाने कांतानगर परिसरातून ताब्यात घेतले. मंगेश उर्फ सोनू भीमराव चांदूरकर (वय ४९, रा. केवल कॉलनी, अमरावती) असे ताब्यात घेतलेल्या इसमाचे नाव आहे.

मंगेश चांदूरकर हा तडीपार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. ☞(पान २ वर)

जिल्ह्यातील गड-किल्ले, संरक्षित स्मारकांवरील

# अतिक्रमणे हटवण्यासाठी जिल्हास्तरीय समिती गठीत

अमरावती/प्रतिनिधीः-
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या निर्णयानुसार जिल्ह्यातील केंद्र व राज्य संरक्षित किल्ले तसेच राज्य संरक्षित स्मारकांचे जतन, संवर्धन आणि सुरक्षेसाठी जिल्हास्तरीय दक्षता समिती स्थापन करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थापन करण्यात आली आहे.

ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा सुस्थितीत राहावा, स्मारकांवर झालेली अनधिकृत अतिक्रमणे हटवली जावीत आणि भविष्यात नव्याने अतिक्रमणे होऊ नयेत, यासाठी ही समिती कार्यरत राहणार आहे. समितीमध्ये सदस्य सचिव म्हणून निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, तर सदस्य म्हणून पोलिस आयुक्त राकेश ओला, जिल्हा पोलीस अधीक्षक निकेतन कदम, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, महानगरपालिका☞(पान २ वर)